
दीपावली अंक २०१७

# गुरु महिमा

मूल्य : रु. ७५/-

# श्री माणिकप्रभु चरित्र



**श्री माणिकप्रभु जन्मद्विशताब्दी वर्ष विशेषांक**



सद्गुरु श्री भाऊ महाराज



।। श्रीगुरुदेव दत्त ।।

।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णू गुरुर्देवोमहेश्वरः
गुरुसाक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

# संपादकीय

आज जगात सर्वत्र अनेक जाती-धर्म आहेत. या सर्वांनीच परमेश्वराला जगन्नियंता म्हटले आहे. इतकेच काय सर्व धर्मीय लोकांनी त्या परमेश्वराची प्राप्ती करुन हेच एक अंतिम ध्येय मानले आहे. याचाच अर्थ असा होतो, सर्व धर्माचे मूलत्व एकच असून अंतिम इच्छा ही एकच आहे. देश-काल-परिस्थिती, आचार यामध्ये काही भेद हा असणारच. परंतु सर्व धर्मांतील मूलतत्व, ऐक्य, समता आणि माणसां-माणसांमधिल बंधूता यांना कशानेही कोणत्याही स्थितीत बाधा येत नाही. म्हणूनच या श्रेष्ठ तात्विक बैठकीवर वा अधिष्ठानावर श्रीमाणिकप्रभूंनी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर भारतासारख्या एका महान देशाच्या मध्यभागी निजामशहाच्या राजवटीत हिंदू समाजाच्या एकात्मतेचा प्रयोग यशस्वी करुन त्याचा जगामध्ये आदर्श निर्माण केला. प्रत्येक धर्मातील लोकांना आपल्या धर्माचे आचरण ठेवण्यास स्वतंत्रता देऊन सर्वांना एकत्र आणून सर्वधर्म समभाव मानण्याची धार्मिक दृष्टी दाखवून आपल्या मतानुसार स्थापलेला परमेश्वराची उपासना करावी, म्हणजे कोणताही संघर्ष न होता सहकार्य होऊन सहजीवनही शक्य होईल व त्यातूनच राष्ट्राची एकात्मता साधून राष्ट्र बलवान होईल याची खात्री दिली.

श्रीमाणिकप्रभूंच्या या विलक्षण विचारातूनच ‘सकलमत संप्रदायाची’ निर्मिती झाली. प्रभू उदार हृदयाचे आणि विशाल दृष्टीचे असल्यामुळेच विश्वात भरुन राहिलेल्या चैतन्याचे ते घनीरुपच होते. जे जे चांगले असेल त्याचे ग्रहण करावे, हीच त्यांची शिकवण होती. म्हणूनच प्रभूंनी सकलमत संप्रदायात केवळ आचार न ठेवता त्याला विचार प्रधान व ज्ञान प्रधान बनवला. त्यामुळेच हिंदूधर्मातील नाना पंथ, त्यांची मते, सर्व अनुयायी प्रभूंचे होऊन राहिले. त्याही पलिकडे मुसलमान, शीख, लिंगायत इत्यादी परधर्मीयांनीही माणिकप्रभूंचे शिष्यत्व स्वीकारले. कारण प्रभूंचे जीवितकार्यही तसेच होते. अत्यंत दयाबुध्दीने त्यांनी एकात्मतेचा संदेश आध्यात्माला अनुसरुनच दिला. कोणत्याही देवताची पूजा, उपासना करा, प्रत्येकाचे एकच ध्येय उरते, ते म्हणजे ईश्वराची प्राप्ती. या अनुषंगानेच प्रभूंजवळ नाना

धर्मिय एकत्र राहिले. एकत्र नांदले, उदार व सहिष्णूता अंगी बाणवून सर्वधर्म समभावाची कास धरली. आणि आपल्या जीवनातील अत्युच्च आनंद प्राप्त करुन घेतला.

प्रभूंना श्रीदत्तात्रेयांचे अवतार म्हटले जाते. श्रीदत्तगुरुंना समन्वयी दृष्टीची देवता मानली जाते. तीच दृष्टी माणिकप्रभूंच्या ठायी वसलेली होती. त्याचप्रमाणे त्यांचे कार्य होत होते. म्हणूनच सर्वांना जवळ करणारा सकलमत संप्रदाय निर्माण करु शकले.

यंदाचे वर्ष हे माणिकप्रभूंच्या प्रकटीकरणाचे द्विशताब्दी वर्ष आहे. त्यांचे चरित्रही फारच रसाळ आणि मानवी जीवनाला केवळ आनंद देणारे आहे. म्हणूनच हा समन्वय साधून आपला हा दिवाळी अंक 'श्रीमाणिकप्रभू' विशेषांक म्हणून प्रसिध्द करीत आहोत. प्रभू हे श्रीदत्तात्रेयांना म्हटले जाते. तेच 'माणिकप्रभू' म्हणून अवतरले. अशा या दयाघन आणि सदैव भक्तांवर कृपादृष्टी ठेवणाऱ्या प्रभूंचे जीवनचरित्र दीपावली सारख्या श्रेष्ठ सणात सर्व भक्तांच्या वाचणात येऊन सर्वांचे जीवन सदैव आनंदी, समाधानी राहो ही 'प्रभू' चरणी विनम्र प्रार्थना.

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।

।। सद्‌गुरु श्री भाऊ महाराज की जय।।

- श्री. रविंद्र जगन्नाथ गावडे

## दत्तावतारी श्रीमाणिक प्रभू जन्म चरित्र

अलौकिक सामर्थ्यसंपन्न प्राप्त विभूतींची चरित्रे पाहिली असता, त्यांचा अभ्यास केला असता एक गोष्ट महत्त्वपूर्ण ठरते ती म्हणजे त्यांचे सकल जीवन हे चमत्कारांनी भरलेले दिसते. त्यांचे कार्यक्षेत्रच इतके अफाट आणि विस्तृत की लोकसमूहातील सामान्य बुध्दीला त्याचा थांगपत्ता लागू शकत नाही. अशा या संतश्रेष्ठींनी आपल्या तेजोमय स्वकर्तृत्वाने अवघ्या जगाला आध्यात्मिक ज्ञानाचे पेटारे उघडून दिले. नाना पंथ, विविध संप्रदाय यांचा गौरवशाली समूह आज सर्वत्र पाहावयास मिळतो.

आजच्या कलीयुगात संतमंडळींची पवित्र चरणकमले पडली आणि धार्मिक मंडळींची हळवी मने आध्यात्मिक मार्ग पत्करुन जीवनात सफल झालेली पाहावयास मिळतात. अनेक भाषा, अनेक प्रांत, नानाविध संप्रदाय त्यातही नाना पंथ धारीत विविध संत आपणांस माहित आहेत. त्यांची सुबोध, रसाळ चरित्रेही आपण वाचत आलो आहोत. प्रत्येकाचे अंतर्बाह्य स्वरुपही अलग आहे. त्यांची वैशिष्ट्येही वेगळी आहेत अर्थात आचार-विचार भिन्नच आहेत. प्रत्येकाने सांगितलेला, शिकविलेला, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग आणि ज्ञानमार्ग अंती परमेश्वराकडे म्हणजेच अध्यात्मात ज्याला मोक्ष म्हणतात तेथेच घेऊन जातो. परंतु या सर्व मार्गात अगदी साधा-सोपा व सुटसुटीत असा भक्तिमार्गच असल्याने सामान्य जणांना तो सुलभ ठरला आहे.

कोणतेही व्रत, वैकल्य म्हणा, खडतर तपश्चर्या म्हणा, वा कर्मठ कर्मकांड न करता, योगपध्दतीचा अवलंब न करता फक्त परमेश्वर हाच सर्वोच्च बिंदू मानून भक्ती, उपासना, साधना करावी, सद्‌गुरुंच्या आश्रयाने राहावे असे सांगतो तो भक्तीमार्गच सर्वसामान्यांच्या पसंतीस उतरला आणि भक्तिद्वारेच अनंत अनंत भक्तांनी आपले व समाजाचे हित साध्य करुन दिले, याचे आजही अनंत दाखले दृष्टीस पडतात.

सर्वच संतांनी अनेक चमत्कार केले ते परमेश्वराकडे घेऊन जाणारा भक्तीमार्ग दाखविण्यासाठीच. त्यातूनच दत्त, शैव, वैष्णव, वारकरी संप्रदाय उदयास आले. याच संप्रदायाची कास सर्व संतांनी धरली.

काही संतश्रेष्ठ, विभूती भूतकालीन इतिहासामध्ये उदयास आल्या, चमकल्या त्या काही मर्यादित कालापर्यंत तसे सामर्थ्य घेऊनच! पुढेही भविष्यात तसे अलौकिक सामर्थ्य घेऊन अनंत, दिव्य विभूतीही या पृथ्वीतलावर प्रगट होतील. आपल्या प्रचंड शक्तीद्वारे जगाला प्रकाशमान करुन जातील. कारण देश, काल, त्या परिस्थितीप्रमाणे जगतकल्याणासाठी अशा विभूती आवश्यक ती शक्तीधारण करुन कार्ये करीत असतात. अशा विभूतींचे सामान्य जणांच्या मानाने कार्यक्षेत्र अत्यंत विस्तृत असल्याने त्यांचा भौतिक देहही विशाल बनतो. आणि मग साहजिकच त्यांचे कार्य सामान्य बुद्धीमत्तेच्या

पलीकडचे होऊन जाते. तेथे जी गोष्ट घडली जाते त्याला आपण चमत्कार म्हणतो. अचानक एखादी अद्‌भूत गोष्ट घडली की आपल्या तोंडून सहज निघून जाते, काय हो हा अद्‌भूत चमत्कार! तसे पहाता निसर्गाचे वा सृष्टीचे सारे नियम चरा-चराला लागू असतात. त्याचे उल्लंघन कोणालाही करता येत नाही. त्याचप्रमाणे संतांच्या, विभूतींच्या हातून घडलेले चमत्कार ते कसलेही म्हणजे अद्‌भूत, अदृष्ट, अश्रूत असो, त्यांना नियमबध्दता ही असतेच. संतमंडळी निसर्गाच्या चौकटीत राहूनच भक्तांना योग्य मार्ग दाखविण्यासाठीच अद्‌भूत गोष्टी घडवून आणतात.

जग नियंत्याने हे विश्व निर्माण करताना त्याला जो नियम घालून दिला तो विश्व असेतोवर कायम राहणारच! अर्थात विश्वातील प्रत्येक पदार्थाचे जे काही गुणधर्म आहेत ते त्याच्या सोबतच असतात. त्याचप्रमाणे मानवी देहाचेही तसेच आहे. मानव देह धारण केलेल्या संत, विभूतींनी आपापले देहधर्म यथाशास्त्र पाळून सृष्टी नियमांचे पालन केले आहे.

भगवान श्रीविष्णू अर्थात नारायण हे षडगुणैश्वरसंपन्न आहेत. त्यांच्या ठायी असलेले सहा गुण ज्या मानवात प्रतीत होतात त्यांना संत, विभूती म्हटले जाते. तो जरी नरदेहधारी असला तरी नारायण स्वरुपच असतो. म्हणूनच परमेश्वर हा विश्वव्यापी सत्तेचा प्रभू आहे. तोच पालनकर्ता आहे आणि तोच सद्‌गुरुही आहे. भक्तांचे सकल मनोरथ पूर्ण करणारा आहे. सर्वांना आनंद देणारा आहे. तोच सगुणरुपाने प्रकट होऊन संत, विभूती बनून भक्तांचे हित साधून देतो आणि...

जेव्हा पृथ्वीतलावर अराजक माजते, धर्माचा ऱ्हास होण्याची वेळ येते तेव्हा परमेश्वर मानवी देह धारण करुन सर्व प्राणीमात्रांना त्यांचे दु:ख निवारण करुन आनंद देतो. अशी परिस्थिती जेव्हा जेव्हा निर्माण झाली त्या त्या वेळेला परमेश्वराचे प्रगटीकरण झालेले आहे.

### षडगुणैश्वरसंपन्न ‘माणिकप्रभूंचा जन्म’

हे हिंदू राष्ट्र व्हावे ही तो श्रींची इच्छा असे म्हणून हिंदूपदपादशाहीची संस्थापना करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार आर्यावर्तातील सर्वत्र महत्वाच्या भागापर्यंत केला होता. परंतु त्यांच्या नंतर हिंदू पदपादशाहीचे प्रमुख सिंहासन साताऱ्यास असले तरी बहुत सत्ता पेशव्यांकडे गेली होती. परंतु रावबाजीच्या राजवटीत पेशव्यांनी निर्माण केलेले अनेक मुख्य सरदारच आपापली सत्ता बळकट करण्यात गुंतले होते. मुत्सद्देगिरी, दूरदर्शीपणा लोप पावून स्वार्थबुध्दी प्रबळ होत गेली. शौर्य, धैर्य, तेज सारे काही लोप पावत चालले होते. सहानुभूती, सहकार्य तर शिल्लकच राहिले नव्हते. अशाप्रकारे सकल मराठी साम्राज्य विस्कळीत झाले होते. थोडक्यात अंतस्थ अराजक व बेबंदशाही फैलावत चालली होती. शूर सरदारच उघडपणे राज्यात लूटमार करीत होते.

त्याच सुमारास ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानात आपले हात-पाय पसरले होते. ही कंपनी इतकी प्रबळ झाली होती की पेशवाईला ग्रासून टाकणारी. त्यात रावबाजीने ताबेदारीचा तह केल्यामुळे कोणत्याही व्यवहारात हस्तक्षेप वा ढवळाढवळ करण्याचा आयता अधिकारच ईस्ट इंडिया कंपनीला प्राप्त झाला होता. याचे कारण होते वसईचा तह! ईस्ट इंडिया कंपनीने होळकर, पटवर्धन, शिंदे, गायकवाड या सरदारांशी अलग अलग तहनामे करुन रावबाजीची अवस्था बेजार केली होती. हा काळ होता एकोणिसाव्या शतकाचा प्रारंभ! एकीकडे ईस्ट इंडिया कंपनी तर दुसरीकडे निजांमाची राजवट! सत्ता, लक्ष्मी, वैभव, तेज परकीयांच्या हाती जाण्याची वेळ आली होती. अशा या आणिबाणीच्या संक्रमण काळात परमेश्वराने सगुण रुपात आपले प्रगटीकरण केले ते म्हणजे 'माणिकप्रभू'! प्रभूंचा जन्म होणे हा ईश्वरी संकल्पच असावा!

## इतिहास

इसवी सनाच्या अकराव्या शतकात कल्याण शहराचा उल्लेख केला गेला. कल्याणी असेही या शहरास म्हटले जायचे. पूर्वील काळी हे नगर महाराष्ट्राच्या राजधानीचे प्रमुख स्थान म्हणून ओळखले जायचे. सोमेश्वर राजा हा चालुक्य कुलीन! त्याने आपल्या राजधानीचे ठिकाण कल्याणचा कल्याण केले होते. चालुक्य वंशातील तैल राजा येथे राज्य करीत होता. कलचुरी वंशातील बिज्जल नामक एक शूर क्षत्रिय तैलाचा सेनापती! काहीसा जैन मताचा! त्याने आपल्या राजाविरुध्द बंड पुकारुन राज्य बळकावले व स्वत: राजपदाची सूत्रे हाती घेतली.

सुमारे सत्तावीस वर्षे त्याने राज्य केले. कल्यानी हेच राजधानीचे शहर कायम ठेवून त्याने आसपासचे, दूरचे अनेक प्रदेश जिंकले. अगदी म्हैसूरपर्यंत बिज्जलाने आपले राज्य वाढविले. त्याच वेळी कर्नाटकात वीरशैवाची बौध्द व जैन मतांविरुध्द लाट उसळली गेली. त्याचा फायदा उठवून बसव नामक बिज्जलाच्या ब्राह्मण प्रधानाने बंड उभारुन बिज्जलाचा बिमोड केला. परंतु काही काळातच बिज्जलाचा थोरला मुलगा सोमेश्वर याने बसवाचा पराभव करुन आपले राज्य परत मिळविले. पुढे वर्षभरातच होटासळ यादव वीर बल्लाळाने चालुक्य व कलचुरी या दोन्ही घराण्यांना नष्ट करुन आपले साम्राज्य स्थापन केले. मात्र कल्याणीचे महत्व कायम राहिले. पुढील काळात तिचे बरेच वर्षे सामित्व देवगीरी वंशाकडे राहिले.

चौदाव्या शतकाच्या सुमारास बहमनी राज्याची येथे मुहूर्तमेढ झाली. बहमनी नंतर कल्याणी नगर बिजापूरमध्ये सामाविष्ट केले गेले. सन १६५३ साली मोगलांनी कल्याणी लुटले. औरंगजेबाने ते मोठ्या प्रयत्नाने सन १६५६ साली सर केले.

एके काळी कल्याणात सोन्याचा धूर निघत होता. आजचं जर कल्याण उंच ठिकाणाहून पाहिले तर एखाद्या दाट झाडीत बसले असल्याचे दिसून येते. गावात व गावाबाहेर विपूल प्रमाणात झाडे दिसतात. भरपूर आंब्याच्या बागा, किल्यात बऱ्याच जुन्या तोफा, दारुची कोठारे आहेत. सध्या हा किल्ला पडक्या अवस्थेत आहे. त्याकाळी कल्याणचा किल्ला हे येथील प्रमुख प्रेक्षणीय स्थळ होते. प्राचीन काळापासून तो उभा आहे. मात्र मुसलमानी राजवटीत त्याचे स्वरुप पालटून गेले. आज चहूकडे ओसाड दिसते. तेथील जुनी मोठमोठाली पडती घरे त्याकाळाचे प्रदर्शन करीत उभी आहेत. येथील गोसावी गल्ली पाहू जाता त्याकाळच्या कल्याणचे ऐश्वर्य लक्षात येऊ लागते. आज हैदराबादेत ठिकठिकाणी गोसावी लोक आहेत त्यांचे मूळ ठिकाण हे कल्याण होते. त्यांच्या महंताचा मठ होता. हे गोसावी लोक त्याकाळी ऐश्वर्यवान व दानशूर होते. मोठमोठ्या राजांना धनरुपात कर्ज देऊन त्यांच्या कडून प्रांताचा वसूल घेत असत. त्यामुळे आपसूक सत्ताही त्यांच्या हाती असे. त्याकाळी गोसावी लोकांच्या महंताजवळ पाचशे अरब नोकरी करीत होते असे म्हटले गेले आहे. गोर-गरीबांना अन्न त्यांना दीक्षा यांची खूप रेलचेल होती. पाण्याचीही सुबत्ता होती. याच गोसावी लोकांनी अनेक विहिरी बांधल्या होत्या. त्यामध्ये एक विहिर ही एखाद्या तळ्यासारखी असून एकाच वेळी पन्नास जनावरे त्या विहिरीत उतरुन सहज पाणी पिऊ शकतील! परंतु आज या सर्व गोष्टींची दैना झालेल दिसते. थोडक्यात पूर्वीच्या काळातील उत्कृष्ट कारागिरांचे काम उध्वस्त झालेले दिसते.

याच कल्याण नगरीत सदानंद स्वामींचा मठ आहे. सुप्रसिध्द रामानंद स्वामींचे हे गुरु! काशीतील गौड ब्राह्मण! आपल्या गुरुंच्या आज्ञेनेच ते कल्याण नगरी आले. गुरुंनी सांगिलेला गुह्य शब्द ‘चेत अवधूत’ यास जेथे प्रत्युत्तर मिळेल तेथे वास्तव्य करुन रहा! या आज्ञेनुसार काशीतून सदानंदस्वामी मुखाने ‘चेत अवधूत’ म्हणत मार्गक्रमण करीत कल्याणला आले. तेथे त्यांना प्रत्युत्तर मिळाले, म्हणून गुरुंच्या आदेशाप्रमाणे सदानंदस्वामी कल्याणतच राहून आपले कार्य करीत राहिले. त्यांच्या बद्दल अनेक आख्यायिका सांगितल्या गेल्या. त्यातील एक म्हणजे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांप्रमाणेच सदानंद स्वामींनी भिंत चालवली होती. ती भिंत पूर्वील स्थितीतच सांभाळून ठेवली आहे.

याच सदानंद स्वामींनी आपल्या शिष्यांकरवी मठाचे बांधकाम करुन घेतले, ते ही पक्का दगडांनी, शिवाय मठा सभोवती सुंदर बागही तयार करवली. मठाचे काम पूर्ण होताच जमिनीच्या आत एक तळघर करुन त्यातील एका कमानीत बसून सदानंद स्वामींनी समाधी घेतली. तळघर मात्र बरेच खोल आहे. तेथेच पूर्णानंद स्वामींचीही समाधी आहे.

या शिवाय लिंगायत धर्माचे संस्थापक श्रीबसवेश्वर हे ही येथेच उदयास आले. त्यांचाही कल्याणमध्ये

मठ आहे. लिंगायत धर्माचे आदिस्थान म्हणून याचे महत्व अधिक आहे. म्हणूनच या गावाला प्राचीन पवित्र लाभले आहे. याच ठिकाणी माणिकप्रभूंचा जन्म झाला. येथेच त्यांनी अनंत लिला केल्या.

## माणिकप्रभूंचे घराणे

निजामाच्या राजवटीचा तो काळ! एकोणीसाव्या शतकाचा प्रारंभ झाला होता. निजामाच्या राज्यातील एक पोट संस्थान ज्याला 'कल्याणी' असे म्हणत असत. (मुंबईनजिक एक 'कल्याण' म्हणून गाव आहे ते नव्हे त्याला कल्याण असेही म्हणतात.) खरे तर या शहराचा समावेश महाराष्ट्रात होतो. परंतू निजामाच्या राज्यात हा भाग असल्याने महाराष्ट्राच्या नकाशात हा भाग दिसत नाही. या कल्याण नगरात मनोहर नाईक हे आश्वलायन शाखेचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण गृहस्थ राहात होते. मुळचे हे हरकुड या खेडेगावातील! त्यांचे वाडवडील कल्याणीस येऊन राहिले होते. येथे आल्यानंतर त्यांना त्यांच्या गावच्या नावाने 'हरकुडे' हे उपनाव प्राप्त झाले. उपनावे ही बहुधा व्यवसायावरुन वर्तनावरुन अथवा राहणाच्या ठिकाणावरुन धारण केली वा दिली जात असत. नाईक हे उपनाव ही तशाप्रकारे आहे. सराफी वा सावकारी जो करत असे त्याला 'नाईक' म्हटले जाई.

मनोहर नाईकांचे घराणे ईश्वरभक्त तसेच सात्विक वृत्तीचे होते. त्यांचे अजोबा केशव नाईक हे सर्वगुण संपन्न, सात्विक आणि बाणेदारवृत्तीचे होते. त्यांनी बेदरजवळील 'झरणी नृसिंह' या पवित्र स्थानात राहून बराच काळ अनुष्ठान केल्यानंतर त्यांना पुत्र झाला, त्याचे नाव त्यांनी नृसिंह असे ठेवले. पुढे वडिलोपार्जित संपत्तीवरुन वाद झाल्याने वारसा हक्काने मिळाणाऱ्या संपत्तीवर लाथ मारुन केशव नाईक हरकुड सोडून कल्याणास येऊन राहिले. निघताना फक्त त्यांनी कुलस्वामी खंडेरायाची मूर्ती सोबत घेतली होती.

कल्याणास आल्यानंतर काही काळाने त्यांनी आपल्या मुलाचा नृसिंहाचा व्रतबंध करुन विवाह केला. त्यास श्रीरामाचा उपदेश करुन व सूनेस हनुमंताची उपासना करण्यास सांगितली. मूळात नृसिंहाचा जन्मच उपासनेतून झाला होता. म्हणजे रोमारोमात ईश्वरभक्ती रुजलेली होती. शिवाय पत्नी बच्चमां ही सुध्दा सात्विक व ईश्वर भक्त असल्याने दोघेही शरीराने भिन्न असले तरी मन मात्र दोघांचे एकच होते ते ही ईश्वरभक्तीने भरलेले. अशा पती-पत्नीच्या उदरी जो जीव जन्माला येणार तो त्यांच्याच सारखा असणार! बच्चंमा देवीचा एक नियम होता, स्वतः मारुतीराय नैवेद्य भक्षण करुन गेल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नसत. अशा या सात्विक आणि भाविक उभयतांच्या पोटी मनोहरचा जन्म झाला. साल होते १७८७. त्यानंतर दोन वर्षांनी मनोहरांना मार्तंड नामे भाऊ मिळाला. हे दोघेही भाऊ अल्पवयीन

असतानाच पिता नृसिंह यांचे अकाली निधन झाले. या दुर्धर प्रसंगानंतर बच्चंमा देवी आपल्या दोन्ही मुलांना घेऊन आपल्या माहेरी लाडवंती या गावी आल्या. या गावाजवळच प्रसिध्द 'रामतीर्थ' हे स्थान आहे.

माहेरी आल्यानंतर मोठ्या धैर्याने बच्चंमा देवींनी आपल्या दोन्ही मुलांचे उत्तमतऱ्हेने संगोपन केले. तत्कालिन उपयुक्त नाना विद्येंमध्ये प्रविण केले. आपल्या आजोळी लाडवंतीस मनोहरांचा विवाह झाला. आपल्या आईच्या प्रेमळ देखरेखीखाली त्यांचे बालपण गेल्यामुळे मनोहर हे मातृभक्त बनले होते. अर्थात त्यांची वृत्ती, स्वभाव, आचार-विचार सर्व काही मातोश्रींचे होते. म्हणूनच त्यांचे सारे जीवन उदात्त कार्यास वाहिले गेले होते. बयादेवीसारख्या सात्विक आणि उदात्त मनोवृत्तीच्या स्त्रीशी विवाह झाल्यामुळे उभयतांचा प्रपंचच परमार्थ झाला होता. दोघांचीही आध्यात्मिक पातळी एकच व श्रेष्ठतम असल्याने प्रपंचातील खरे सुख दोघेही अनुभवत होते.

मनोहरपंत कल्याण गावी राहात होते. तेथील नवाबसाहेबांचे ते विश्वासू सहकारी होते. शिवाय राजकृपाही असल्याने त्यांना सुबत्ता आणि ऐश्वर्याची कमी नव्हती. सर्व बाजूंनी मनोहरपंतांना सुख-समृध्दी लाभली होती.

अशाप्रकारे आपल्या मातोश्री बच्चंमादेवींच्या प्रेमळ छायेखाली फक्त आनंदी व सुखात नांदत असलेल्या मनोहर पंतांना सन १८१३ साली प्रथम पुत्ररत्न प्राप्त झाले. आपल्या मातोश्रींच्या इच्छेनुसार मनोहरपंतांनी त्याचे नाव ठेवले 'हणमंत.' हेच पुढे हणमंतरावदादा उर्फ दादामहाराज म्हणून प्रसिध्द पावले. मुंज होईपर्यंत ते बोलत नव्हते. मुंजीनंतर ते बोलू लागले. पुढे पुढे त्यांची मौनसाधना दृढ होऊन एकांतपणा प्रिय झाला.

मनोहरपंत हे लहानपणापासूनच रामभक्त असल्याने प्रतिवर्षी ते रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा करीत. सन १८१७ सालची रामनवमी त्यांचे भाग्य उदयास आणणारी ठरली. किंबहुना तोच दिवस परमेश्वराने ठरविला असावा. उभयता पती-पत्नी त्या दिवशी अगदी तन्मयतेने, कर्तव्यपरायण होऊन आनंदमग्न झाली असता तेजस्वी गर्भसंभवाची प्रतीति होऊन त्यांना दत्तदृष्टान्त झाला. निसर्गनियमाप्रमाणे बच्चंम्मा परिणत अवस्थेत पोचल्यावर मार्गशीर्ष शुक्ल चतुदर्शी, मंगळवार २२ डिसेंबर १८१७ रोजी एक दैदिप्यमान पुत्र मनोहर पंतांना प्राप्त झाला तेच महान अवतारधारी संतश्रेष्ठ 'माणिकप्रभू' होत.

आपल्या आजोळी 'लाडवंती' येथे माणिकप्रभूंचा जन्म झाला. या स्थानास सिध्दाची लाडवंती असेही म्हटले जाते. मनोहर नाईक, बय्यंमा आणि बच्चंमा हे सर्व या अलौकिक पुत्रप्राप्तीने परमानंदात

सुखावले. या बाळाचे जातक स्वतः मनोहरपंतांनी वर्तवून लाडवंती येथील जयप्पा सोनाराच्या कपारीत ते भूर्जपत्र घालून ठेवले होते.

बच्चंमा म्हणजे आजी आणि आई-वडिल या बाळास लडीवाळपणे 'रत्न्या' अशी हाक मारीत! आपल्या कुलास हे अलौकिक रत्न प्राप्त झाले आहे अशी सर्वांचीच ठाम समजूत होती आणि ते शत-प्रतिशत सत्य होते. कारण परमेश्वरास अवतार घेण्यास वा विशिष्ट हेतूस्तव प्रगट होण्यास त्या अवतारातील भूमिकेसाठी त्याच प्रकारचे योग्य कुल शोधावे लागते. त्याप्रमाणे 'प्रभू' नी तसे कुल शोधले ते मनोहर नाईक यांचे ! साधं उदाहरण घेतले तर आपल्याला कळून येते, एखाद्या वृक्षावर उत्तम प्रतीची फळे चाखावयास मिळाली की तो वृक्षच श्रेष्ठ प्रतीचा मानला जातो. तद्वत, मनोहर नाईकांचे कुल अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे मानले गेले ते रास्तच आहे.

असे सांगितले जाते वा वाचण्यास मिळते की प्रभूंचा जन्मकाळी सर्वत्र तेजोमय प्रकाश फाकून श्रीगुरुदेव दत्त साक्षात प्रकट झाले होते. त्याची पुष्टी 'माणिकप्रभूंच्या' जीवन चरित्रावरुन कळून येते ती अशी;

माणिकप्रभूंनी लक्ष लक्ष जीवांना अन्न, वस्त्र, ऐश्वर्य देऊन संतुष्ट केले. इतकंच काय, तर सकल मानव जातीला आदर्शभूत होणारे तत्व स्वतः आचरणात आणून सर्वधर्मीय, जातील लोकांत आपापले स्वाभाविक वैरभाव नष्ट करुन सर्वांना एकाच ठिकाणी प्रेमभावे नांदत ठेवले. म्हणून सर्वधर्मीय, जातीच्या जनमाणसातून प्रभूंबद्दल 'प्रभूरेव प्रभूः साक्षात', 'पीरान् पीर दस्तगीर', 'नानाक सोहे माणिक', 'धन्य प्रभू' असे धन्योद्गार निघाले.

प्रभूंचा जन्म झाला तेव्हा निसर्गही नटून थाटून त्यांच्या स्वागतास तयार होता. 'मासानां मार्गशीर्षोऽहम्' असे भगवंतांच्याच मुखातून निघाले आहे. वर्षमासांत 'मार्गशीर्ष' मास सर्वच दृष्टीने फार श्रेष्ठ गणला जातो. शुक्ल चतुर्दशी दिवशी रात्री चंद्रबल रोहिणी नक्षत्रात होते. वार होता मंगळवार म्हणजे मंगलसूचक! अर्थात रक्तवर्ण म्हणजे लाल! त्यातही महत्वाचे म्हणजे वर्षकाल संपला होता. पृथ्वी सर्व प्रकारे अनेक पिकांनी आच्छादून गेली होती. साहजिकच सर्वत्र तरुलता प्रफुल्लीत व टवटवीत पसरली गेली होती. नदी, नाले, विहिरी इत्यादींचे जल स्वच्छ व नितळ बनले होते. डोहांत सर्वत्र कमळेच कमळे फुलली असल्याने विलक्षण शोभा आली होती. वनांमध्ये पक्षी, भ्रमर यांच्या सामुदायिक स्वरांनी परिसर नादयुक्त बनला होता. पवित्र सुगंध वाहून आणणारा आणि ज्याचा स्पर्श देहाला होताच सुखावह वाटते असा शुध्द पवन वाहू लागला होता. होम-हवन करणाऱ्या ब्राह्मणांची अग्निदेवताही हळूवार शांतपणे प्रज्वलित होत होती. आपापसातील द्वेष भावना नष्ट होऊन सर्वांची मने

प्रसन्न झाली होती. प्रत्यक्ष भगवंतच मानव देह धारण करुन प्रकट झाले होते. मग सर्वत्र प्रसन्नता व आनंदच होणार! सर्व प्राणीमात्राला सुबत्ता आणि आरोग्य अनुभवास येत असल्याने सगळीकडे आनंदाचे, सुखाचे साम्राज्य बनून उरले होते. आणि लाडवंती गाव विचारु नका! गावातील सारी मंडळी आनंदून गेली होती. घराघरात उत्सव साजरा होत होता.

प्रभूंनंतर मनोहर पंतांना नृसिंह म्हणून तृतीय रत्न प्राप्त झाले. त्याशिवाय त्यांना चिमणाबाई नावाची एक कन्याही होती. अशा आनंदी, प्रसन्न असलेल्या मनोहरपंतांना दुःखाची चाहूल लागली. त्यांच्या मातोश्री बच्चंमा वृध्दापकाळाने इहलोक सोडून गेल्या. पुढे काही काळाने मनोहरपंतांनीही आपला देह ठेवला. मनोहर पंतांची पत्नी बयादेवी आपल्या अल्पमुलांसह कल्याणला येऊन राहिल्या त्यांचे बंधू कल्याणास नवाबाचे पदरीस चाकरी करीत होते. त्यामूळे 'प्रभूंचे' बालपण बहुधा कल्याणास गेले.

अगदी लहानपणापासून प्रभूंचा एक अद्भूत दिव्य पुरुष म्हणून लौकिक होता. त्यांचा व्रतबंध त्यांचे पिताश्री मनोहर नाईक यांनी स्वतःच करुन गायत्री मंत्राचा उपदेश केला होता. त्यांनीच प्रथम प्रभूंना अक्षर ओळख करुन दिली असावी. कारण मनोहर नाईक यांना आपल्या पुत्राचे महत्व पटले होते.

तेजस्वीता आणि ज्ञानसंपदा या सह जन्म घेतलेल्या विभूतीस कोणाकडून ज्ञान संपादन करुन घेण्याची काय आवश्यकता ? ही गोष्ट खरी! तरी व्यावहारिकदृष्टऱ्या मानवी देह धारण केल्यावर निसर्ग नियम अनुसरुन व व्यवहारास धरुनच आपले वर्तनक्रम ठेवायचे असातात. अनेक संतश्रेष्ठींनी, विभूतींनी निसर्ग नियमाप्रमाणे वा सृष्टीक्रमाला अनुसरुनच आपला कार्यभाग साधला होता.

प्रभू कधी शाळेत गेले नाहीत. त्याकाळी तेथे शाळाही नव्हती. म्हणजे इतर मुलांप्रमाणे पुस्तक पोथी वाचण्यात प्रभूंचा वेळ गेला नाही. बालपणाचा सर्व वेळ त्यांनी सवंगडी जमवून, विविध खेळ खेळण्यात घालवला. गर्द जंगलात, रानावनात एकटेच फिरावे, विविध पशुपक्ष्यांच्या सहवासात आणि वृक्षवल्लींच्या सान्निध्यात स्वच्छंद क्रीडा करावी, गुहांमध्ये आत शिरुन तेथे एकांतात बसून दिवस घालवावा, तीर्थांना भेटी द्याव्यात असा प्रभूंचा कार्यक्रम असे. त्यांचे मामा, बळवंतराव कुळकर्णी यांची प्रभूंच्या मागे शिक्षणाची टोचणी असायची. ती सुध्दा साहजिकच होती. आपल्या भाच्याने शिक्षण घेऊन त्याच्या जोरावर नावलौकिक कमवावा व आपल्या कुटुंबाचे भाग्य उदयास आणावे, असेच बळवंतरावांना वाटत होते. शिवाय नवाबाच्या पदरी उच्च अधिकारी असल्याने त्यांच्या जवळ शिपाई हे होतेच! त्यांनी काही काळ प्रभूंना त्या शिपायांच्या पाहाऱ्यातही ठेवले होते. परंतु त्या शिपायांच्या सक्त नजरेतूनही प्रभू लीलया निसटत असत.

प्रभूंचे वर्तन म्हणजे स्वछंद व स्वैर असे. त्यामुळे अनेकांना हा मुलगा वेडा आहे असेच वाटायचे. त्या

अर्थानेच लहापणी त्यांना 'वेडा भाऊ' म्हटले जायचे. या उलट जाणकार लोकांची खात्री झाली होती, हा मुलगा मूलतः महाज्ञानी आहे. कारण प्रभूंच्या वाणीतून निघालेला शब्द सत्यात उतरत असे. अनेक जण आपले काम होईल का? कधी होईल? इत्यादी विचारीत आणि प्रभूंकडून त्यांना लगेच उत्तर मिळे. विचारणाऱ्या माणसाचे काम झालेले असायचे. हा तो मोठा दाखला! त्यामुळेच प्रभूंचा बोलबाला गावात आणि आजूबाजूच्या परिसरात होऊन मोठा आदरही निर्माण झला होता. हाच वेडा भाऊ कधी उत्तम थाटात दिसे तर कधी केवळ लंगोटीवर! तर कधी अंगाला राख फासून! कधी कधी प्रतिष्ठीत माणसाप्रमाणे उत्तम आसनावर बसून उदात्त गोष्टींची मीमांसा करीत असे. बहुतेक वेळ त्यांचा मुलांसोबत खेळण्यात जाई. सर्व मुलांना प्रभू सोबत आहे याचा फार आनंद व्हायचा. खडीसाखरेस लागलेल्या मुंग्याप्रमाणे सारी मुले प्रभूंना चिकटून असायची. कोणतीही वेळ असो, कोणतेही ठिकाण असो, मुले प्रभूंसोबत खेळण्यात रममान व्हायची. त्यांच्या सहवासात निर्भय असायची.

प्रभूंच्या जीवनात हाच एक विशेष भाग असे. ते इतर अनेक संत-महात्म्यांपेक्षा अलग आहेत. त्यांची वृत्ती बालोन्मत्त पिशाच्चाप्रमाणे झाली होती. जशी अवधूताची होती. बालवयात वैराग्य, ज्ञान आणि सामर्थ्य प्रभूंना प्राप्त झाले होते. म्हणूनच त्यांना दत्तगुरुंचा अवतार म्हटले गेले. त्यांच्या जन्मापूर्वी त्यांच्या वडिलांना झालेला दृष्टान्त आणि दत्तजयंतीलाच प्रभूंचा झालेला जन्म! या दोन्ही गोष्टी ठरल्याप्रमाणेच जुळून आल्या होत्या. त्यावेळच्या जाणकारांनी, ज्ञानी पुरुषांनी हे ओळखून प्रभू हे दत्तात्रेयांचेच अवतार आहेत याची खूणगाठ बांधली होती. अवधूताप्रमाणे प्रभूंची बालक्रीडा होती. सृष्ट पदार्थापासून बोध घेण्याचे तत्व अवधूताप्रमाणेच होते.

**<u>माणिक प्रभूंच्या बाललीला</u>.**

प्रभूंचे जे बाल सवंगडी होते त्यात गोविंदा नावाचा गवळी मुलगा होता. नित्य गाई-म्हशींना रानात चारण्यास नेत असे. गंमतीची गोष्ट म्हणजे प्रभूंच्या खेळात पुष्कळ सारी गुराखी मुलेही सामिल होत असत. तेही प्रभूंच्या संगतीने निर्भय बनलेले होते. प्रभूं सोबत असताना त्यांना गुरांची विशेष काळजी नसे. गोविंदा गवळी चार-पाच दिवस प्रभूंना दिसला नाही. म्हणून दुसरे दिवशी प्रभू गोविंदाच्या घरी गेले तर घरात मोठ मोठ्याने रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी घरातील लोकांना काय झाले? असे विचारताच गोविंदाची आई म्हणाली, गेले चार दिवस गोविंदा ज्वराने आजारी होता. आज मरण पावला. तेव्हा प्रभू त्या माऊलीकडे जाऊन म्हणाले, उगीच रडू नका. तुमचा गोविंदा मेलेला नाही. एकदा जोराने हाक मारुन पाहा म्हणजे तो पटकन उठून बसेल. जमलेल्या इतर मंडळींनी अगोदरच गोविंदाच्या

प्रेतयात्रेची तयारी करुन ठेवली होती. अगोदरच प्रभूंना बहुतेक जण वेडा भाऊ म्हणायचे, त्यात हे न पटण्यासारखे बोलल्यावर त्यांना विश्वास तरी कसा असणार ?

परंतु गोविंदाच्या आईचा प्रभूंवर विश्वास होता. तिने बसल्या जागीच जोराने म्हटले, गोविंदा, उठ रे लवकर ! किती वेळ निजतोस ? भाऊ आला आहे. तुला त्याच्याबरोबर जायचे नाही का ? एवढे बोलून होताच गोविंदा झोपेतून जागा झाल्याप्रमाणे खडबडून उठून बसला. आईच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. जमलेली मंडळी मात्र या प्रसंगाने अवाक् झाली.

प्रभू मात्र सहजपणे बोलले, काय ही वेडी माणसे ! जीवंत माणसाला जाळायच्या तयारीत होती. इतके म्हणून त्यांनी गोविंदाला रानात येण्यास सांगून निघून गेले. गोविंदाचा पूनर्जन्म मात्र स्वतःकडे घेतला नाही. वेड्या भाऊने मेलेल्या गोविंदाला जीवंत केले ही बातमी झपाट्याने सर्वदूर पसरली. गावागावातील माणसे गोविंदाला पाहण्यासाठी गर्दी करु लागले. प्रभू (वेडा भाऊ) मात्र दोन दिवस गुप्त झाले होते. कुणासही त्यांचा माग सापडला नाही.

**<u>माळीणीची आई होण्याची इच्छा पूर्ण केली.</u>**

एके दिवशी एक माळीण डोक्यावर आंब्याची पेटी घेऊन आंबे घेता का आंबे, असे ओरडत चालली होती. त्याचवेळी प्रभू दहा एक मुलांना बरोपबर घेऊन त्या माळीणीजवळ येऊन म्हणाले, बाई आम्हाला आंबे हवेत, देता का ? आंब्याचा भाव न विचारता, नुसते आंबे मागणारा हा मुलगा वेडा आहे का ? असा विचार करुन ती माळीण फुकट आंबे देण्यास तयार झाली नाही. पैशाची मागणी करुन ती पुढे जाताच प्रभू हलक्या आवाजात म्हणाले, माळीणीस पुत्र प्राप्ती हवी असेल तर ती जरुर आंबे देईल. प्रभूंचे हे हलक्या आवाजातील शब्द ऐकताच माळीण मागे येऊन म्हणाली, पोरा तुझ्या तोंडात साखर पडो. आज अनेक वर्षे माझी कूस उजलेली नाही. अनंत नवससायास केले पण काही उपयोग झाला नाही. मातृवात्सल्यासाठी मी आसुसलेली आहे. तुझ्या मुखातील शब्द मला अमृतवत वाटतात. घे तुला हवे तेवढे आंबे, असे म्हणून तिने आंब्याची पाटीच प्रभूंसमोर ठेवली. मात्र प्रभूंनी त्यातील फक्त अकरा आंबे घेतले म्हटले, पुरे ! अकरा मुलांसाठी अकरा आंबे बस झाले. तुला अकरा मुलगे होतील. प्रभूंच्या पूर्नरोच्चाराने माळीणीस अतिशय आनंद झाला. इकडे प्रभू आपल्या सवंगड्यांसह उड्या मारत निघून गेले.

या माळीणीस पुढे वर्ष दीड वर्षाच्या फेराने पाच मुलगे झाले. तिचा आनंद गगनात मावेना. तिला ती घटना आठवली. आपण त्या मुलाच्या विश्वासाने त्याला आंबे खावयास दिले. त्याच्याच आशिर्वादाने

मला पुत्र प्राप्ती झाली. त्या मुलाला माझ्याविषयी कसे कळले ? नक्कीच तो ईश्वरी अवतार असणार! परंतु त्याने मला अकरा मुलगे होतील असे म्हटले होते. त्यापैकी पाच पुत्र मला लाभले आहेत. मुलांविषयी माझी हौस आता पूर्ण झाली आहे. यापुढे आपणांस बाळंतपणा सहन होणार नाही. येथेच थांबावयास हवे. त्याप्रमाणे माळीणीने प्रभूंजवळ येऊन तसा विचार प्रगट केला व विनंती केली. प्रभू प्रसन्नतेने म्हणाले, तुझी मर्जी! आता मी तुझ्या ऋणातून मुक्त झालो आहे. तुझ्या इच्छेप्रमाणेच होईल.

पुढे त्या माळीणीस पुत्र लाभ झाला नाही.

## आठ कवडयांची कहाणी.

हैदराबादेत त्यावेळी निजामाची राजवट होती. त्याच्या पदरी अरबांचे सैन्य होते. या सैन्याचे दोन भाग असत. त्या प्रत्येकावर अलग अलग अधिकारी नेमलेले असायचे. आप्पाराव हे जातीचे ब्राह्मण होते ते या अधिकाऱ्यांपैकी एक! अरबांतील जमादार म्हणून कार्यरत होते. त्यामुळे मिळकतही अफाट व मानही मोठा होता. भीमाबाई ही त्यांची पत्नी! कोणत्याही स्त्रीला लग्नानंतर आई व्हायचे असते. पोटी संतान व्हावी या तळमळीने कोणतेही व्रत, वैकल्य करण्यास स्त्रीची बरोबरी कोणीच करु शकत नाही. हे वास्तव आहे आणि त्याचे दाखलेही अनंत अनंत असेच आहेत.

भीमाबाईनीही अशी अनेक व्रत-वैकल्य केली होती. परंतु उपयोग न झाल्याने ती अत्यंत उदासीन अवस्थेतच वावरायची. त्याच समयी कोणीतरी तिच्या कानी वेड्या भाऊची किर्ती घातली. वेडा भाऊ बोलतो ते अगदी खरे होते. तुम्ही त्यांची भेट घ्या. तुम्हाला हवे आहे ते मिळेल. या दाखल्यामुळे भीमाबाईंची उत्कंठा वाढली. आपणही त्या वेड्या भाऊचे दर्शन घ्यावे असे तिला मनोमन वाटू लागले. त्वरीत आपल्या पतीची परवानगी घेऊन सोबत भोई, शिपाई, घोडेस्वार, मोलकरणी घेऊन मेण्यात बसल्या आणि कल्याणला यावयास निघाली. हैदराबादहून मजल-दरमजल करीत, वाटेत मुक्काम करीत बेदर मार्गे ती कल्याणला येत होती. कल्याणपासून मैलभर अंतरावर रस्त्यानजीक एका मैदानात काही मुलांचा गोंगाट तिला ऐकू आला म्हणून तिने मेणा थांबविण्यास सांगितले. मेण्यातून उतरुन भीमाबाई पाहू लागताच तिला काही मुले एका मुलाच्या अंगावर पडून त्याला मारताना दिसली. त्यांची मारामारी थांबविण्यासाठी तिने मेणा तिकडे घेण्यास सांगून आपल्या शिपायास मुलांचा दंगा थांबविण्यास हुकूम केला.

शिपाई तेथे जाताच त्या पडलेल्या मुलाने करारी भाषेत म्हटले, आमच्या भांडणात तुम्ही कशाला पडता ? आल्या वाटेने चालायला लागा! आम्ही आमचे पाहून घेऊ! शिपाई मात्र त्या मुलाच्या बोलण्याने

अवाक् झाले. काय करावे ते सुचेना. तोच त्या मुलाने मोठ्याने ओरडून सांगितले, तुम्हांला आमचे भांडण सोडवायचे असेल तर आठ कवड्या द्या! एक-एक कवडीस एक-एक मुलगा मिळेल. तोपर्यंत भीमाबाईही तेथे येऊन उभ्या राहिल्या होत्या. त्याही या मुलाच्या बोलण्याने विस्मयचकित झाल्या. त्यांनी कोणाकडे कवड्या आहेत का याची चौकशी सुरु केली. श्रीमंत बाई पण यावेळी तिच्याकडे कवड्या कोठून येणार होत्या ?

भीमाबाईंनी कवड्या ऐवजी रुपये दिले तर चालतील का ? याची पृच्छा केली असता तिला समजले की, मुलांचा कवड्यांचा खेळ चालला होता. त्या मुलावर आठ कवड्या आल्या होत्या आणि त्या तो देण्यास टाळाटाळ करीत होता म्हणून इतर मुले त्याला मारीत होती.

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे सर्व मुलांना वेड्या भाऊचा सहवास हवाहवासा वाटत असे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे कोठेही, कोणत्याही वेळी वेड्या भाऊ बरोबर सर्व मुले जाण्यास तत्पर होती. तो सांगेल ते करायला तयार असायची. त्याच्या बरोबर खेळताना तहान भूक विसरायची आणि आनंदात चूर व्हायची. मग कवड्यांसाठी ते प्रभूंना कसे मारतील ? ही सारी माया, लीला अर्थात प्रभूंचीच होती. आणि तसेच चित्रण उभे राहून भीमाबाईंच्या नजरेस पडले होते.

प्रभूंना रुपये नको होते. कवड्या हा त्यावेळी हक्काचा प्रश्न उभा केला होता. त्यांनी भीमाबाईला तसे सांगूनच टाकले, आपणास पुत्र हवे असतील तर कवड्याच द्याव्या लागतील. बाईंनी खूप तपास केला पण कवड्या कोठेही मिळेणात. प्रभू तिचे निरिक्षण करीत होते. तिच्या जागी दुसरा कोण असता तर त्याने विचार केला असता, कशाला या मुलांच्या फंदात पडा! आपण येथून निघून गेलेले बरे. परंतु या बाई मला कवड्या देण्यासाठी खूप प्रयत्न करता आहेत. तेवढ्याच अस्वस्थही झाल्या आहेत. म्हणून प्रभूंनीच लीला केली.

एक भोई सापडला. त्याच्या बटवीस कवड्या लावलेल्या आढळल्या. भीमाबाईंनी त्यातील आठ कवड्या काढून वेड्या भाऊच्या हाती ठेवल्या. तिचा भाव जाणून प्रभू संतुष्ट झाले आणि प्रसन्नतेने त्यांनी तिच्याकडे पाहून म्हटले, तुम्हांस बोलल्याप्रमाणे आठ मुलगे दिले, जा! असे म्हणून उड्या मारत प्रभू मुलांसह निघून गेले. भीमाबाईंना मात्र या विचित्र मुलाचे अपार कौतुक वाटले आणि आनंदही झाला. पण त्या मुलाची चौकशी करण्यास तिला मिळाली नाही. सर्व मुले कवड्या हाती पडताच आनंदाने उड्या मारत दिसेनासी झाली होती.

भीमाबाईंना मात्र आपण ज्या कामासाठी निघालो आहोत त्यास हा उत्तम शकून झाला म्हणून आनंद वाटला. सायंकाळच्या सुमारास भीमाबाई आपल्या लवाजम्यासह कल्याणला येऊन पोहोचली. मनोहर

नाईकांचा मुलगा हा दत्तावतारी असून लोक त्याला वेडा भाऊ म्हणतात हे तिला माहित होते.

आपल्या नोकरदारांची, सामानसुमानांची नीट व्यवस्था लावून तिने वेड्या भाऊची चौकशी करण्यास सुरुवात केली. त्याची भेट झाल्यानंतरच आपण भोजन करायचे असे तिने मनात पक्के ठरविले. परंतु भाऊचा पत्ता लागला नाही. अन्न न घेताच ती झोपी गेली. दुसऱ्या दिवशी ब्राह्मणभोजनाची तयारी करुन, भाऊचा शोधात निघाली. भाऊचे घर मिळाले, पण घरच्या मंडळींनाही भाऊ कोठे आहे ते सांगता येणे कठीण होते. कारण भाऊ तीन तीन दिवस कोठेही अरण्यात गुप्त होत असे.

तीन दिवस भीमाबाई उपवासी होती. भाऊच्या दर्शनासाठी तळमळत होती. अखेर प्रभूंनाच तिची दया आली आणि ते घरी प्रकट झाले. बाईंना त्याची वर्दी मिळताच लागलीच ती प्रभूंच्या दर्शनास आली. त्यांना पाहताच थक्क झाली. आपण मैदानात ज्या मुलास कवड्या देऊन सोडविले तो हाच मुलगा आहे. मात्र भीमाबाईंना पाहून प्रभू म्हणाले, एकदा तुम्हांला आठ मुलांचे वरदान दिले असता पुन्हा ही उठाठेव कशाला ? एवढे म्हणून प्रभू आपल्या आईस हाक मारुन म्हणाले, अम्मा फार भूक लागली आहे, काही खावयास दे आणि उड्या मारत निघून गेले.

भीमाबाई हा सारा प्रकार पाहत होती. प्रभूंच्या तेजःपुंज कांतीने ती दिपून गेली होती. आपले मनोरथ पूर्ण झाले याची तिला पुरेपुर खात्री झाली. पुढे आपला मुक्काम एक दिवस वाढवून तिने दान, धर्म, ब्राह्मण भोजन यथासांग करुन प्रभूंच्या मातोश्रीस व मुलांस उत्तम वस्त्रे देऊन आनंदाने हैदराबादेस परतली. घरी पोहोचल्यावर घडलेला वृत्तांत तिने आपल्या पतीस कथन केला असता आप्पारावांनी यथेच्छ टीका केली. परंतु भीमाबाईंना मात्र प्रभूंवर पूर्ण विश्वास होता.

पुढे काही मास उलटताच भीमाबाईंची कुस भरली. नवमास पूर्ण होताच तिला पुत्ररत्नाचा लाभ झाला. बाईच्या आनंदाला पारावार उरला नाही. प्रभू साक्षात दत्तात्रेय असल्याची पूर्ण खात्री झाली. तशी तिच्या अंतःकरणात साक्ष पटली. बाळंतपणातून उठल्यावर भीमाबाई पहिल्यापेक्षा जास्त उत्साहाने थाटाने प्रभू दर्शनास आली. त्यांची यथासांग पूजा करुन पुष्कळ दानधर्म केला. याप्रमाणे प्रत्येक पुत्राच्या आगमनानंतर भीमाबाई सर्व ऐश्वर्यासह येऊन प्रभूंच्या चरणी आपला नवस फेडीत होती.

## नवनवीन खेळांतून मुलांना चकीत करीत.

सर्व मुलांना प्रभूंचा सहवास आनंदाचा, उत्साहाचा आणि हवाहवासा वाटत असे. त्या सर्वांचे खेळ म्हणजे विविधता असे. नित्य कोणतातरी नविन खेळ निघायचा आणि इतर मुले त्यात दंग होत. त्या नविन खेळात ज्या काही  सहज गोष्टी घडून येत त्यांनी मुले चकित होऊन जायची. परंतु त्यांच्या बालमनाला कोणतीही चिकित्सा करण्याची तत्परता नसल्यामुळे त्याचा त्यांना विसर पडून मुले खेळात दंग व्हायची, प्रभूंसोबत रोज नवनविन खेळ खेळण्याचा आनंद फक्त ते लुटत असत. लपंडावाचा खेळ सुरु झाला की स्वतःवर लपायची पाळी आली की प्रभू लपून बसत ते दोन-तीन कोणा मुलाला सापडत नसत. मुले सर्व रान धुंडाळून काढीत परंतु प्रभूंचा थांगपत्ता लागत नसे. मग प्रभू हसत हसत जेथे लपत असत त्याच ठिकाणी मुलांना दिसत. त्यावेळी मुलांना फारच मौज वाटे.

मुलांच्या डोक्यावरील पागोटे वा धोतर सोडून प्रभू स्वतः झाडाला घट्ट बांधून घेत आणि मुलांच्या समोरच त्यातून अगदी सहजपणे निसटून बाहेर पडत. केव्हा केव्हा सर्व मुले आपले धोतर वा पागोटे एकत्र बांधून त्याने प्रभूंच्या कमरेभोवती घट्ट आवळून दोन टोकांवर उभे राहून दोन्ही बाजूंनी खूप खेचून ताणीत. प्रभूंना धोतरांच्या गाठीत जखडून ठेवण्याचा मुलांचा दात ओठ खाऊन, सर्व शक्ती पणाला लावून आटोकाट प्रयत्न असे. प्रभूंना त्या अवस्थेत पाहून मुले म्हणत, बरा सापडला! आता बघूया काय करतो ते! तोच प्रभू धोतराच्या शेजारी उभे असलेले दिसत. केवळ धोतरालाच घट्ट गाठ पडलेली दिसे. प्रभू हसत हसत उभे राहावे. मुलांनी पुन्हा पुन्हा प्रयत्न करावा पण प्रभूंच्या कमरेभोवती धोतराची गाठ कधीच पडलेली नसायची. प्रभू मात्र मोकळेच! मुले मात्र वारंवार चकितच व्हायची. पुन्हा खेळातच दंग व्हायची. त्यांच्या बालमनाला प्रभूंच्या लीला कळत नव्हत्या.

## एका खोडकर मुलाची खोड मोडली.

रानावनातील सर्व जीव-जंतू, पशु-पक्षी, साप-विंचूवर प्रेम असे. त्यांना त्रास देऊ नका अस सर्व मुलांना त्यांचे सांगणे असे. आपल्या प्रमाणे त्या जीवमात्रांनीही निर्भयपणे वनात विहार करावा अशीच प्रभूंची इच्छा असे. त्यांचे म्हणणे पुष्कळ मुलांना पटत असे. त्याप्रमाणे ते वागतही. परंतु काही खोडकर मुले आपल्या खोड्या करीतच असत. एके दिवशी अति वात्रट मुलाने आपला खोडकरपणा केलाच. एका गाभण असलेल्या म्हशीच्या अंगावर चढून तिला पळवू लागला. बिचाऱ्या त्या अवघडलेल्या म्हशीला खूप त्रास होऊ लागल्याने प्रभू त्या मुलास म्हणाले, अरे, नको करुस हे. तिला त्रास होतो आहे. परंतु तो मुलगा ते ऐकण्यास तयार नव्हता.

अखेर प्रभू त्यास म्हणाले, आता म्हशीच्या अंगाला हात तर लावून पाहा... मग... असे बोलताच तो उद्दाम मुलगा काय होते पाहू असे म्हणून त्याने म्हशीच्या पाठीवर आपले दोन हात ठेवले. तोच प्रभू उद्गारले, अरे ती म्हैस फार वाईट आहे, तुझे हात पकडून ठेवील. प्रभूंच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताच त्या वात्रट मुलाचे दोन्ही हात म्हशीच्या पाठीला चिकटून बसले. आणि म्हैस उधळली. तो मुलगा तसाच लोंबकळू लागला. म्हैस इकडे तिकडे पळू लागली. इतर मुलांना ती मोठी गंमत वाटली. सारी मुले त्याची मजा घेऊ लागली.

इकडे म्हैस पळते आहे आणि तो मुलगा लोंबकळत चालला होता. तो रडू लागला. मेलो, मेलो असे ओरडत म्हणू लागला, पुन्हा असे करणार नाही. मला यातून वाचवा. अखेर प्रभूंना त्याची दया आली. त्यांनी धावतच जाऊन म्हशीला थांबवून तिच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवून म्हणाले, बाई, तो मुलगा पुन्हा तुला त्रास देणार नाही. एकदा त्याला क्षमा कर. सोड त्याला. इतके म्हणताच मुलाचे म्हशीच्या पाठीवर चिकटलेले हात सुटले. साऱ्या मुलांना मौजच मौज वाटली. त्या मुलाला मात्र प्रभूंनी कायमची अद्दल घडवली.

**<u>काळंभटाचा निग्रह साध्य करुन दिला.</u>**

मेलगिरी भट हे गुलबर्ग्याचे रहिवासी. परंतु लहानपणापासून ते कल्याणास प्रभूंच्याच घरानजिक येऊन राहिले होते. प्रभूंपेक्षा तीन-चार वर्षांनी मोठे. तरी त्यांच्याविषयी मेलगिरींना फार प्रेम वाटत असे. वर्णाने खूप काळे असल्याने प्रभू त्यांना नेहमी 'काळ्या' या टोपणनावाने हाक मारीत असत.

एके दिवशी कोणा बाळंभट बरोबर शिवाच्या पुजेवरुन भांडण झाल्यामुळे प्रभूंनी त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे प्रत्यक्ष महादेवांचे दर्शन घडविले. काळंभट हे अतिशय गरीब! भिक्षुकीवर जे काही मिळेल त्यावर समाधानी असत. रोजचें जेवण आपल्या आतेच्या घरी होत असे. आतेच्या घरी ते पत्रावळी लावण्याचे काम करीत. पळसाच्या पत्रावळीवर जेवण्याचा प्रघात होता. कल्याणमध्ये वा आसपास पळसाची विपूल पाने मिळत. खूप सारी एका वेळेस घरी आणून नित्याच्या जेवणापुरती लागतील तेवढीच वापरायची. काही वेळा पाने कुजून जात. त्यात काळंभटाना पत्रावळी लावण्याचा कंटाळा येत असे. त्यात एके दिवशी कुजकी पाने लावण्यास मिळाली म्हणून त्यांनी यापुढे पत्रावळी न लावण्याचा निर्धार केला. झाले, आतेच्या घरातून, पत्रावळी लावल्या नाहीत तर जेवण मिळणार नाही, अशी तंबी मिळाली. अखेर घरचे जेवण बंद झाले. काळंभटांनीही प्रतिज्ञा केली, पत्रावळीचा टांका मोडणार नाही. परंतु ज्या दिवशी टांका मोडीन त्या दिवशी तुमच्या घरी जेवण करीन, आणि आतेचे घर सोडले.

काळंभट तसे निग्रही होते. त्यांनी पुढील आयुष्यास सुरुवात केली. तोवर श्रावण मास आला. आपले बिल्वार्चन पूर्ण झाल्यावर त्यांानी समाराधना करायची ठरवली. त्यासाठी पत्रावळींची आवश्यकता होती. तोवर काळंभटाची प्रतिज्ञा सर्वत्र पसरली होती. लोकांनी ठरविले, पत्रावळी शिवाय, हा कशा तऱ्हेने समाराधना करतो ते पाहू! त्यासाठी काही लोकांनी काळंभटाला कोठेही पत्रावळी मिळू नयेत याचा बंदोबस्त केला. दुकानदारही पत्रावळ देण्यास तयार होईना.

काळंभटांना तीव्र काळजी वाटू लागली आणि प्रभूंची भेट झाली. चिंतातूर काळंभटांना पाहून प्रभूंनी विचारले, काळ्या, कोणत्या काळजीत पडला आहेस ? प्रभूंचे प्रेमळ शब्द ऐकून काळंभटांनी गहिवरुन आपले दु:ख प्रभूंना सांगितले. ते ऐकून प्रभूंनी धीर देत म्हटले, मुळीच घाबरु नकोस. प्रभू सर्व चिंता दूर करील. एवढे आश्वासन देऊन ते निघून गेले.

ज्या दिवशी समाराधनेचे प्रयोजन होते त्या दिवशी सकाळीच दोन महार काळंभटांच्या घरी केळीच्या पानाचे बिंडे घेऊन दाखल झाले. त्यांना हाक मारुन सांगितले, गावच्या भाऊसाहेब कुळकर्ण्यांनी ही केळीची पाने आपल्यासाठी पाठवली आहेत असे म्हणून ते दोघे जाण्यास निघाले. केळीची बिंडे पाहून काळंभटास फार आनंद झाला. त्यांनी त्या दोघांना त्यांची नावे विचारली असता, एकाने 'भाव्या' व दुसऱ्याने 'माणक्या' असे सांगून ते निघून गेले.

त्या दिवशी काळंभटांचे प्रयोजन यथासांग पार पडले. त्यांनी त्या दोन महारांचा तपास केला. पण ते सापडले नाहीत. कारण जाताना ते जेवणास येतो असे म्हणाले होते. संध्याकाळ झाली तरी ते आले नाहीत. रात्री काळंभटांना झोप लागली नाही. सकाळी उठून ते गावात भाऊसाहेबांचे आभार मानण्यासाठी त्यांच्या घरी गेले.

आपण भाव्या व माणक्या या दोन महारांसोबत वेळेवर केळीची पाने पाठवलीत ती मिळाली व माझे प्रयोजन सफल झाले. या गरीबाकडून आपले ऊपकार कसे फिटणार! भाऊसाहेब हे ऐकून अवाक झाले व म्हणाले, तुम्ही काय म्हणता आहात ? कसली केळीची पाने ? माझी केळीची बागही नाही व आमच्या गावात केळीचे एकही झाड नाही. फार आश्चर्याची गोष्ट तुम्ही सांगता आहात. तुम्ही घेतलेली महारांची नावे, तसे कोणी माझ्याकडे कामाला नाहीत आणि अख्ख्या गावातही त्या नावाचे कोणी महारही नाहीत.

काळंभट या प्रकाराने हैराण झाले. ते कल्याणला परत आले. येथेही चार दिवस प्रभूंचा पत्ता लागला नव्हता. त्यांना चैन पडेना. प्रभूंच्या भेटीची तळमळ लागली असतानाच प्रभू समोर उभे राहिले. प्रसन्नतेने हसून म्हणाले, काळ्या, प्रभूने तुझी काळजी दूर केली. तुझ्यासाठी माझ्या प्रभूला महाराचे

सोंग घ्यावे लागले. ते ऐकून काळंभटाला रडू फुटले. ओक्साबोक्सी रडत त्याने प्रभूंचे चरण पकडले. ही सारी करणी याच प्रभूंची आहे याची खात्री पटली. जाताना प्रभूंनी म्हटले, काळ्या, ही गोष्ट कोणासही सांगू नकोस. त्या क्षणापासून काळंभटाचे मुख्य दैवत 'प्रभू' हेच झाले. पुढे माणिकनगरात त्यांचे मरेपर्यंत वास्तव्य होते. प्रभूंनी समाधी घेतल्यानंतर त्यांच्या समाधीसच बिल्वार्चन करण्याचा नेम चालू केला. मृत्यूपूर्वी आपल्या मुलांस प्रभूंविषयी कथन करुन श्रावण मासात प्रभूंच्या समाधीस अभिषेक व बिल्वार्चन करण्याचे सांगितले. मुलाने त्याप्रमाणे हे व्रत अखंड चालू ठेवले.

**भालचंद्र दिक्षितांची सत्व परिक्षा.**

कल्याणपासून आठ कोसांवर हळीखेड नावाचे गाव वसलेले आहे. तेथे भालचंद्र दिक्षित नामे अग्निहोत्री ब्राह्मण राहात होते. तत्कालीन विद्वानांत श्रेष्ठ व अग्रणी होते. पूर्वीच्या वैदिक परंपरेत त्यांच्या इतका विद्वान ब्राह्मण कुणीही नव्हता. वेदशास्त्रसंपन्न आणि सदाचार संपन्नही होते. विनम्रता अंगी बाणली होती. कधी कधी ते कल्याणला येत असत. मनोहर नाईकांशी त्यांचा घरोबा होता. जेव्हा कल्याणास येणे होई तेव्हा दिक्षित मनोहर नाईकांच्या घरी उतरत असत.

मनोहर नाईक निवर्तल्यानंतर एकदा ते कल्याणास आले होते. नेहमीप्रमाणे मनोहर नाईकांच्या घरी उतरले होते. बय्यमांनी त्यांचा आदरसत्कार केला. तेवढ्यात प्रभू त्यांच्या समोर आले. त्यांना पाहून ते चकितच झाले. त्यांचा दिव्य देह, त्याचा आकर्षणपणा पाहून ते काय ते समजून चुकले. इतक्यात बय्यमांनी प्रभूंची तक्रार केली. तो वेड्यागत चाळे करतो. त्याचे कशावरही लक्ष नसते. सदा रानावनात फिरत असतो. तुम्ही तरी त्याला हळीखेडास नेऊन नीट वळण लावा आणि काही शिकवा, अशी विनंती केली दिक्षितांनी प्रभूंना आपल्यासोबत नेण्याचे कबूल केले. प्रभूही निमूटपणे त्यांच्यासोबत हळीखेडास आले.

घरी आल्यावर दिक्षितांनी घरातील सर्व मंडळींना प्रभू कसेही वागले तरी त्यांना मज्जाव करु नये व काही बोलू नये अशी सक्त ताकिद दिली.

येथे आल्यावरही प्रभूंचे नित्य वर्तन चालूच राहिले. उलट या ठिकाणी त्यांच्या स्वैराचारास मोकळीकच मिळाली. दुपारच्या वेळी कशाही स्थितीत प्रभू घरी आले तरी दिक्षितांनी सोवळे न पाळता प्रभूंना शिवून स्वच्छ स्नान घालून गंध लावायचे आणि आपल्यासोबत जेऊ घालायचे. प्रभूंनी अनेक प्रकारे दिक्षितांची परिक्षा घेतली. तेही प्रभूंच्या परिक्षेत उतरले.

शेवटी प्रभूंनी काय केले? दिक्षितांच्या अग्निकुंडातच प्रातर्विधी केला. या प्रकाराने संतापून दिक्षितांच्या पत्नीने मात्र त्यांच्याकडे तक्रार केली असता शांत राहून दिक्षित म्हणाले, प्रभू हे असं करणार नाहीत. शौच केला असेल तर काढून दाखवा, म्हणजे मी सत्य मानेन. त्यावर बाईंनी कुंडात हात घालताच त्यांच्या हाती सोन्याचा एक गोळा लागला. त्याही आश्चर्यचकित झाल्या.

दिक्षितांची आपल्या बद्दलची प्रेम भावना पाहून प्रभू सद्‌गदीत झाले, व म्हणाले, दिक्षित आपण मला आपल्या प्रेमाने कायमचे जखडून टाकलेत. तुमच्या घराण्यावर माझी कायम कृपादृष्टी राहिल.

पुढे दिक्षितांचे चिरंजीव नारायण हे प्रभूंच्या पट्टशिष्यात एक होऊन राहिले. त्यादिवसापासून दिक्षित हे दिवसागणिक अधिक धनसंपन्न होऊन गेले. सदा आनंदी, शांत, समाधानी राहिले. प्रभू काही काळ दिक्षितांकडे राहून त्यांच्याच अनुज्ञेने व आनंदाने कल्याणास परतले.

## नृसिंहतात्यांच्या मुंजीदिनी चमत्कार.

प्रभूंच्या अनेक लीलांमुळे दिवसेंदिवस त्यांचा नावलौकिक वाढत चालला होता. परंतु घरात मात्र काही फरक नव्हता. रोजची ओढाताण तर होतच होती. शिवाय थोरले बंधू हणमंतराव यांची कमाईही तुटपुंजीच होती. त्यामुळे मामांकडून मदतीची गरज भासे. नृसिंहतात्या सहा वर्षांचे झाले होते. मुंज करणे जरुरीचेच होते. पण घरी तितकासा पैसा नव्हता. मग इतर सामान तरी कसे उपलब्ध होणार होते?

बय्यमांना फार काळजी लागून राहिली होती. प्रभूंनी आपल्या मातेचा विचार ओळखून घरानजिक असलेल्या सोमेश्वराच्या मंदिरात जाऊन गणपती समोर आसन घालून बसले. आता हा गणपतीच आमच्या तात्याची मुंज निर्विघ्नपणे पार पाडेल. सायंकाळपर्यंत प्रभू तेथेच बसून होते. काय लीला आहे पहा! सगुणरुपातील परमेश्वरच परमेश्वराला साकडे घालतो आहे!

तशी लीला झालीच! संध्याकाळी कोणी व्यंकप्पा नामे एक वैश्य (जातीने हा धनको) अचानक मंदिरात आला. त्याच्या सोबत मुलाचे बाळलेणे, कपडे आणि कमीत कमी चारशे माणसांना भरपेट पुरेल इतके जेवणाचे सामान घेऊन त्याचा नवस फेडण्यास आला होता. त्याने मुलगा व्हावा म्हणून प्रभूंना नवस केला होता. तो फेडण्यास मंदिरात आला. आपल्या जवळील सर्व सामान त्याने प्रभूंच्या चरणांपाशी ठेवले व त्यांची पूजा केली. आणि आल्या पावली निघून गेला.

प्रभूंची लीला पहा! व्यंकप्पाने आणलेले बाळलेणे व कपडे तात्याला बरोबरं झाले. आणखी एक

गोष्ट, मुंजीस हवे होते तितकेच सामानही होते. हा सर्व प्रकार बय्यमांना समजताच त्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. मुहूर्त निश्चित होऊन तात्यांची मुंज (प्रभूंच्या वाक्याप्रमाणे) निर्विघ्नपणे पार पडली. प्रभूंनी हे सारे श्रेय गणपती बाप्पाला अर्पण केले. तिसरी आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे थोरले बंधू हळीखेडास आपल्या पत्नीस आणण्यास गेले होते. तेही वेळेवर येऊन दाखल झाले. मुंजीत कसलेही न्यून राहिले नाही. सारे काही अगोदरच प्रभूंनी योजून ठेवले होते.

**<u>प्रभू जणकल्याणासाठी घराबाहेर पडले.</u>**

प्रभूंच्या घरचा योगक्षेम त्यांच्याच सामर्थ्यावर चालला होता याची कल्पना घरी कोणालाही नव्हती. गरजेपुरते मिळत होते पण ओढाताण चालूच होती. प्रपंच करण्यासाठी संग्रह असावा लागतो तो मात्र मुळीच नव्हता. बऱ्याच अंशी याचा त्रास मामांना होत असे. प्रभूंचे उद्योग त्यांना पसंत नव्हते. आपल्या भाच्याने काहीतरी उद्योग करुन धनसंपदा कमवावी, लौकिक तसेच मान मिळवावा ही त्यांची अपेक्षा! त्यात काही चुकीचे नव्हते. त्यांचे म्हणणे असे, आळशी माणसे देवावर सर्व भार टाकून काठ कंठित जातात. परंतु प्रभूंचा व्यवहार व प्रपंच अगदी भिन्न होता. तो कोणला समजत नव्हता.

प्रभू कधी कधी मामांच्या घरी जाऊन राहत असत. एकदा ते तेथे असताना एक घटना घडली. (ती तर प्रभूंचीच लीला होती.) त्यामुळे पुढील लोकोध्दाराचे कार्य सुरु झाले.

त्याचे असे झाले, प्रभू मामांच्या पलंगावर दुशाला पांघरुण स्वस्थ झोपले होते. मामा बाहेरुन घरी आल्यावर पाहतात तो वेडा भाऊ झोपलेला दिसला. मामांच्या हाती आयतेच कोलीत मिळाले. याची कान उघडणी करण्याची हीच नामी संधी आहे असा विचार करुन त्यांनी प्रभूंना झोपेतून उठवून निर्भत्सना करण्यास सुरुवात केली. तू कोण? तुझी लायकी काय? याचा जराही विचार न करता जहागिरदाराप्रमाणे ऐश्वोरामात निजला आहेस. अरे तुला जराही लाजलज्जा नाही का? एवढा मोठा १६ वर्षांचा घोडा झालास, अजूनही रोजीरोटी मिळविण्याची तुझ्यात अक्कल नाही. दुसऱ्यांनी कष्ट करावे आणि आपण आरामात खावे, याची थोडीसी लाज वाटली असती तर काहीतरी मेहनत केली असतीस. तुझ्यात बुध्दीमत्ता आहे पण तुला शिकायला नको. देहवृष्टीही चांगली आहे पण कष्ट करायला नको. हणमंत काबाडकष्ट करतो आहे व तुझी भर करतो आहे आणि अम्मा तुझ्यासाठी राबराबराबते आहे. त्याचे तुला काहीही नाही. मग तुझ्या कुटुंबासाठी मी तरी का दु:खी व्हावे? आता या क्षणापासून तुला माझ्या घरात आसरा मिळणार नाही. इतके दिवस तुम्हांला मदत करीत आलो ते सर्व वाया गेले. येथून चालता हो! तुझे अन्नपाणी बंद झाल्याशिवाय तुझे डोळे उघडणार नाहीत. चल चालता हो!

मामांचे हे बोल प्रभूंच्या जिव्हारी लागले असतील काय ? आपण आता निराधार होणार म्हणून त्यांना रडू फुटले काय ? एकार्थी मामांची कान उघडणी व्यावहारिक दृष्ट्या रास्तच होती.

मामांची ही दुरुक्ति प्रभूंच्याच भावी कार्यास उपकारक ठरणारी होती. प्रभूंच्या मामांच्या बिछान्यावर झोपणे व मामांचा क्रोध ही प्रभूंचीच योजना असावी, हे भक्तांच्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. कारण मामा हे पक्के व्यवहारी होते. त्यांना परमार्थ वैगरे काही समजत नव्हता. प्रभूंच्या पुढील कार्यास मामांचाच हातभार लागणार होता. म्हणून वरील घटना घडून आली. ती संधी प्रभूंनाही हवी होती. ती अनायासे प्राप्त झाली.

मामांच्या अद्वातद्वा बोलण्यावर प्रभूंची प्रतिक्रिया काय उमटली असेल ?

अत्यंत शांत व प्रसन्नतेने प्रभूंनी नेसलेले धोतर फाडले व त्याची लंगोटी घातली. मामांना आदराने नमस्कार करुन म्हटले, ज्या प्रभूने हा देह मातेच्या उदरात नऊ महिने सांभाळला, त्या प्रभूशिवाय दुसरा कोणीही वाली या जगात नाही. ज्याने मला जन्म दिला आहे तोच माझा समर्थपणे सांभाळ करील. आपण विनाकारण दु:खी होऊ नका. आपला आशिर्वाद माझ्या मस्तकी राहू द्या. मी येतो !

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे प्रभूंच्या मुखी लहानपणापासूनच प्रभू शब्द सदासर्वदा येत असे. या शब्दाला पुढे महत्व येऊन त्यांच्या 'माणिक' नावापुढे जोडला गेला आणि सर्व त्यांना 'माणिकप्रभू' म्हणूनच ओळखू लागले. माणिकप्रभू या नावानेच त्यांचा नावलौकिक झाला.

या घटनेपर्यंतच प्रभूंचा कल्याणासी संबंध होता. आता त्यांनी कल्याण सोडून जगकल्याण हाती धरले होते. जरी प्रभूंनी कल्याण सोडले असले तरी कल्याणच्या लोकांनी प्रभूंना मुळीच सोडले नाही. प्रभूंच्या आवडत्या पट्टशिष्यांमध्ये कल्याणच्याच लोकांचा अधिक भरणा होता.

## प्रभूंचे जगत् कल्याणासाठी भ्रमण.

कल्याण पासून तीन कोसावर 'मंठाळ' नावाचे गाव होते. या गावानजीकच चंडकापूर हे गाव वसले आहे. त्याच्या सीमेत 'अमृतकुंड' नावाचे प्रसिध्द आणि अत्यंत प्राचीन तीर्थ आहे. आर्य संस्कृती वैभवात असताना या पवित्र तीर्थावर अनेक तपस्वींनी घोर तपश्चर्या करुन या तीर्थाचा महिमा वाढविला. हल्लीच्या काळी यास 'अंबिलकुंड' असे अपभ्रष्ट नाव प्राप्त झाले आहे. याचे कारण कुंड वाहते आहे. परंतु खाली पुष्कळ गाळ साठून राहिल्यामुळे स्नान करते समयी तो गाळ वर येऊन पाणी गढूळ बनते व त्याला अंबिलेप्रमाणे रुप चढते. त्यावरुन त्याला 'अंबिलकुंड' असे नाव प्राप्त झाले. या कुंडापासून पाच

मैलावर सोमण्याचे मंदिर आहे. त्याशिवाय उत्तर दिशेला मैलभर अंतरावर सीतेची न्हाणी, सीतेची गुंफा ही आहे. न्हाणीचे वैशिष्ट्ये असे, सभोवताली लाल रंगाची भूमी पसरलेली असली तरी न्हाणीतील जल ताकाच्या पाण्याप्रमाणे शुभ्र व नितळ आहे.

ज्या अंबिलकुंडाचा येथे उल्लेख झाला, त्याच्या दर्शनास मंठाळ गावचे एक सद्‌गृहस्थ कुळकर्णी आवर्जून येत. नित्याप्रमाणे ते श्रीशंकराच्या दर्शनास आले असता प्रदक्षिणा वाटेजवळच पण थोड्याशा अंतरावर त्यांना एक तेज:पुंज कांतीचा तरुण नजरेस पडला. केवळ लंगोटी, सर्वांगाला भस्म असे त्याचे रुप पाहून कुळकर्णींना साक्षात श्रीशिवच वाटले. त्यांचे कुतुहल वाढले. तो तरुण कोण आहे ? कोठून आला आहे ? आणि या भयंकर निर्जन अरण्यात कशासाठी आला आहे, याची चौकशी करण्याकरिता कुळकर्णी त्या मुलाकडे चालू लागताच तो तरुणही पुढे पुढे चालू लागला. त्याच्या मागोमाग कुळकर्णी तसेच चालू लागले असता तो तरुण एका ओढ्याच्या पलीकडील झाडीत जाऊन दिसेनासा झाला. त्याला शोधण्याकरिता कुळकर्णी पुढे जाऊ लागताच थोड्या दूर अंतरावर एक व्याघ्र गुरगुरत उभा असलेला दिसला. आता मात्र कुळकर्णींची पाचावर धारण बसली. पुढे जाणे थांबवून प्रथम आपला जीव वाचवण्यासाठी ते शीघ्र गतीने माघारी फिरले व तडक मंठाळ गावी आले. परंतु त्या तरुणाचे तेजस्वी रुप कुळकर्णींच्या अंत:करणात घर करुन बसले. त्यांच्या मनी अनेक प्रश्न उमटू लागले. तो तरुण परमेश्वरी अवतार तर नाही ना! त्याला वाघाची भीती वाटली नाही का ? कारण माझ्या समोरच तो वाघ उभा असल्या ठिकाणीच गेला होता. सामान्य तरुण असता तर ‘वाघ वाघ’ असे मोठ्याने ओरडून मागे फिरला असता! नाही! काही तरी दैवी शक्ती त्या तरुणापाशी असली पाहिजे. अथवा तोच ईश्वर असला पाहिजे. कारण त्याच्या ठिकाणी मला श्रीशंकराचे दर्शन झाले. कुळकर्णींच्या मनाला त्या स्थानाची ओढ लागून राहिली. परंतु वाघाच्या भयाने त्यांचे पाय अनेक दिवस अंबिल कुंडाकडे वळले नाहीत.

पुढे दोन महिन्यांनी एक वेडसर तरुण काठीचा घोडा करुन मंठाळ गावी आला. तेथील मुलांना ते दृश्य पाहून नवल वाटले. सारी मुले त्याच्या भोवती जमा झाली. त्यांच्यासह तो वेडसर तरुण कुळकर्णींच्या घरी आला. कुळकर्णी मुलांच्या आवाजाने बाहेर आले आणि काही क्षण स्तंभितच झाले. भानावर येताच त्या वेडसर दिसणाऱ्या तरुणाला त्यांनी ओळखले. हा तर कल्याणचा ‘माणिकप्रभू!’ यालाच आपण अंबिलकुंडावर पाहिले. त्यांना अत्यानंद झाला. त्या आवेगात त्यांच्या मुखातून निघाले, कल्याणचे माणिकप्रभू आपल्या गावी प्रकटले. हा हा म्हणता त्याची खबर सर्वत्र पसरली. जो तो हातातील काम टाकून प्रभूंच्या दर्शनास येऊ लागले.

त्याचवेळेस कुलकर्णींच्या घरी त्यांचे कुटुंब अडले होते. त्याना फार काळजी वाटू लागली. अनेक उपाय केले गेले पण उपयोग होईना. कुळकर्णी घाबरल्यावस्थेत असतानाच त्यांच्या समोर प्रभूंची मूर्ती होती. त्यांनी प्रभूंना प्रार्थना करुन आपली अडचण सांगितली. तात्काळ प्रभू म्हणाले, चार ब्राह्मणांचे तीर्थ बाईंना आताच्या आता द्या, लगेच सुटका होईल. प्रभूंची वाणी ती. कुलकर्णींना प्रत्यक्ष अनुभव दिला. त्यांच्या कुटुंबाची सुटका होऊन त्यांना पुत्र रत्नाचा लाभ झाला. मग काय! या गोष्टींचा बोलबाला सगळीकडे होऊन प्रभूंजवळ गर्दी होऊ लागली. प्रभूंनी मात्र काठीच्या घोड्याला टाच मारली. त्यांचा पाठलाग कोण बरे करु शकणार होते ?

इकडे कल्याणहून प्रभू एकाएकी गायब झाल्याचे पाहून घरची सर्व मंडळी शोकाकूल होऊन गेली मामांना तर फार दुःख झाले प्रभूंचे सवंगडीही दुःखात बुडाले. सर्वांनीच प्रभूंना शोधण्याचे आटोकाट प्रयत्न केले. प्रभूंचा शोध लागला नाही. चारेक महिन्यांनी घरच्या मंडळींना खबर लागली की प्रभू मंठाळ येथे आहेत. प्रभूंच्या मामांनी आपल्या बहिणीस बय्यमांस, हणमंतदादा व नृसिंहतात्यांना घेऊन मंठाळ गाठले. तेथे एकदाच प्रभू येऊन गेल्याचे समजताच सारी मंडळी अंबिलकुंडाकडे आली. तेथेही त्यांचा मागमूस लागला नाही. सीतेच्या गुंफेकडे जाऊन तपास केला तेथेही नाही! सर्वजण कंटाळून गेले व त्यांनी आपला मुक्काम मंठाळ गावी ठोकला. अंती प्रभूंनाच सर्वांची दया आली व ते अंबिलकुंडावर प्रभू प्रकट झाले.

हे वर्तमान मंठाळी गावी पोहोचताच एकुण एक मंडळी अंबिलकुंडापाशी आली. प्रभूंची भेट झाली. आपल्या भक्तांसाठीच ते प्रकट झाले होते. सर्वत्र आनंदाची लहर उठली. प्रभू तेथे येताच मंगलमय वातावरण निर्माण झाले. प्रभूंच्या दर्शनास रोज शेकडो लोक येऊ लागले. भोजनाच्या पंगतीच्या पंगती उठू लागल्या. साक्षात भगवंत जेथे तेथे अन्नपूर्णा कशी नांदणार नाही. इतकेच काय, त्या निर्जन स्थानी, पेढे, खारीक, नारळ, खडीसाखर इत्यादी वस्तूंची दुकानेही थाटली गेली. हा नयनरम्य सोहळा पाहून प्रभूंचे मामा दंग होऊन गेले. प्रभूंचे अचाट सामर्थ्य घरच्या सर्व मंडळींना पटून सर्वांनीच प्रभूंबद्दल धन्योद्गार काढले. सर्व प्रभूंचरणी येताच त्यांनी त्यांची समजूत काढून कल्याणास परत जाण्यास सांगितले. आमची अपेक्षा करु नका. प्रपंचाचे कामी नृसिंहाची योजना आहे. त्यांचे म्हणणे मानून प्रभूंच्या इच्छे आड येऊ नये म्हणून घरची मंडळी कल्याणास परतली.

आता प्रभूंचे स्वतंत्र कार्य सुरु झाले होते तेही अंबिलकुंडापासूनच. येथे सहा महिने प्रभूंचा निवास होता. कधी गुप्तपणे तर कधी प्रकट होऊन! त्यामुळे काय झाले, या स्थळी लोकांचा समुदाय जमू लागला. प्रभू नामाचा जयजयकार होऊ लागला. निर्जन, ओसाड असे हे स्थान भक्तांनी फुलून गेले.

पूजन, अर्चनाने आसमंत निनादून जाऊ लागला. वर उल्लेख केल्याप्रमाणे भोजनाच्या पंगती उठू लागल्या. त्यातही गंमतीचा भाग असा भक्तजणांना रोज पंचपक्वांनाची जणू मेजवानीच मिळू लागली. त्याचे कारण असे, अंबिलकुंडाच्या आसपासच्या खेड्यापाड्यातील लोक आनंदाने, प्रेम भावनेने प्रभूंसाठी निरनिराळे पदार्थ करुन आणायचे व प्रभूंना अर्पण करायचे. प्रभूही त्यांच्या भक्तीभावावर प्रसन्न होऊन त्याचा आस्वाद घ्यायचे आणि ते विविध पदार्थ लोकांना जेवणाबरोबर वाढले जायचे. असे नाना प्रकारचे रुचकर खमंग पदार्थांची चव चाखताना सर्वांनाच फार मौज येई. त्यावेळेपासून त्याला नाव पडले 'बुत्ति जात्रीस' ! हा कानडी शब्द आहे. याचा अर्थ वाढपाची जत्रा असा होतो.

प्रभू या स्थळी आनंदाने आपल्या भक्तांसह रहात होते. मध्येच चार आठ दिवस गुप्त होत. त्यांचा पत्ता शोधणार कोण ? तरीही जमलेले शेकडो लोक प्रभूंच्या आगमनाची प्रतिक्षा करीत तेथेच थांबून रहात. सर्वांनाच प्रभूंच्या सहवासात निर्भयता मिळत असे. यात कोणी आर्त असत, कोणी जिज्ञासू, कोणी अर्थार्थी तर कोणी ज्ञानी असत. हे चतुर्विध पुरुष प्रभूंच्या सहवासात येण्यास अंबिलकुंडापासूनच सुरुवात झाली.

प्रभू कल्याणहून निघताना एक विलक्षण गोष्ट घ्डली होती. एका पत्राद्वारे त्या घटनेचा उलगडा झाला होता. हे पत्र चित्तापूरचे विठ्ठलराव पेशकार यांनी लिहिलेले आहे. (त्यांच्या वडिलांनी ही गोष्ट त्यांना सांगितली होती.) त्या पत्रामुळेच ही हकीकत कळली गेली.

कल्याणहून मामांच्या कारणाने प्रभू घर सोडून निघाले ते अंबिलकुंडाच्या दिशेने त्यांच्या मागोमाग विठ्ठलरावांचे वडिल (यांचे नाव उपलब्ध नाही) व आणखी एक सद्‌गृहस्थ अंबादसराव कुळकर्णी (हे राहणारे प्रतापपूर नजिक निकपे गावचे) हे दोघेही निघाले. हे दोघे प्रभूंचे खेळगडी! प्रभू जेव्हा मंठाळनजीकच्या अरण्यात शिरले तेव्हा या दोघांनी तिकडे जाऊ नको असे सांगितले. तेव्हा प्रभूंनी त्यांना म्हटले, फिकीर करु नका. माझ्या मागे या. तुमचा भाग्योदय होईल. त्यांचे ऐकून ते दोघे प्रभूंसोबत निघाले. काही अंतर गेल्यावर त्यांना (तिघांना) एक शिळा दृष्टीस पडली. ती या तीघांनी मिळून खाली पाडली व सर्व तिच्या आतील गुहेत शिरले. आत सगळीकडे अत्यंत स्वच्छता दिसून येत होती. थोड्या अंतरावर एक आगही दिसली. तिच्या शेजारी एक चिमटा पडलेला होता. घाटीतील राख रसरशीत होती. तिघे थोडे पुढे जाताच पहिल्यापेक्षा मोठी अशी एक काळी शिळा दिसली. विठ्ठलरावांचे वडिल व कुलकर्णी यांनी ती शिळा पाडण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. पण यश येईना. शेवटी प्रभू म्हणाले, बस झाले. फक्त माझ्या धोतराचा पदर घट्ट पकडून ठेवा. भिऊ मात्र नका, असे म्हणून प्रभूंनी शिळेला एक जोरदार हिसडा देताच ती प्रचंड काळी शिळा उलथून पडली. तोच आतून एक भयंकर गर्जना ऐकू

आली. हा वाघच असणार हे जाणून ते दोघे घाबरुन गेले. व त्यांनी प्रभूंच्या धोतराचा पदर सोडून मागच्या मागे पलायन केले. पळता पळता त्यांना पुन्हा वाघाची डरकाळी ऐकू येऊन काहीतरी धाडकन पडल्याचा आवाजही ऐकू आला. बहुतेक वाघाने झडप घालून प्रभूंना खाल्ले असावे. भीतीने विठ्ठलरावांच्या वडिलांची व कुळकर्णींची अवस्था आणखी बिकट झाली. ते दोघे जे पळत सुटले ते कल्याणला येऊन थडकले. हा पाहिलेला वा अनुभवलेला प्रकार कुणाला सांगण्याची त्यांची हिम्मत झाली नाही. त्यानंतर बराच काळ होऊन गेला आणि त्यांना अंबिलकुंडाची बातमी समजली. परंतु तेथे जाण्याचे त्यांना धैर्य होईना. अखेर काही लोकांसमवेत बरोबर दशम्या घेऊन दोघेही निघाले. अंबिलकुंडाजवळ येताच त्यांना मागे घडलेल्या घटनेचे स्मरण होऊन त्याबाबतच बोलत ते दोघे चालत असतानाच प्रभू त्यांच्यासमोर येऊन उभे ठाकले त्यांना वाघाच्या गुहेतून जीवंत बाहेर पडल्याचे पाहून अचंबित झाले. पूर्वीपेक्षाही प्रभूंची कांती, त्यांच्या चेहरा तेजस्वी व प्रफुल्लीत झालेला दिसला. ते प्रभूंना म्हणाले, तुम्ही जीवंत कसे ? वाघ तर समोरच होता ! त्यावर प्रभू हसून म्हणाले, तुम्ही घाबरुन पळून गेलात. माझ्या सोबत राहिला असतात तर त्याचे मर्म तुम्हांला समजले असते. आता काय उपयोग ? नंतर त्या दोघांनी प्रभूंसह अंबिलकुंडात स्नान केले. व एका बाजूस बसून बरोबर आणलेल्या दशम्या खाण्याची प्रभूंना विनंती केली. तोच समोरुन एक बैरागी येताना दिसला. हाती एक कटोरा व काखेला झोळी लटकत होती. देहवृष्टी अत्यंत तेजस्वी होती. त्याच्या सोबत दोन कुत्र्या होत्या. त्या बैराग्याला पाहून प्रभू म्हणाले, आज महाप्रसाद ग्रहण करण्यास मिळणार आहे. तो प्रथम घेऊया मग दशम्या खाऊ या !

प्रभूंचे म्हणणे त्या दोघांच्या लक्षात आले नाही. बैरागी या तिघांच्या जवळ आला. त्याने आपल्या जवळील कटोऱ्यात कुत्र्यांचे दूध काढले व झोळीतील भाकरीचे तुकडे त्यात घालून कालवले. जवळच एक मृत साप पडलेला होता तो ही उचलून बैराग्याने त्या कटोऱ्यात टाकून भाकरीसोबत कालविला. हे दोघे हा विक्षिप्त प्रकार पाहत होते. सर्व पदार्थ कालविल्यानंतर मुठभर काला बैराग्याने प्रभूंच्या हातावर दिला. त्याप्रमाणे ह्या दोघानांही. प्रभूंनी क्षणात तो काला तोंडात घालून खाऊन टाकला. परंतु प्रत्यक्ष किळसवाणा प्रकार पाहिल्यामुळे त्या दोघांनी तो काला आपापल्या हातात तसाच धरुन ठेवला. बैराग्याने कटोऱ्यात राहिलेला काला शांतपणे खाल्ला व निघून गेला. प्रभूंनी त्या दोघांना काला खाल्ला का म्हणून विचारले असता, आमच्या मुठीत आहे असे सांगितले. प्रभूंनी विचारले, दाखवा ! म्हणून त्या दोघांनी आपल्या मुठी उघडल्या आणि पाहतात तर मुठीत काही नव्हते. प्रभू एवढेच म्हणाले, आताही तुमचे भाग्य नाही त्याला तुम्ही तरी काय करणार ?

बैरागी कोठून आला ? कोठे गेला हे विठ्ठलरावांच्या वडिलांना व कुळकर्णींना समजले नाही. दुसरी गोष्ट त्यांनी आपल्या हाती तो काला घेतला होता, त्याचे काय झाले ? तो कुठे गायब झाला ? याची उत्तरे त्यांना मिळाली नाहीत.

मग कोण होता तो बैरागी ? बैरागी नसून ते साक्षात दत्त महाराज होते. या घटनेवरुन जनार्दन स्वामींची गोष्ट आठवते. आपल्या लाडक्या शिष्याला ज्याला जनमानस एकनाथ महाराज म्हणून ओळखतात. या शिष्याला जनार्दन स्वामींनी दत्त महाराजांची भेट घडवून देतो असे आश्वासन देऊन अरण्यात आणले होते. तेथे एका पठाणाच्या वेशात येऊन दत्तप्रभूंनी अशातऱ्हेची (तो प्रकार थोडा वेगळा होता) किळसवाणी गोष्ट करुन जनार्दन स्वामींना प्रसाद दिला होता. व एकनाथांनाही खाण्यास सांगितले होते. त्यावेळी एकनाथांनीही तो प्रसाद खाल्ला नव्हता.

विठ्ठलरावांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे; हे अद्‌भूत कथानक मला वडिलांनी सांगताना असेही म्हटले होते, प्रभूंनी आपल्या मातोश्रीस 'आ' पसरुन आपल्या मुखात दत्तात्रेयांचे रुप दाखविले होते.

या अमृतकुंडावर सहा महिने प्रभूंचा निवास होता हे मागेच आलेच आहे. मधल्या काळात कल्याणच्या लोकांच्या विनंती व आग्रहानुसार प्रभू पुन्हा कल्याणास आले पण अल्प काळापर्यंत! प्रभू कोठेही गेले तरी त्यांच्यासोबत मोजके शिष्यगण असायचे. हे सर्व कल्याण व त्याच्या आसपासचे असायचे. यात चिमाजी नावाचा शिष्य सदोदित प्रभूंसोबत असे. सटका व झोळी याची प्रथम दीक्षा प्राप्त करणारा तोच ब्रह्मचारी होता.

आपल्यासोबत सतत रहाणाऱ्या, समागम करणाऱ्या सर्व शिष्यवर्गाला सौख्य मिळून त्यांची पारमार्थिक उन्नती व्हावी अशी योजना प्रभूंची असे. प्रभूंचे सारे शिष्यही आपले आचरण नीट पाळून त्यातही ब्रह्मचर्य कडकडीत पाळून प्रभूंनी दिलेले साधन करण्यास तत्पर असत. प्रभूही त्यांची योग्य काळजी घेऊन त्यांना मानसिक तथा शारीरिक पीडा होऊ नये अशी योजना करीत.

एकदा एका शिष्याच्या पोटात दुखू लागले. पोटातील वेदना असह्य होऊन तो जमिनीवर गडाबडा लोळू लागला. कसल्याही उपायांनी त्याला स्वास्थ मिळेना. अखेर प्रभूंना ही गोष्ट सांगण्यात आल्यावर ते त्याच्याकडे आले आणि आपला हात त्याच्या पोटावरुन फिरवताच क्षणात त्याच्या वेदना थांबून तो तात्काळ बरा झाला.

अशाप्रकारे अनेक लोक प्रभूंकडे येत होते. प्रत्येकाच्या व्याधी, आजार प्रभू दूर करुन त्यांना संतोष देत. काही पिशाच्चबाधी येत त्यांचीही सुटका होई. काही जणांचे दारिद्र्य दूर झाले काहींना अपत्य प्राप्ती झाली. अशा अनंत गोष्टी नित्य घडत होत्या. अशा तऱ्हेने प्रभूंचे सामर्थ्य सर्वदूर पसरले गेले.

त्यांच्या दर्शनासाठी जनसमूदाय लोटू लागला. दत्तप्रभूंची झोळीच प्रभूंजवळ होती, मग कमतरता कशाची होणार होती ?

**नृसिंहतात्यांच्या लग्नाची गोष्ट.**

मागील प्रकरणात उल्लेख झाला होता, प्रभू पुन्हा कल्याणास येऊन राहिले होते. तेव्हाची ही गोष्ट !

प्रभूंच्या घरची परिस्थिती तशी दयनीयच होती. वडिलबंधू हणमंतदादांची साध्वी व परम भाविक पत्नी अकस्मात निधन पावली, त्या वियोगाने हणमंत तीर्थयात्रेस निघून गेले होते. तत्पूर्वी प्रभूंची भगिनी चिमणाबाईही जग सोडून निघून गेली होती. त्यामुळे घरचे वातावरण शोकाकूल अवस्थेतच होते. त्याच समयास प्रभू आपल्या गावी परतले होते.

अमृतकुंडाच्या महात्म्यानंतर कल्याणातील लोकांची श्रध्दा प्रभूंवर अधिक दृढ झाली आणि आता प्रभू कल्याणातच होते. त्यामुळे सर्वांना धन्यता वाटत होती. मात्र प्रभूंच्या घरी फक्त धाकले बंधू नृसिंहतात्या व मातोश्री बय्यंमा हे दोघेच रहात होते. असे सांगितले जाते की प्रभूंचे मामा हणमंतदादा यांच्या सोबत तीर्थाटनास निघून गेले.

नृसिंहतात्याचे शिक्षण जोमात चालले होते. लहानपणापासूनच ते हुशार असल्याने त्यांचा विद्याभ्यासाकडे पूर्ण लक्ष होते. प्रभूंच्या मातोश्रींचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. केवळ तेच त्यांचा एकमेव आधार होते.

प्रभू कल्याणास आल्यावर बहुतेकांना आनंद झाला होता. गावातील जसे प्रभूभक्त होते तसेच निष्कारण वैरभाव धरणारे लोकही होते. त्यांचा एक कंपूच होता. प्रभूंची वेळीअवेळी कुचेष्टा, टवाळी करण्यास त्यांना धन्यता वाटे. त्यांच्या कंपूत लक्ष्मणराव नावाचे गृहस्थ होते. त्यांच्यावर दबाव टाकून म्हणा वा त्यांना नको ते पढवून म्हणा या टवाळखोर कंपूने प्रभूंची खोड काढण्याचे ठरविले. त्याप्रमाणे एके दिवशी लक्ष्मणराव प्रभूंच्या दर्शनास आले. इतरही (कंपूतील) लोक त्यांच्या सोबत होते. तसे लक्ष्मणराव प्रभूंच्या दर्शनास येत असत. पण ते वरकरणी असे. काही गप्पा गोष्टी झाल्यावर लक्ष्मणरावांनी नृसिंहतात्याच्या लग्नाचा विषय काढला. नृसिंहतात्या आता वयात आले आहेत, त्यांचा विवाह का करीत नाही ? तेव्हा प्रभू म्हणाले, आम्ही चालते बोलते फकीर ! आमच्या कडे ना धन ना द्रव्य ! ना घर ना शेत ! मग आमच्या तात्याला मुलगी कोण देणार ?

लक्ष्मणराव म्हणाले, असे कसे होईल ? कोण मुलगी देणार नाही ! लग्नाला लागणारा सर्व खर्च

करण्यास आपण तयार असलात तर कोणीही मुलगी देईल.

योग्य खर्च म्हणजे किती ? असे प्रभूंनी विचारताच लक्ष्मणरावांनी त्याची यादी सांगितली. पाचशे रुपयापर्यंत सोनेनाणे, दोनएकशे रुपयांची चांदी, तेवढ्याच रुपयांची कापडे आणि चारएकशे रुपये अन्नाचा खर्च ! इतकी तयारी असावयास हवी !

प्रभूंनी उत्तर दिले, इतका खर्च करण्यास आम्ही तयार आहोत. तर मग झाले, मी माझी धाकटी बहिण नृसिंहतात्यांना देण्यास तयार आहे. अनेक माणसे तेथे जमली होती. त्यांच्यासमोर लक्ष्मणरावांनी कबूली देऊन चुकले. कारण त्यांची खात्री होती प्रभूंजवळ इतका पैसा व सामुग्री मुळीच नाही. कारण आताच्या स्थितीत हणमंतदादा नव्हते. शिवाय मदत करण्यास मामाही नाहीत. प्रभूंजवळ काय आहे. एक लंगोटी व काखेत झोळी ! शिवाय कोणाकडे कर्ज मागण्यास गेले तरी या बैराग्यास कोण कर्ज देणार ? तेव्हा मी जे विश्वासाने बोललो आहे ते सत्यात तरी कसे उतरेल, या भ्रमात लक्ष्मणराव राहिले. परंतु प्रभू त्याचे अंतरंग जाणत होते. त्यांनी लगेच लक्ष्मणरावांना सांगितले, ठिक आहे. तुमच्या बोलण्यात खरेपणा असेला तर आतांच्या आता यादीच करुन टाका. तुम्ही घातलेल्या अटी आम्हांस मान्य आहेत.

जमलेल्या सर्व लोकांसमोर लक्ष्मणरावांनी कराराची यादी स्वतः लिहून तयार केली. दोघांच्याही त्यावर सह्या झाल्या. सर्व गोष्टींची पूर्तता झाली की मुहूर्त ठरविण्याचे पक्के झाले. मात्र प्रभूंच्या शिष्यवर्गास चिंता वाटून राहिली. घरात तर फुटकी दमडी नाही आणि एकदम इतका पैसा व सामुग्री कोठून येणार ? प्रभूंना ते कोण देणार ? त्यांना भीती वाटू लागली ती प्रभूंचा दुर्लौकिक होईल याची !

दुसऱ्या दिवशी चमत्कारच झाला. त्याच गावात बसप्पा नावाचा एक वैश्य सावकार राहात होता. पक्का प्रभूभक्त! त्याच्या कानी ही बातमी जाताच तात्काळ तो प्रभूंच्या शिष्यांजवळ आला व स्वयंस्फूर्तीने म्हणाला, तुम्ही कोणीही, कसलीही काळजी करु नका. प्रभूंची वाणी महत्वाची आहे. लागेल ते द्रव्य व सामुग्री मी देतो. प्रभूंच माझे दाता आहेत. तेच माझे कल्याण करणारे आहेत. आता चिंता करु नका. तयारीला लागा असे म्हणून बसप्पा निघून गेला. थोड्या वेळाने गाडीभरुन सामान व लागणारे द्रव्य घेऊन आला. सर्व शिष्यमंडळींची, मातोश्री काळजी दूर होऊन त्यांना परम संतोष झाला. प्रभू मात्र आपल्या ठिकाणी स्वस्थ बसून होते. कोणीतरी ही आनंदाची बातमी त्यांच्या कानी घातली. प्रभू हसत म्हणाले, ‘दत्तप्रभूंची कृपा!’

किती मजेशीर गोष्ट आहे ना! देव म्हणतो, ‘देवाची कृपा!’

लक्ष्मणरावांकडे सर्व तयारी झाल्याचा निरोप गेला. ते हादरुनच गेले. पण आता त्याचा उपयोग नव्हता. त्यांनी तसा सर्वांसमक्ष करार केला होता. नाईलाजाने त्यांनी मुहूर्त काढला. लग्नकार्य मोठ्या धुमधडाक्यात झाले.

लक्ष्मणरावांची टवाळ मंडळी आणखी चेतावली. त्यांनी आणखी काहीतरी करुन या समारंभाला गालबोट लावायचे ठरविले. या कटात लक्ष्मणरावांचा सहभाग नव्हता. पण ती टवाळ मंडळी पेटून उठली होती. लक्ष्मणरावांच्या कह्यात नव्हती. त्यांनी एक मार्ग शोधला. मुलीकडील मंडळींना प्रयोजन द्यायच्यावेळी आपली काही मंडळी भोजणास येतील असा निरोप प्रभूंच्या घरी पाठवला.

इकडे प्रभूंच्या मंडळींनी अजमासे भोजनाची तयारी केली व व्याह्यांना बोलावणे धाडले. त्याप्रमाणे ह्या टवाळ कंपूने ठरविल्याप्रमाणे चार एकशे माणसे भोजनाला उपस्थित झाली. इतक्या साऱ्या मंडळींना पाहून प्रभू शिष्य चिंतेत पडले. कारण अंदाजे वीस-तीस माणसांच्याच भोजनाची व्यवस्था झाली होती. प्रभू शिष्यांनी प्रभूंकडे धाव घेतली. प्रभू त्यावेळी गाढ झोपेत होते. धांदल करुन प्रभूंना जागृत केले व वृत्त निवेदन केले. प्रभू मात्र शांतपणे म्हणाले, अख्खा गाव येऊ दे ! तुम्ही चिंता करु नका. दत्तप्रभू काय ते पाहतील. इतके म्हणून प्रभू उठले व स्वयंपाक घरात आले. तयार झालेल्या अन्नावर नजर फिरविली आणि आपल्या हातातील योगदंडाचा सर्व पदार्थांना स्पर्श करुन पाने वाढण्यास सांगितली.

प्रभूशिष्यांनी प्रभूंचा जयजयकार करुन पाने वाढण्यास प्रारंभ केला. पंगत बसली, भोजनास सुरुवार झाली. पंगती उठू लागल्या. टवाळ मंडळींनी ठरल्याप्रमाणे अन्नाचा वाटेल तितका फन्ना उडविण्यास सुरुवात केली. परंतु खाऊन खाऊन खाणार तरी किती ? मग अन्नाची नासाडी करण्यास सुरुवात झाली. त्यांचे हे चाळे प्रभूशिष्य शांतपणे पहात होते. परंतु कोणाला अडवले नाही. एका माणसाने पुढ्यात वडे असतानाही आणखी वड्यांचा हट्ट धरला. त्याच्यासमोर अख्खी टोपली ठेवण्यात आली. अन्नाची जराही कमतरता भासली नाही. टवाळ मंडळी मात्र ओशाळून गेली. प्रभूंशिष्यांनी सतत प्रभूनामाचा जयजयकार चालू ठेवला होता. अपूर्व थाटात भोजन आटोपले. अनेक पंगती उठून बरेच अन्न शिल्लक राहिले ते गावातील गाईंना दिले गेले आणि बाकीचे जलचरांसाठी तळ्यात टाकून दिले.

लक्ष्मणरावांची स्थिती मात्र केविलवाणी झाली. तो वडे मागणारा मनुष्यही लज्जित झाला. दुसरे दिवशी तो उदरव्यथेने व्याकूळ होऊन तळमळू लागला. प्रभूंचा आपण घोर अपमान केल्याची जाणीव होऊन प्रभूंची क्षमा याचना करण्यासाठी कसातरी येऊन प्रभूंच्या चरणी लागला. अनन्यभावे त्याने प्रभूंची क्षमा मागू लागला. दयाळू प्रभूंनी त्याचे दुःख दूर केले. प्रभूंचा स्पर्श होताच त्याची उदरव्यथा कोठच्या कोठे पळून गेली.

प्रभूंचा लौकिक त्यांचे सामर्थ्य दिवसें दिवस वाढत होते. त्याचप्रमाणे त्यांची किर्तिही सर्वदूर पसरत चालली होती. कल्याणात त्यावेळी मुसलमान लोकांचीही वस्ती बरीच होती. त्यांचे राजकीय प्राबल्यही तसे मोठे होते. मोठमोठ्या विद्वान लोकांचा भरणा होता. प्रभूंची परिक्षा पाहण्याचा या मुस्लीम विद्वानांनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु कोणत्याही धर्मातील श्रेष्ठत्तम तत्वारील प्रभूंचे ज्ञान पाहून मोठ मोठे मौलवी चकित झाले. प्रभूंच्या या अगाध व दिव्य ज्ञानाने दिपून अनेक विचारी, तत्वज्ञानी मुस्लीम त्यांच्या चरणी लीन झाले. परंतु एका अविचारी मुसलमान व्यक्तीने प्रभूंना मारण प्रयोग करुन जीवे मारण्याचा घाट घातला आणि त्याप्रमाणे सर्व सामुग्री जमवून त्याने मारण प्रयोगास सुरुवात केली.

त्या मूढ यवनाचा त्याच्याच जातभाईंनी निषेध केला. परंतु तो कोणाचे ऐकण्यास तयार होईना. निर्धार करुनच तो बसला होता. त्याच्या मंत्रदेवतेलाही त्याची करणी मान्य नव्हती. तिच्या पुढे स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा ठाकला. मी प्रत्यक्ष प्रभूंचे काय वाकडे करणार ? प्रभू तर साक्षात अग्नि देवताच ! मीच त्याच्यात भस्म होऊन जाईन असा विचार करुन त्या मंत्रदेवतेने त्या यवनालाच फटका दिला. त्याची दुर्दशा झाली. भूमीवर मूर्च्छा येऊन पडला. क्षणभर त्याला बसवेना वा उठवेना ! सारखा तळमळू लागला. त्याची ही अवस्था झाल्याची खबर सर्वत्र पसरली. त्या दृष्ट यवनाच्या भावाला ही वर्दी मिळाली. तो फार संयमी व प्रभूंवर भरोसा ठेवणारा होता. प्रभूंशिवाय आपल्या भावाला मुक्त करणारा या जगात दुसरा कोणीही नाही हे तो जाणून होता. म्हणून प्रभूंनाच तो शरण आला. त्यांच्या चरणांवर घालून घेतले व ते घट्ट पकडून, मला अभय द्या ! क्षमा करा असे काकूळतीने म्हणू लागला. प्रभूंनी काय घडले अशी विचारणा केली. पण तो काही बोलेना. फक्त, मी आपला दास आहे. आपल्याला अनन्यभावे शरण आलो आहे. आपण माझ्यावर कृपा करुन माझ्या घरी चला. असा आग्रह करु लागला. प्रभू त्याची समजूत काढू लागले, पण तो आपला हट्ट सोडायला तयार नव्हता. प्रभूंचे चरण पकडून होता.

प्रभू सर्व जाणत होतेच. शेवटी दयाघन प्रभूंना त्याची दया आली आणि सह्रदय अंतःकरणाने त्याच्या सोबत त्याच्या घरी आले. प्रभूंना घरी आलेले पाहताच तो दुष्ट यवन ओशाळला. आपल्या कृतकर्माची कबूली देण्यास घाबरु लागला. तेव्हा त्याच्या भावानेच त्याच्या कुकर्माचा पाढा वाचून त्याला प्रभूंना शरण जाऊन क्षमायाचना करण्यास सांगितले. अखेर तो दुष्टीबुध्दी यवन प्रभूंना शरण गेला. प्रभूंनीही लागलीच आपल्या अमृतदृष्टीने त्याला दुःखमुक्त केले आणि बोध केला.

तुझा दुष्टपणा तुलाच बाधला. तुझेच दैवत तुझ्यावर रुष्ट झाले. याचा तू विचार कर. दुष्टबुध्दी सोडून दे. दुसऱ्याचे वाईट करायले गेले की आपलेच मोठे नुकसान होते. स्वतःच्या कल्याणाची इच्छा

धरताना नेहमी दुसऱ्यांचेही कल्याण चिंतीत जावे.

संतमंडळी ही अशीच कृपाघन, दयाघन असतात. दुसऱ्यांनी अतोनात छळ करुनही ते त्यांना सदैव क्षमाच करीत आले आहेत. त्यांच्यावर कृपाही केली आहे.

या घटनेनंतर प्रभूंचा द्वेष करणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली. त्याच दरम्यान नृसिंहतात्यांच्या पत्नीस देवाज्ञा झाली. त्याचे फार दु:ख मातोश्री बय्यमांना झाले. आपल्या पुत्रात कुळ वाढविणाऱ्या एकाच पुत्राबाबतीत ही दु:खद घटना घडल्यामुळे त्याच्या प्रपंचाची हुरहुर तिला लागून राहिली. तसे अनेकदा तिने प्रभूंकडे बोलून दाखविले. प्रभू एकच सांगत, योग्यवेळी तात्याचे लग्न होईल.

## प्रभूंनी आपली लीला केलीच.

हळीखेडचे भालचंद्र देशपांड्यांचा प्रभू घराण्याशी निकटचा संबंध होता हे आपण मागे पाहिले आहे. देशपांडे घराण्याचा यशवंतराव कोरेकर यांच्याशी घरोबा होता. यशवंतरावांना दोन पुत्र व दोन कन्या होत्या. दिक्षितांचे कुटुंब जय्यामाला नृसिंहतात्याचे कुटुंब लग्न होताच निर्वतल्याची वार्ता कळली होती. त्याचे त्यांना अनिवार दु:ख झाले होते. तात्यांच्या कुटुंबाची झालेली हानी भरुन निघावी म्हणून जय्यामांनी यशवंतरावांकडे त्यांच्या थोरल्या मुलीसाठी तात्यांसाठी मागणी केली. त्यांनीही लगेच होकार दिला. तशी खबर जय्यामांनी प्रभूंकडे कळवली. मातोश्रीस अपार आनंद झाला.

हा विवाह सोहळा मोठ्या थाटात पार पडला. दोन्ही बाजूंची मंडळी पूर्ण समंजस असल्याने लग्न कार्यात कोणतेही वैगुण्य राहिले नाही. असे सांगितले जाते की या लग्नकार्यात कल्याणच्या नवाबसाहेबांनी हजारो रुपये खर्च केला होता. यावेळी मात्र टवाळ मंडळींचा कंपू चिडीचूप होता. कारण मागील प्रसंगाचे त्यांना चांगलेच स्मरण होते. आणि कल्याणच्या सर्व मंडळींची प्रभूंच्या घरातील मंगलकार्य म्हणजे अखिल कल्याण नगरीचे कल्याणच हो अशी प्रेमळ भावना झाली होती.

## चाळकापूरात प्रभू प्रकटले.

कल्याणपासून सातएक कोसांवर चाळकापूर नावाचे गाव वसले आहे. त्या गावचे वैशिष्ठ्य म्हणजे जाज्वल्य मारुती. तो उभा असून त्याचे स्वरुप उग्र आहे. त्यामुळे गावाबाहेरील अरण्यात त्याचे मंदिर आहे. दिवसा उजेडी गावातील लोक मंदिरात जात असत. कारण मंदिराच्या जवळ दाट जंगल, हिंस्त्र श्वापदांचा वावर शिवाय उग्र मारुती. मग कोण तेथे रात्रीच्या वेळी जाईल? देवाचे पुजारी गुरव हे

सकाळीच पूजा, आरती आटोपून नंदादीपात रात्रभर पुरेल इतक तेल घालून घरचा रस्ता धरीत.

मारुतीचे उत्सव मात्र बारा महिने होत असत. दर शनिवारी पालखी निघे. चैत्र महिन्यात मारुतीचा जन्मोत्सव मोठ्या प्रमाणात होई. असंख्य भाविक जमत. त्यामुळे यात्रेचे स्वरुप येई. संध्याकाळी मात्र तेथे जाण्याचे कोणाचे धाडस होत नसे आणि मारुतीचे नावही कोणी काढीत नसे. अशा या एकांतसमयी मारुतीची भेट घेण्यासाठी प्रभू तेथे दाखल झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुरव पूजा करण्यास मंदिरात आले तर कोणी एक तेथील एका कोपऱ्यात गाढ झोपलेला दिसला. त्याच बरोबर मारुतीच्या डोक्यावर एक गाठोडे दिसले. ते उघडून पाहताच त्यात कपडे दिसून आले. या झोपलेल्या माणसानेच ते गाठोडे मारुतीच्या डोक्यावर ठेवले असेल अशा विचाराने त्या झोपलेल्या प्रभूंकडे आले. त्याला जागवून विचारले असता त्याने ते आपले आहे असे सांगताच पुजारी संतापले. प्रभूंना शिव्या हासडीत त्यांना मारहाण करु लागले. अचानक मारुतीचा कबा व गळ्यातील माळ प्रभूंच्या अंगावर आलेली पाहून गुरवांना आश्चर्य वाटले. हा काय चमत्कार आहे ? मग मात्र पुजारी गुरव भयभीत झाले. प्रभू मात्र शांतपणे उभे राहून त्यांच्याकडे पाहू लागले. तोवर देवळात माणसांची गर्दी जमली होती. एकाने प्रभूंना निरखून पहात म्हटले, हे तर कल्याणचे माणिकप्रभू ! हे शब्द कानी पडताच जमलेल्या मंडळींना अत्यानंद झाला. गुरवांची मात्र पाचावर धारण बसली. अज्ञानापणाने आपल्या हातून केवढा घोर अपराध घडला गेला ! या विचारानेच ते गर्भगळीत झाले. त्यांनी प्रभू चरणी साष्टांग दंडवत घालून अपराधाची क्षमा करण्यास विनवू लागले. प्रभूंनी प्रसन्न वदनाने पुजाऱ्यांना उठवून त्यांचे सांत्वन केले.

प्रभू आपल्या गावी आले आहेत ही बातमी वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली. लोकांच्या झुंडीच्या झुंडी नारळ, हार, फुले, खारका, बत्तासे, सुपाऱ्या घेऊन प्रभू दर्शनास गर्दी करु लागल्या. हा हा म्हणता त्या निर्जन स्थळाला प्रचंड यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले. लगेच पेढ्या-बर्फीची, हार-नारळांची दुकाने थाटली गेली. थोडक्यात 'जंगल मे मंगल' सुरु झाले. प्रभूंच्या येण्याने सारा परिसर मंगलमय झाला.

प्रभू प्रकट झाल्याची वार्ता बेदर, हैदराबाद, कुलबर्गा एवढेच काय कल्याणपर्यंत पसरली. कल्याणचे शेकडो लोक प्रभूंच्या दर्शनासाठी येऊन पोहोचले. मातोश्री बय्यमादेखिल नृसिंहतात्यास घेऊन तेथे हजर झाल्या. त्याचवेळी हैदराबादचे राजे रायरायान यांनी देखील येऊन प्रभूंचे दर्शनाचा लाभ घेतला. चिदंबरराव नावाच्या तालुकादाराने प्रभू असे पर्यंत त्या परिसरात उत्तम बंदोबस्त ठेवून भक्तांना निर्भय केले. प्रभूंनी या स्थळी चार महिने निवास केला.

हैदराबादचे जे राजे प्रभूंच्या दर्शनास आले होते त्यांनी काही काळ प्रभूंच्या सान्निध्यात राहून त्यांची

मनोभावे सेवा केली. हे मुलतः ऋग्वेदी ब्राह्मण! निजामशाहीत यांच्या पूर्वजांनी मोठी कामगिरी केल्यामुळे त्यांना चार-पाच लाखांची जहांगीर मिळाली होती. निजामाचे ते दप्तरदार होते. मुसद्देगिरीत व तलवार बहादुरीत श्रेष्ठता संपादन केल्यामुळे त्यांना 'राजे रायरायान (सर्व राजांचे राजे)' असा किताब मिळाला होता. माणिकप्रभूंची किर्ति त्यांच्या कानी पडली होती. प्रभूंवर त्यांचे प्रेम जडत चालले होते. त्याचवेळी प्रभू चाळकांपूरात प्रकट झाले होते. ही संधी राजे रायरायान् यांनी सोडली नाही. प्रभूंच्या दर्शनाने त्यांना परम संतोष झाला. त्यांनी मनोभावे प्रभूंची सेवा केली. राजेंना एक दुःख होते ते म्हणजे आपल्या संस्थानाची परंपरा चालविण्यासाठी पोटी संतान नव्हती. त्यासाठी राजेंनी प्रभू चरणी प्रार्थना केली. प्रभू त्यांच्या सेवेवर प्रसन्न होतेच. त्यांचे दुःख जाणून त्यांनी राजेंना फुले, खारका व भस्माचा एक गोळा प्रसाद दिला. तेव्हा राजेंची पक्की खात्री झाली, प्रभूंनी आपली इच्छा पूर्ण केली. पुढे हैदराबादला परतल्यावर प्रभूंनी दिलेल्या प्रसादाची नित्य मनोभअवे पुजा करीत असत. काही काळाने त्यांना पुत्ररत्नाचा लाभ झाला. लागलीच ही गोड बातमी राजेंनी प्रभूंना कळवली आणि त्यांच्याच आज्ञेने आपल्या पुत्राचे नांव शंकरराव असे ठेवले. प्रभूंच्याच आशिर्वादाने शंकररावांचा जन्म झाला होता. साहजिकच त्यांची प्रभू चरणांवर अत्यंत निष्ठा होऊन गेली

शंकरराव राजे वयात आल्यावर त्यांचे वडिल निर्वतले. पण घडले असे, जहागिरीच्या बाबतीत सरकार अनुकूल नव्हते. त्यामुळे त्यांना चिंता लागून राहिली. त्यांनी प्रभूचरणी प्रार्थना केली. त्यांची जहागिरी मोकळी होऊन शंकरराव गादीवर बसले. प्रभू संस्थान व राजे रायरायान् यांचा प्रेमाचा जिव्हाळा निर्माण झाला. तो आजपर्यंत अव्याहत चालू आहे.

अशा तऱ्हेने चार मास होताच प्रभू मैलारकडे जाण्यास निघाले. प्रभू येथून निघून जाणार म्हणून संपूर्ण चाळकापूर शोकाकूळ होऊन गेले. परंतु प्रभूंनी सर्वांची समजूत काढून त्यांना प्रसाद देऊन संतुष्ट केले. मातोश्री बय्यमा व बंधू तात्याला आपल्यासोबत घेऊन प्रभू मैलार क्षेत्री आले.

## ऐश्वर्यवान मैलार

मैलार हे अति प्राचीन क्षेत्र! खंडोबा यातील प्रमुख दैवत! त्यामुळे सर्व देवतांचा येथे वास असे. येथील लोक या स्थानाला 'दक्षिणकाशी' असे म्हणतात. मल्हारी माहात्म्यात या क्षेत्राचे वर्णन वाचावयास मिळते. मणिचल पर्वतावरील हे क्षेत्र त्या काळी ऐश्वर्यात होते. निजामाचा अंमल सुरु झाल्यानंतर सुमारे पाऊणशे वर्षे येथे मराठा सरदार चंद्रसेन जाधव व त्याचा पुत्र राजा रामचंद्र यांचे प्राबल्य असल्यामुळे हे क्षेत्र वैभवाच्या शिखरावर आरुढ झाले होते. या ठिकाणी एकशे आठ तीर्थे असून

ती सर्व कुंडे उत्तम तऱ्हेने बांधली आहेत. फरसबंदीचे रस्ते, चुनगच्चीच्या इमारती, मोठ मोठाली घरे असे या क्षेत्राचे औदार्य होते.

प्रभू येथे आले त्यावेळी हे स्थान पूर्ण भरभराटीत होते. ब्राह्मण, व्यापारी, सावकार, शेट यांची भरपूर वस्ती असल्याने चारी दिशांनी या ठिकाणी द्रव्य जमत असल्याने सर्व लोक श्रीमंत होते. कशाचीच उणीव नव्हती.

प्रभू आपल्या मंडळींसह आले व गावाबाहेरील मूळलिंगाच्या मंदिरात उतरले. यावेळी प्रभूंसोबत त्यांच्या मातोश्री, तात्या, चिमण्या ब्रह्मचारी, नारायण दिक्षित इत्यादी मंडळी होती. प्रभू आपल्या गावात आल्याचे समजताच लोकांची दर्शनास रीघ लागली. मोठी यात्राच भरली. अनेक जण आपले राहिलेले नवस फेडण्यास येऊ लागले. काही प्रभू चरणी नवस करण्यास येत होते त्याचवेळी खंडोबाची यात्राही चालू झाली होती यात्रा संपली तरी लोक अद्याप आपल्या घरी परतले नव्हते. कारण प्रभूंची स्वारी तेथे विराजमान झाली होती. सर्व भक्त प्रभूदर्शन घेऊन त्यांच्याकडून प्रसाद घेऊनच जात होते. एकदा प्रभू हस्ते प्रसाद घेण्यास गर्दी उसळली असता त्या गर्दीतून वाट काढत कोमटऱ्याची एक स्त्री प्रभूंच्या दर्शनास आली. वर्णाने काळी भोर व धिप्पाड! अंगावर बरेच सुवर्णालंकार होते. परंतु ती स्त्री विधवा होती. प्रभूंचे दर्शन केल्यावर प्रसादासाठी पुढे न जाता तेथेच एका कोपऱ्यात बसून प्रभूंजवळ एकटक पहात राहिली. त्यांचे रुप डोळ्यात साठवू लागली. काही काळाने तीची देहबुध्दी हरपली व प्रभूंच्या स्वरुपाशी समरस झाली. शेवटी सर्व गर्दी ओसरली. फक्त तीच एकटी डोळे बंद करुन तेथे बसली होती. प्रभूंच्या शिष्यापैकी एकाने ती प्रसाद घेण्यास राहिली असेल म्हणून तिला हाक मारताच ती शुध्दीत आली. प्रभूंजवळ येऊन तिने साष्टांग नमस्कार घालून प्रसादासाठी ओंजळ पुढे धरली असता तिच्या हाती दोन खारका व फुले ठेवली. प्रसाद घेऊन ती बाहेर पडली पण कोठे जावे ? हे तिला सुचेना. तरीही बाहेर पडून पाय नेतील तिकडे चालत राहिली. परंतु तिचे हृदय प्रभूंनी भरुन गेले असल्याने सर्वत्र प्रभूच तिला दिसू लागले. दोन दिवस इकडे तिकडे भटकून पुन्हा प्रभूंजवळ आली. याहीवेळी प्रभूंनी तिच्या हातावर दोन खारका ठेवल्या व निघून जाण्यास सांगितले. ती तात्काळ निघून गेली. पण पहिल्यासारखीच भटकून पुन्हा प्रभूंजवळ आली.

प्रभूंनी विचारले, तुला दोनदा प्रसाद दिला असताना तू पुन्हा येथे का येतेस ?

तेव्हा त्या स्त्रीने अत्यंत मार्मिक उत्तर दिले, महाराज माझे घरदार, गाव मला माहित नाही. आपल्या चरणांशिवाय इतर साऱ्या गोष्टी मला शुन्यवत वाटू लागल्या आहेत. आपले चरण सोडून मी आता कोठेही जाणार नाही.

प्रभू म्हणाले, तू अगदी तरुण आहेस. आमच्या सोबत राहून तुझे फार हाल होतील. शिवाय आमच्याकडे नाना तऱ्हेची माणसे गोळा होतात, तुझा निभाव लागणार नाही. शहाणपणाने आल्या वाटेने आपल्या घरी निघून जा. ती स्त्री प्रभूंना म्हणाली, माझे घर, आई-वडील मला आठवत नाहीत. आपणच या अभागीचे आई-वडील, आप्त, सगेसोयरे आहात. तद्वत येथून मी कोठेही जाणार नाही.

प्रभूंनी म्हटले, आमच्या सोबत राहायचे असल्यास हे सुवर्णालंकार धारण करता येणार नाहीत. ते गोरगरीबांना वाटावे लागतील. प्रसंगी अंगाला राखही फासावी लागेल. प्रभूंचे हे बोल ऐकून ती स्त्री म्हणाली, आधीच मला या सुवर्णाचे ओझे झाले आहे. ते मी आनंदाने उतरवत आहे. आपली इच्छा होईल त्याला ते आपणच देऊन टाका. असे म्हणून तीने अंगावरील सर्व अंलकार काढून प्रभूंच्या चरणी ठेवले. तिचा निर्धार पाहून प्रभू अतिव प्रसन्न झाले. त्या स्त्रीचे औदार्य पाहून जमलेली मंडळीही अवाक् झाली. प्रभूंनी तिचे निःसीम व शुध्द प्रेम जाणले होते. प्रभूंच्याच दर्शनाने तिच्या अंतःकरणातील शुध्द, निःसीम प्रेम उचंबळून आले होते. प्रभूंनी तिच्यावर प्रसन्नतेने एक दृष्टीक्षेप टाकला व आपल्या शिष्यांना तिला अम्माजवळ घेऊन जाण्यास सांगितले. बय्यमांदेखिल प्रभूंवरील तीचा उत्कट भाव, प्रेम पाहून आनंदित झाली व त्यांनी तिचा कन्या म्हणून स्वीकार केला. एकदा तर प्रभूंनी कित्येक दिवस त्या स्त्रीस नुसत्या खारकेवर ठेवले. तरी ती डगमगली नाही. धिप्पाड देहाची बाई त्या दिवसांत खारकेप्रमाणे वाळून गेली. तिची ही अवस्था पाहून सर्वांच्याच मनात करुणा उत्पन्न झाली.

एके दिवशी स्त्रीस्वभावाप्रमाणे ती नग्न स्नान करीत होती. त्याचवेळी प्रभूंचा तिला निरोप आला, 'असशील तशी निघून ये!' प्रभूंचा निरोप कळताच ती देहभान विसरुन त्याच स्थितीत प्रभूंकडे जावयास निघाली. सर्वांनी आपल्या माना खाली घातल्या. मातोश्रींना हे कळताच त्याही तिच्या मागोमाग निघाल्या. प्रभूंनी ही कसली आज्ञा केली. त्यांनी मध्येच तिला थोपविले. प्रभू हे सर्व पहात होते. लज्जा हे स्त्रीचे खरे भूषण! परंतु ही प्रभू आज्ञेपुढे तिलाही न जुमानता माझ्याकडे नग्न अवस्थेत यावयास निघाली! ही तिची अनुपम भक्ती पाहून प्रभूंच्या प्रेमाला भरती आली. ती जवळ यायची वाट न पाहता आपल्या अंगावरील शुभ्र वस्त्र काढून तिच्या अंगावर घालण्यासाठी मातोश्रींकडे पाठवून दिले.

प्रभूंचे शुभ्र वस्त्र ! म्हणजेच शुध्द भावना, शुध्द प्रेम, शुध्द भक्ती! ती त्या स्त्रीची जागृत झाली होती. ती आणखी भक्कम करण्यासाठी ते शुभ्र वस्त्र प्रभूंनी त्या स्त्रीस देऊन तिचा उध्दार केला.

ही स्त्री म्हणजेच माता व्यंकम्मा होय. पूर्वील जन्मात थोर योगिनी होती. परंतु प्रारब्धाने तिचा वैश्य कुळात जन्म झाला. तो अशासाठी, प्रभूंची भेट होणार होती. प्रभूंच्या कृपादृष्टीने तिचे भाग्य उजळून निघाले आणि परमार्थाच्या श्रेष्ठ पदावर आरुढ झाली.

प्रभूंनी दिलेला प्रसाद अर्थात शुभ्रवस्त्राने तिचा दुसरा आध्यात्मिक जन्म झाला. तिची सर्व कर्मे जळून नष्ट झाली आणि ती शुध्द, पवित्र झाली. त्यावेळेपासून तिने अखंड शुभ्रवस्त्र परिधान केले. हाती रुद्राक्षाची माळ, कपाळास शुभ्र भस्म चर्चून ती व्यंकम्मा सदासर्वदा प्रभू नामात दंग असे. या जन्मी तिला उच्च कुल नव्हते, सौंदर्य नव्हते, विद्याही नव्हती. परंतु प्रभू कृपेने या गोष्टींवर मात करणारे शुध्द, पवित्र अंत:करण तिला प्राप्त झाले होते. प्रभूंना अनुभवण्याचे सामर्थ्य मिळाले होते.

**व्यंकम्माचा पूर्वेतिहास.**

व्यंकम्मा ही कोमठी जातीची. परंतु हे लोक स्वत:स वैश्य म्हणून घेत. कारण निजाम राजवटीत ते व्यापार करीत साहजिकच धन दौलत भरपूर प्रमाणात असे. त्यांनी आपली परंपरा ही जतन करुन धर्मशास्त्राचे सर्व संस्कात ते पाळीत असत.

व्यंकम्माचे वडील मोठे धनकसंपन्न होते. त्याकाळात अनुसरुन व्यंकम्माचा लहानपणीच विवाह झाला होता. पण दुर्दैवाने तिचा पती लौकरच निर्वतला. ती बालपणीच विधवा झाली. हे दु:ख पचविण्यासाठीच तिने परमेश्वर भक्तीचा मार्ग स्वीकारला. आई-वडीलही ईश्वरभक्त असल्याने घर ईश्वरभक्तीने फुलून गेले. थोडक्यात सर्व भाविक बनले होते. विशेषत: वडिल अधिक भाविक व भोळे होते. त्याचा फायदा बाजारु गुरुंनी घेऊन त्यांना फसविले. एका भोंदू गुरुने नाना भूलथापा देऊन आपल्या नादी लावले. एवढेच काय, तर आपल्याला कैलासात जाण्याची विद्या अवगत असून तुम्हां सर्वांना कैलासात नेऊन सोडतो असे व्यंकम्माच्या वडिलांना सांगितले. आधीच सर्व कुटुंब देवध्यानात दंग झाल्यामुळे ते त्या भोंदू गुरुच्या शब्दात फसले.

शेवटी एकाच वेळी सर्वांना कैलासात सोडतो असे सांगून त्याने ह्या कुटुंबाकरुन एक अनुष्ठान करवून घेतले. अनुष्ठान पूर्ण झाल्यावर मैलार येथील रुद्रकुंडावर आणून सर्वांना त्या अथांग जलाशयात उडी मारण्याची आज्ञा केली. इतरही बरीच मंडळी तेथे जमली होती गुरुंच्या आज्ञेनुसार व्यंकम्माच्या आई-वडिलांनी व व्यंकम्माने जलाशयात उड्या मारल्या. पोहता कुणालाच येत नसल्यामुळे आई-वडिल बुडून मेले. व्यंकम्मांही दोन वेळा पाण्याखाली जाऊन वर आली. तिसऱ्या वेळेस एका तरुणाने तिला हात दिला व काठावर आणून सोडले व अदृश्य झाला. तोपर्यंत तो गुरु तेथून पसार झाला होता.

व्यंकम्मांचा जेव्हा त्या तरुणाने हात पकडला तेव्हा ती अर्धवट बेशुध्दावस्थेत होती. तरी त्यातल्या त्यात तिने त्या तरुणाचा चेहरा मनात पूर्णपणे ठासून ठेवला. व्यंकम्माला बेशुध्दावस्थेत सोडून तो तरुण

गडप झाला, हे वर आलेच आहे. शुध्दीवर आल्यावर तिच्या ध्यानी-मनी तो तरुण राहिला होता. आपल्या आई-वडिलांचा मृत्यू ती विसरुन गेली होती. आपल्या प्राणदात्याला शोधायला ती निघाली. भटकत, फिरत ती प्रभूंच्या दर्शनास आली. त्यांचे दर्शन घेऊन त्यांच्याकडे पहाताच तिला त्या तरुणाचे स्वरुप आठवले व खात्री पटली, ह्यानेच मला हात देऊन वाचविले. प्रभूंच्या स्वरुपात दंग झाली. प्रभू स्वरुपावर तिचे मन खिळून गेले.

मैलारास प्रभूंचा खूप काळ निवास होता. याठिकाणी प्रभूंची गादी निर्माण झाली. त्यावेळी मोठा उत्सव साजरा केला गेला. एके दिवशी मंदिरानजीक अरण्यात एका वृक्षाखाली प्रभू बसले होते. भक्त मंडळींही जमा झाली होती. अचानक प्रभूंनी एका काठीने तेथील जमिनीवर थोडेसे उकरताच त्यातून पाण्याचा स्त्रोत बाहेर पडला. हीच गंगा समजून प्रभूंच्या शिष्यमंडळींनी भक्तीभावाने मार्जन करुन भोवतालची जमीन उकरताच पाण्याचा संचय सापडला. त्याचे सर्व मंडळींनी कुंडात रुपांतर केले आणि त्या कुंडाला 'माणिककुंड' असे नाव प्राप्त झाले. आजतागायत माणिककुंडाचे माहात्म्य चालू आहे.

प्रभूंचे येथिल कार्य पूर्ण झाले होते. पुढील कार्यासाठी निघण्याची तयारी केली. मातोश्री बय्यमा व तात्या यांना कल्याणास जाण्याची आज्ञा केली. मैलार सोडून प्रभू निघून जात आहेत हे पाहून सारे मैलारवासी दुःखी झाले. पण प्रभूंनी आपल्या मधूर वाणीने सर्वांचे समाधान करुन प्रेमाने प्रसाद दिला. आपल्या सोबत निवडक शिष्यांना घेऊन व इतरांना आपल्या घरी जाण्याची आज्ञा केली. फक्त व्यंकम्माला सोबत ठेवले. कारण कोणत्याही परिस्थितीत ठामपणे उभे राहण्याचे सामर्थ्य तिच्या जवळ होते.

## भालकीचे ऐतिहासिक महत्व.

मैलारहून प्रभू आपल्या शिष्यांसमवेत भालकी येथे आले. याला ऐतिहासिक महत्व आहे. हा गाव त्याकाळी मराठा सरदार चंद्रसेन जाधव याच्या जहागिरीचा होता असा उल्लेख मागे आलेलाच आहे. चंद्रसेनाच्या पराक्रमावर खूष होऊन निजामाने त्याला खासगी खर्चाकरीता सात लाखाची जहागिर दिली होती. त्या जहागिरीचे मुख्य स्थळ भालकी होते.

चंद्रसेनानंतर राजा रामचंद्राचे भाग्य या गावाला मिळाले होते. राजा रामचंद्र हा सुध्दा पराक्रमी व सर्वांचे कल्याण करणारा होता. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पेशवे व निजाम यांच्या घनघोर लढाईचे पर्यवसान तहात झाले. तो तह भालकी गावात झाला. त्यामुळे 'भालकीचा तह' म्हणून इतिहासात

प्रसिध्द आहे.

भालकी गावाचा इतिहास फार प्राचीन आहे. त्याकाळी या प्रदेशात भद्रपुरी अथवा भद्रावती असे नाव होते. येथेच भद्रेश्वर नामे श्रीशिवशंकराचे देवालय आहे. आजकाल याला भालकेश्वर म्हणतात. अर्थात हे देवालयही प्राचीन आहे.

प्रभू आपल्या शिष्यांसह याच देवळात येऊन दाखल झाले. अरणाप्पा ब्राह्मण या देवालयाचा पुजारी होता. पुष्कळ दिवसांपासून अरणाप्पाला उदरव्यथेने ग्रासले होते. अनेकविध उपचार करुन झाले. मंत्र-तंत्र करुन पाहिले. परंतु कशाचाही फरक पडला नाही. उलट व्याधी वाढत चालली. ब्राह्मणाला जीवनाचा कंटाळा आला होता. लवकरच जीव गेला तर या व्याधीतून सुटका होईल असे त्याला वाटू लागले. अगदी मरणाच्या दारात पडला होता. त्याचवेळेस प्रभूंचे तेथे आगमन झाले. हेच महाराज मला या व्याधीतून मुक्त करतील. ब्राह्मणाने प्रभूचरणी मस्तक ठेवून आपली व्यथा सांगून म्हटले मला हे कष्ट पेलवत नाहीत. यातून मुक्त करा. प्रभू हास्य करुन म्हणाले, तू मेल्यावर या देवाचे कसे होईल ? याचे पूजन-अर्चन कोण करील ?

प्रभूंनी ब्राह्मणाची परिस्थिती जाणून त्याची व्याधी दूर करण्याचे ठरविले. प्रभूंचे उपचार म्हणजे अजब रसायन ! त्यांनी अरणाप्पाला तीळ, खोबरे, व पोहे दह्यात कालवून लाडू बनविण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने लाडू बनवून प्रभूंच्याच हाती दिला. इतर लोकही त्यावेळी देवालयात दर्शनासाठी आले असल्याने हा प्रकार पहात होते. प्रभूंचे हे विलक्षण उपचार पाहून ते स्तंभितच झाले. काहींना तो ब्राह्मण उद्या मरणार होता तो आताच मरेल असेच वाटले. पण त्या ब्राह्मणाचा प्रभूंवर दृढ विश्वास बसला होता. प्रभूंनी तो लाडू ब्राह्मणास खाण्यास दिला आणि आपल्या हातातील काठी त्याच्या पोटावरुन फिरवली. क्षणात त्या ब्राह्मणाच्या वेदना कमी होऊ लागल्या. दोन दिवसातच तो खडखडीत बरा झाला.

मृत्यूच्या जबड्यातून प्रभूंनी अरणाप्पाला बाहेर काढले ही खबर थोडीच लपून राहणार ? अगोदरच तेथे काही भाविक उपस्थित होते. त्यांच्या समोरच ही घटना घडली होती. भाविकांची प्रभू दर्शनासाठी रीघ लागू लागली.

प्रभूंनी आपणास जीवदान दिले या गोष्टीने अरणाप्पाच्या आनंदास उधाण आले. तो प्रभूचरणी नम्र झाला. प्रभूंचा भक्त बनला. ब्राह्मणाच्या विंनतीस मान देऊन प्रभूंनी तेथे गादी स्थापन केली व तिची नित्य पुजा करण्याचे अधिकार त्याला दिले. ब्राह्मणाने मोठ्या संतोषाने प्रभूंनी दिलेले कार्य स्वीकारले. अनंत जनसमुदाय प्रभू चरणी लागला. याच भालकीचे नायब आबारावही प्रभूंचे भक्त बनले.

## चिटगोण्याच्या संग्रामखांची कहाणी.

प्रभू भालकीहून काही काळ महानंदात निवास करुन चिटगोण्यास आले. येथे येण्याचे कारण घडले ते असे;

एक लिंगायत जातीचा संग्रामराव नावाचा जातीने ब्राह्मण व श्रीमंत माणूस रहात होता. जनमानसात तसेच सरकार दरबारी याचे मोठे वजन होते व मानही होता. त्याने आपल्या सोबत लढवय्ये लोकांची सशस्त्र फलटण ठेवली होती ती यासाठीच उन्मत, दृष्ट लोकांना शासन करुन गोरगरीबांना सहाय्य करण्यासाठी. म्हणूनच सरकारी अधिकारी संग्रामरावांना वचकून जनतेला त्रास देत नसत. दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांनाही त्याची भीती वाटे. नाव संग्रामराव पण शिपाई बाण्यामुळे त्याला सर्व संग्रामखां असे म्हणत. त्याकाळी मोगलाईत कायद्याचा अमंल नसल्याने कोणीही पदरी चार-आठ माणसे ठेवून प्रबळ होत असे. बहुतांशी असे लोक जनतेला छळून धनसंपन्न होत. परंतु संग्रामखां हा सत्प्रवृत्तीचा असल्याने सदा गोरगरीबांना मदतच करत असे. त्याच्या सत्कृत्यामुळे त्याची सत्किर्ति सर्वदूर पसरली होती. साहजिकच सरकार दरबारी त्याचे वजन वाढले होते.

परंतु दुर्दैव पहा! त्याला एक व्याधी जडली. हिंवज्वराने पछाडून त्याला उदररोगाचा उद्‌भव झाला. शारीरिक पीडेने तो व्यथीत झाला. दिवसेदिवस तो क्षीण होत चालला होता. नानाविध औषधे घेऊन झाली. कोणी एक मांत्रिकाने त्याला पिशाच्चबाधा झाल्याचे सांगून रोज शिवास रुद्राभिषेक करुन ते तीर्थ प्राशन करण्यास सांगितले. त्या उपायानेही काही उपयोग झाला नाही. एके दिवशी श्रीशंकरानेच त्याला स्वप्नात येऊन 'माणिकप्रभूंचे चरणतीर्थ' घेत जा असे सांगितले. त्या ईश्वरी विधानावर (स्वप्नावर) विश्वास ठेवून संग्रामखां माणिकप्रभूंच्या शोधास लागला. अचानक त्याला प्रभू भालकीजवळ असल्याचे समजले. आपल्या परिवारासह तो भालकीला आला. प्रभूंसमोर येताच ते म्हणाले, श्रीशिवशंकराची आज्ञा आम्हांस मान्य आहे. मी तुमचीच वाट पाहात होतो. प्रभूंचे बोलणे ऐकून संग्रामखांला परम संतोष झाला. ईश्वरानेच प्रभूंची भेट घडवून दिली आहे. आता मला या व्याधीतून बरे होता येईल. अशी खूणगाठ मनाशी बांधून त्याने आपल्या परिवारासह प्रभूंची मनोभावे पुजा केली. आणि त्यांना विनंती करुन आपल्या गावी चलण्यास सांगितले. प्रभूंनी तात्काळ होकार देऊन त्याच्या बरोबर चिटगोण्यास निघाले. यावेळी प्रभूं उत्तम शृंगारलेल्या म्यानात बसून चालले होते. संग्रामखांने एखाद्या राजाला शोभेल अशा थाटात प्रभूंना चिटगोण्यास आपल्या घरी आणले. त्यांची मोठ्या भक्तिभावाने पुजा करुन त्यांचे चरणतीर्थ प्राशन केले. त्या दिवशी त्याने ब्राह्मण भोजन घालून प्रत्येकास रुपया रुपया दक्षिणा दिली आणि ब्राह्मणांनीच केलेल्या अन्नाचा प्रसाद ग्रहण केला.

प्रभूंच्या चरणतीर्थाने संग्रामखां रोगमुक्त झाला. त्याची प्रभूचरणी दृढ श्रध्दा बसली. संग्रामखांची ही करणी त्याच्या जातभाईंना पटली नाही. सारे त्याला दोष देऊ लागले. पण संग्रामखांने कोणाची पर्वा केली नाही. प्रभूंनीही त्याला जातीधर्माने वागावे असे सांगून टाकले.

लिंगायत लोकांचा दिवसेंदिवस संग्रामखांवर रोष वाढत चालला होता. अखेर एके दिवशी त्याने आपल्या सर्व जातीबांधवांना आमंत्रित केले. त्यांच्या इच्छेप्रमाणे भोजनाची तयारी केली आणि लिंगायत धर्मास अनुसरुन संग्रामखां प्रभूंची पुजा करीत असता तेथे जमलेल्या सर्व लिंगायत लोकांना प्रभूंच्या जागी बसवेश्वर दिसू लागले. मग काय ! सर्वांनी परम संतोषाने प्रभूंचा जयजयकार करुन त्यांची पुजा व आरती केली. आनंदाने भोजनही केले.

प्रभूंनी त्या सर्वांना प्रेमपूर्वक आशिर्वाद दिले. त्या गावी अखंडेश्वराची स्थापना केली.

**प्रभूंची तीर्थयात्रा आणि चमत्कार.**

प्रभूंचा गावोगावी नावलौकिक झाला होता आणि साहजिकच असंख्य लोक त्यांच्या सहवासात येऊन वावरु लागले होते. या गोष्टीला आळा घालावा म्हणून प्रभूंनी तीर्थयात्रा करण्याचे मनी ठरविले. त्यानुसार फक्त दोन शिष्यांना (यांची नावे उपलब्ध नाहीत) बरोबर ठेवून इतरांना कल्याणास पाठविले. प्रभूंची स्वारी भ्रमण करण्यास निघाली.

बालपणापासून अरण्यात निवास करुन सृष्टीशी समरस होण्याची कला त्यांना अवगत असल्याने पायी भ्रमंती त्रासदायक ठरली नाही. प्रभूंनी तुळजापूरास येऊन भगवतीचे दर्शन घेऊन पंढरपूरात आले. तोपर्यंत रात्र झाली होती. चंद्रभागा दुथडी भरुन वाहत होती. बरोबरचे दोन शिष्य ते दृश्य पाहून चिंताग्रस्त झाले. रात्रीचा समय त्यात चंद्रभागेला भरपूर पाणी. अशा स्थितीत पलीकडे कसे जायचे ? प्रभू मात्र प्रसन्नतेने उभे होते. अचानक एका नावाड्याने प्रभूंना हाक मारुन म्हटले, काळजी करु नका, मी तुम्हां सर्वांना पलिकडे सोडतो. त्या नावाड्याने नाव आणून तिघांना त्यात बसवले व सुरक्षित पैलतीरी आणून सोडले. तेथे उतरुन मागे पहाताच तो नाव ही नाही व नावाडीही नाही. दोघे शिष्य विस्मयचकित झाले.

दुसऱ्या दिवशी प्रभू कोणालाही न सांगता एकटेच विठ्ठलाच्या दर्शनास निघाले. अंगात एक फाटका मलिन अंगरखा व लंगोटी, ती ही गलिच्छ आणि तशीच एक चिंधी डोक्याला गुंडाळलेली. अशा अवतारात प्रभू महाद्वारातून पांडुरंगाकडे जावयास निघाले. हा गलिच्छ माणूस अंत्यज वर्गाचा असावा

असा कयास करुन तेथील बडव्यांनी प्रभूंना अडविले व आत जाण्यास मज्जाव केला. प्रभूही जबरदस्तीने आत जाण्याचा प्रयत्न करु लागले. तेव्हा बडव्यांनी प्रभूंना मार देण्यास सुरुवात केली. तोच एक हार येऊन प्रभूंच्या गळ्यात स्थीरावला. त्याचवेळी विठ्ठलाची मूर्ती थरथर कापू लागली. मग मात्र सारे बडवे भयभीत झाले. हा काय चमत्कार! तेवढ्यात कोणी एक गृहस्थाने ओळखून ओरडून सांगितले, अहो ते कल्याणचे माणिकप्रभू आहेत. सारे बडवे अवाक् झाले. कारण प्रभूंची किर्ति पंढरपूरातही येऊन पोहोचली होती. तेच साक्षात येथे आले आहेत हे समजताच सर्वांना आनंद झाला. बडव्यांनी प्रभूंच्या चरणांवर घालून घेतले. प्रभूंनीही हसत हसत सर्वांना अभय दिले. नंतर आनंदाने प्रभूंसोबत सर्वांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले.

येथील प्रभूंचा प्रथम मुक्काम गोपाळपुऱ्यात होता. नंतर अनेक प्रेमळ भक्तांच्या इच्छेप्रमाणे विविध ठिकाणी प्रभूंनी निवास केला. दादा मनोहर या बडव्याने आग्रहाने त्यांना आपल्या घरी नेले होते.

पंढरीहून प्रभू पुण्याच्या रस्त्याने गिरनार पर्वतावर पोहोचले. त्या दरम्यान जंगली महाराजांनी प्रभूंचा यथोचित आदरसत्कार करुन आपल्या जवळ काही दिवस ठेवून घेतले होते.

यापुढे मात्र प्रभू एकटेच तीर्थाटनास निघून गेले असे म्हटले जाते. उत्तर-दक्षिणेकडील प्रवास खडतर असल्यामुळे आपल्या सोबत कोणी पायी चालू शकणार नाही, अशी प्रभूंची खात्री असल्यामुळे त्यांनी शिष्यांना परत पाठविले असावे.

उत्तरेकडील बहुतेक सर्व तीर्थांना भेटी देऊन प्रभू दक्षिणेकडे वळले. प्रयाग, काशी, गया, हरिद्वार, गंगोत्री, बदरीनाथ, केदारनाथ ही ती तीर्थे. दक्षिणेतील प्रमुख तीर्थ माहूरलाही ते विसरले नाहीत. जगन्नाथपुरी करुन प्रभू व्यंकटगिरीला आले. तेथे काही दिवस निवास केला. अशा तऱ्हेने सर्व तीर्थांचे दर्शन करुन प्रभू गाणगापूरात आले. तेथून कोल्हापूर, श्रीनृसिंहवाडी येथेही गेले. येथे मुक्काम असताना असंख्य लोक दर्शनासाठी जमू लागले तेव्हा तेथून ते कल्याणास परतले.

अचानक प्रभू आल्यामुळे सारा कल्याण परिसर आनंदून गेला. त्यांचे स्वामी पुन्हा तेथे आले होते. या मधल्या काळात नृसिंहतात्यांनी आपले शिक्षण उत्तम तऱ्हेने केले होते. चिंदबराव या तालिकदाराच्या आग्रहामुळे तात्या हैदराबादला गेले होते. तेथे प्रभू परंपरेला अनुसरुन त्यांचे वर्तन होते. या ठिकाणी त्यांना भरपूर द्रव्यप्राप्तीही झाली होती. त्यामुळे घरच्या मंडळींचा योगक्षेम उत्तम चालला होता.

तात्यांनी फारसी विद्येचा उत्तम अभ्यास केला होता. संस्कृतातही त्यांनी अध्ययन पूर्ण केले. 'श्रीगुरुगीतेवर' त्यांनी 'ज्ञानशिखा' नावाचा ग्रंथही लिहिला. शिवाय 'अनिर्वाच्य' नावाचा स्वतंत्र वेदांतपर ग्रंथ लिहिला. एकंदरीत तात्याराव आपल्या व्यवहारचातुर्थ्याने विद्वतेने जनमानसात

आदरणीय ठरले होते. कल्याणातील शिष्यमंडळींना जे साधनमार्ग प्रभूंनी दिले होते ते सर्व जतन करुन प्रत्येकाने आपली उन्नती करुन घेतली होती. व्यंकम्मा तर पूर्णावस्थेस पोहोचली होती.

आपल्या पाठीमागे सर्व व्यवस्था उत्तम असल्याचे पाहून प्रभूंना परम संतोष झाला.

काही काळ कल्याणास राहून तेथून ते करकनळ्ळीस गेले तेथून ते रेकुळगीस आले. येथे बक्कप्रभूंची समाधि आहे. त्यानंतर प्रभूंचा मुक्काम रेकुळगीस होता. तेथे गोपाळबुवा ब्रह्मचारी त्यांना भेटले. शरीराने बळकट! त्याचे सारे आयुष्य ब्रह्मचर्यात गेले. त्याने स्वतःस प्रभूंना अर्पण केले. पुढे तो सतत प्रभूंसोबत राहू लागला. त्याच्या ताकदीच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. एकदा तो प्रभूंना पाठीवर घेऊन पाच-सहा कोस चालून गेला होता.

**<u>प्रभूंचे केतकी संगमावर आगमन.</u>**

केतकीसंगम हे प्राचीन क्षेत्र! येथे श्रीशंकराचे लिंग आहे. शिवास केवडा वाहत नाहीत. परंतु येथे केवडा वाहूनच पूजा करावी लागते. अशी कथा सांगितली जाते, केवड्याने शंकराकडून वरदान प्राप्त करुन या ठिकाणी त्याच्या पूजेत मान मिळवला! प्रभू या स्थळी एका अश्वत्थ वृक्षाखाली उतरले होते. तेथे बसताच त्यांना त्या वृक्षाखाली एक लिंग व एक तीर्थ बुजून गेल्याचे दिसले. जमलेल्या लोकांकरवी ती जागा खणून काढली तर आत लिंग! लोकांना आश्चर्य वाटले, गाळात फसून गेलेले लिंग प्रभूंना कसे दिसले ?

प्रभू तेथील महादेवाच्या मंदिरात पुजेस गेले व केवड्याची मागणी केली. परंतु ते दिवस केवड्याचे नसल्याने तो जवळपास कोठेही उपलब्ध होणार नव्हता. इतक्यात एका लिंगायत माणूस डोक्यावर कसला तरी भारा घेऊन चालला होता जवळ येताच तो केवड्याचा भारा असल्याचे पाहून सर्व मंडळींना आनंद झाला. त्याने सर्व केवडे प्रभूंसमोर ओतले. प्रभूंनी त्याला वस्त्रभूषणे देऊन संतुष्ट केले. लिंगायत निघून गेला. तो लिंगायत कोण ? कुठला हे कुणालाही कळले नाही. मात्र एका माणसाने त्याची माहिती काढण्यासाठी त्याच्या मागोमाग गेला. पण तो एकाकी गडप झाला. त्या माणसाला आश्चर्याचा धक्का बसला.

प्रभूंनी या संगमी राहून देवालयाची व सर्व तीर्थांची नीट व्यवस्था लावून दिली. लोकांना प्रबोधन केले. संगमाचे महात्म्य सांगून पटवून दिले. लुप्तप्राय झालेली आणखी काही तीर्थे दाखवून दिली. प्रभूंच्या निवासाने केतकी संगमास नंदनवनाची शोभा प्राप्त झाली.

येथे असताना एक यवन प्रभूंच्या दर्शनास आला. मिरजा हसनबेग त्याचे नाव! प्रभूंचे दर्शन करताच त्याची त्यांच्यावर निष्ठा जडली. प्रभू भक्त झाला. त्याने आपल्या सोबत उंची वस्त्रप्रावरणे आणली होती ती त्याने भक्तीभावाने प्रभूंना अर्पण करुन प्रभूंची पुजा केली. त्याच्या शुध्द भक्तीने संतुष्ट होऊन त्याला तीर्थप्रसाद देताना प्रभू म्हणाले, या पुढे तुमचा अधिकार वाढून अधिक सुख मिळेल! प्रभूंचाच आशिर्वाद तो! हसनबेग साहेबास अधिकारची बढती मिळाली. त्याचा खूप उत्कर्ष झाला. परंतु तो प्रभूंना विसरला नाही. आपल्या प्राप्तीतील चवथा हिस्सा तो दरसाल प्रभूंकडे पाठवित असे. आमरण त्याने प्रभूंची सेवा केली.

प्रभूंनी येथेही सर्व मंडळींच्या आग्रहास्तव (विशेषतः सांब सोमाजी याच्या आग्रहाने) गादीची स्थापना केली. त्या वेळेपासून संगमेश्वरी नित्य गादीची पूजाअर्चा होऊ लागली. तो क्रम आजही चालू आहे.

याच वेळी म्हणजे प्रभू या ठिकाणी असताना न्यालकलचे अण्णाराव देशमुख आपल्या बरोबर त्याना, पालखी, घोडे, हत्ती असा सरंजाम घेऊन प्रभूंच्या दर्शनास आले. हे पाहून प्रभू देशमुखांना म्हणाले, आम्ही गोसावी! हा थाट आम्हांला काय करायचा आहे ? परंतु देशमुखांनी विनम्रपणे आग्रह केल्याने प्रभू म्यानात बसून निघाले. मोठ्या उत्साहात प्रभू न्यालकलला पोहोचले. देशमुखांनी आपल्या गावी प्रभूंचे जंगी स्वागत करुन प्रेमपूर्वक, भक्तिने त्यांची पूजा केली. पुढे त्यांचे घराणे प्रभूंचे परम भक्त बनले. सध्याही त्यांचे वंशज दरवर्षी माणिकनगरात येऊन प्रभूंची सेवा करतात.

## <u>बेदरमधील चमत्कार.</u>

प्रभू न्यालकल मध्ये आले आहेत ही खबर बेदरला जाऊन कळली. तेथील नांदत असलेल्या अनेक धर्माच्या व पंथांच्या लोकांना प्रभूंच्या दर्शनाची उत्कंठा लागली. सर्व प्रमुख गृहस्थांनी एकत्र येऊन एक विचारे प्रभूंना बेदरला घेऊन येण्याचा बेत केला. प्रभूंच्या स्वागताची जय्यत तयारी करुन प्रभूंना मोठ्या सन्मानाने बेदर घेऊन येण्यासाठी असंख्य माणसे न्यालकलात येऊन पोहोचली. बेदरात त्यावेळी अनंत श्रीमंत माणसे होती. ती सर्व येथे आली होती. त्यात देशमुख, सरदेशमुख अनेक जहागीरदार, नबाब, परिजादे इत्यादी होते. त्यासर्वांची इच्छा प्रभूंनी बेदरास आपले चरणकमल लावावे अशी होती.

बेदर हे तसे ऐतिहासिक शहर! वैभवाने नटलेले! बादशाहीच्या राजधानीचे ठिकाण! अनेक राजकीय घडामोडी या शहराने पाहिलेल्या! धार्मिक उलाढालही ही पुष्कळ होत्या. दत्तात्रेयांचा प्रथम

बेदरमधील माणिकप्रभू मंदिर



हुमणाबाद मधील
श्री माणिकप्रभू मंदिर



अवतार श्रीपादश्रीवल्लभ यांनी रजकाला आशिर्वाद देऊन या ठिकाणचे राज्य दिले होते. त्याचे स्मरण पुढील अवतारी नृसिंह सरस्वती स्वामींनी रजकाला करुन दिले होते. यवन असूनही त्याने स्वामी महाराजांची आपल्या राजवाड्यात भक्तिपूर्वक पूजा केली होती. त्या बादशहाची आठवण होऊन आपणही प्रभूंना तसेच थाटामाटात बेदरला घेऊन जावे, असा समस्त बेदरकरांचा हेतु होता. प्रभूंचाही मनात बेदरात जायचेच होते. ते आता घडून येणार होते.

सन्मानपूर्वक घेऊन जाण्यास बेदरचे असंख्य लोक आले आहेत हे पाहून प्रभूंना संतोष वाटला. आनंदाने त्यांनी बेदरकरांची विनंती मानली व त्यांच्यासह निघाले.

एका सप्तशृंगार केलेल्या म्यान्यातून प्रभू बेदरला चालले होते. आजूबाजूला हत्ती, घोडे, शिपाई असा सरंजाम होता. वाटेत प्रभूनामाचा जयजयकार होत होता. अचानक भोईंचे पाय बेदरकडे न जाता दुसऱ्याच मार्गाकडे जाऊ लागले. बेदरच्या लोकांनी त्यांना मार्गावर आणले. तरी पुन्हा तेच घडले. इतक्यात रस्त्यावर एक मोठा भुजंग आडवा पडलेला दिसला. भोई घाबरुन गेले. प्रभूंचे शिष्यही म्यान्या समागमे चालले होते. त्यांनी तो प्रचंड भुजंग पाहिला आणि प्रभूंना हे वृत्त कळविले. प्रभू खाली उतरले व भुजंगाकडे गेले तोच तो पडलेला भुजंग फणा करुन अर्धा उभा राहिला. प्रभूंच्या दृष्टीस दृष्टी पडताच फणा खाली करुन चालू लागला. प्रभूंनी भोईंना व सर्वांना धीर देऊन म्हटले, तो कोणालाही उपद्रव देण्यास आला नाही. तो जाईल त्या दिशेने चला. तो ही एक सिध्द पुरुष आहे. त्याचीही इच्छा माझे पाय त्याच्या भूमीला पाय लागावेत अशीच आहे. तो दाखविल त्या स्थळी आपण जाऊ या.

त्या सर्पाच्या मागे सर्व लवाजमा झरणीनृसिंह येथे येताच तो गुप्त झाला. तेव्हा प्रभूंनी तेथेच मुक्काम करण्याचे ठरविले.

हे स्थळ फारच प्रेक्षणीय असे आहे. येथे नृसिंहाची मूर्ती आहे पण ती एका अंधकारमय गुहेत आहे. गुहेच्या तोंडातून स्वच्छ पाण्याचा प्रवाह बाहेर पडतो. कमरेइतके पाणी सदा सर्वकाळ तेथे असते. त्यातून एक फर्लांग चालून गेल्यावर एक घाट लागतो. त्याच्या काही पायऱ्या चढल्यावर कोरडी जागा लागते. तेथेच डाव्या बाजूस एक एक कमान लागते. त्यातील एकात नृसिंहाची उग्र मूर्ती आहे. श्रीनृसिंहापुढे नंदी आहे. ते नवलाचे वाटते. नवखा माणूस तेथे गेला तर त्याला भीतीच वाटली पाहिजे. पण आत देवाजवळ गेल्यावर निर्भयता येते.

औरंगजेबाने येथे स्वारी केली तेव्हा हे रमणीय स्थळ पाहून त्याला इजा पोचवली नाही. पण आपली खूण म्हणून तेथे जवळच एक मशिद मात्र बांधली. याच पवित्र क्षेत्रात प्रभूंच्या पूर्वजांपैकी केशव नाईक यांनी कठोर अनुष्ठान करुन देवाचा प्रसाद प्राप्त केला होता. आपल्या पूर्वजांनी जेथे तपश्चर्या केली त्या

स्थानाला भेट देण्याचा प्रभूंचा उद्देश असावा. अखेर प्रभूंची ती लीला असावी.

इकडे बेदरवासीयांना नवल वाटले. प्रभू इकडे येण्यासाठी निघाले व अचानक झरणीनृसिंहाकडे वळले. सर्वांनी आपापली घरे सजवून, गुढ्या उभारुन प्रभूंच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती. म्हणून त्यांची निराशा झाली. पण झरणी काय किंवा बेदर काय, दोन्ही एकच असे मानून सर्वांनी झरणीला प्रभू दर्शन करण्याचे ठरविले व झरणीस आले. प्रभू त्यावेळी एका वृक्षाखाली उघड्या हवेत बसले होते. म्हणून जमलेल्या लोकांनी आपापल्या वस्त्रांनी त्या जागेवर आच्छादन केले. प्रभूंच्या दर्शनासाठी बेदरवासी आलेच होते, मग काय लोकांची रीघच लागली.

प्रभूंचे दर्शन घडूनही प्रत्येक बेदरवासीनां प्रभूंचे चरण आपल्या घरी लागावेत अशी तीव्र उत्कंठा लागली होती. तशी सर्वांनीच प्रभूंना विनंती केली. त्यांचा प्रेमळ भाव पाहून प्रभू म्हणाले, जो कोणी मला आपल्या घरी चल म्हणेल त्याच्या घरी मी उद्या दुपारी येऊन पुजा घेईन. मग काय जो तो चढाओढीने हात जोडून पुढे येऊन प्रभूंना विनंती करु लागला. सर्व जाती-धर्माच्या लोकांना प्रभूंनी अभिवचन दिले प्रत्येकाने आपल्या घरी उत्तम तयारी करुन ठेवली.

शिष्य मंडळींनी दुसऱ्या दिवशी सर्व तयारी करुन ठेवली. सकाळपासूनच ही लगबग चालू होती. मात्र प्रभू एका शय्येवर गाढ झोपून होते. होता होता मध्यान्ह होत आली. पण प्रभू झोपलेलेच. त्यांना उठविण्याची कोणाची हिम्मत होती. निकटवर्ती चिंतातूर झाले. वचनाप्रमाणे प्रभू बेदरला गेले नाहीत तर प्रभूंच्या नावलौकिकास कलंक लागेल अशा भीतीने ते अधिक काळजीत पडले. व्यंकमा मात्र प्रभूंपासून काही अंतरावर बसून जप करीत होत्या. शांतपणे जपात मग्न होत्या. दोन प्रहर होऊन गेले. प्रभू गाढ निद्रेत ! आजच हे असे का घडते आहे ? कोणाला काही समजत नव्हते. कोण काय करणार ?

इकडे बेदरमध्ये अपूर्व सोहळा चालला होता. प्रभू प्रत्येकाच्या घरी दत्त म्हणून हजर झाले होते. कोणाकडे पूजा चालली आहे, कोठे आरती होत आहे, कोठे प्रभूंच्या गळ्यात सुवासिक फुलांचा माळा घालीत आहेत, कोठे प्रभू फळांचा आस्वाद घेत आहेत, कोठे प्रभू भोजन करीत आहेत, कोठे प्रभूंसमोर नृत्य चालले आहे, कोठे वेदपठन होत आहे तर कोठे प्रभू विडा चघळीत बसले आहेत. अख्खे बेदर प्रभूंच्या आगमनाने अत्यानंदित झाले होते. अशाप्रकारे आश्वासन दिल्याप्रमाणे प्रभूंनी सर्वांच्या घरी जाऊन त्यांनी अर्पण केलेले प्रेम स्वीकारले. सर्वांना प्रसाद देऊन प्रभूंनी झरणीची वाट धरली.

झरणीस अचानक प्रभू गाढ निद्रेतून एकाएकी जागे झाले. तेव्हा त्यांच्या अंगास दरदरुन घाम फुटला होता. फार श्रम झाल्याप्रमाणे त्यांना धाप लागली होती. हा प्रकार पाहून सर्व घाबरुन गेले. असे अचानक काय झाले ? कोणाला काय कळणार होते. बरे विचारण्याचीही कोणाची हिंमत नव्हती.

बेदरची माणसे मात्र आनंदात होती. परस्परांची भेट झाल्यावर जो तो म्हणू लागला, प्रभू आमच्या घरी आले होत. यातील खरे कोणाचे ? एकाच वेळी सर्वांकडे असणे ही अशक्य गोष्ट. सारे बुचकळ्यात पडले. याचा निवाडा प्रभूंकडे गेल्यावरच होईल. सबब सर्व बेदरवासी झरणीस आले. प्रभू तेव्हा एका पलंगावर स्वस्थ पहुडले होते. बेदरवासीयांनी शिष्यांना कालची घटना सांगितली. प्रभू एकाच वेळी सर्वांकडे होते सर्वांकडून पूजा घेऊन प्रसादही दिला. तेव्हा शिष्यांना, प्रभूंना आलेल्या घामाचा व श्रमाचा उलगडा झाला. प्रभूंची ही अद्‌भूत लीला पाहून बेदरवासी थक्क झाले.

## <u>बेदरच्या यवनांचे कपट कारस्थान.</u>

बेदरच्या अनेक उच्च मुसलमानांनी प्रभूंच्या सामर्थ्याचा अनुभव घेतला होता. त्यामुळे ते प्रभूंच्या भक्तीत लीन झाले होते. परंतु काही यवन मात्र प्रभूंना मानण्यास तयार नव्हते. त्यांना प्रभूंचा वेगळा करिष्मा पाहावयाचा होता. त्यामुळे प्रभूंची कठोर परिक्षा घ्यायच्या निमित्ताने ते यवन प्रभू दर्शनास झरणीस आले. दांभिकपणाचा आव आणून प्रभूंसमोर हात जोडून विनवू लागले, आपण इतरांना पावन केलेत तसे आम्हांलाही पावन करावे. उद्या सर्व शिष्यांसहीत आमच्या घरी येऊन आमची पूजा स्वीकारावी.

प्रभूंनी त्या यवनांचा मनातील कपटभाव आधीच जाणला होता तरी मोठा उल्हासाने म्हणाले, मी नक्कीच तुमच्या समाजात अथवा घरी तुम्ही सांगाल तेथे येऊन पूजा घेईन, तुम्ही द्याल ते स्वीकारीन. प्रभूंनी वचन देताच सारे बेदरला परतले व ठरल्याप्रमाणे त्यांनी सर्व तयारी करुन ठेवली.

दुसरे दिवशी प्रभू शिष्यांसह बेदरला हजर झाले. यवनांनी जंगी स्वागत करुन त्यांना उंच सिंहासनावर बसविले. प्रभूंची पूजा करुन गळ्यात पुष्पमाळा घातल्या. यवनीचालीप्रमाणे सर्वसोपस्कार त्यांनी केले. शेवटी निरनिराळ्या तबकात विविध खाण्याचे प्रकार त्यासोबत मांसाचे शिजविलेले प्रकार ठेवून ती तबके झाकून प्रभूंसमोर ठेवली. प्रभूं हिंदू जवळ खातात तसे आपल्याकडील खावे असा त्यांचा बेत होता. प्रभूंनी मांस खाल्ले तर ते बाटले जाऊन आपसूक आपले कार्य साधेल. नाही खाल्ले तर त्यांचा आपपरभाव सर्वांना कळून लोकांची त्यांच्यावरील श्रध्दा उडून जाईल. अशा दुहेरी हेतूने त्या यवनांनी डाव रचला होता. पण प्रभूंच्या सामर्थ्यांपुढे  हे काही त्यांना साध्य होणार नव्हते.

यवनांची तबके पुढ्यात आल्यावर प्रभूंनी हास्य करुन चिमाजीस सर्वांवरील झांकणे दूर करण्यास सांगितले. सारी शिष्यमंडळी भयभीत होऊन गेली. त्यांना यवनाच्या कृत्याची कुणकुण लागली होती.


चिमाजीने भीतभीत एक एका तबकावरील झाकण काढण्यास सुरुवात केली. नवलाई गोष्ट झाली, एकाही तबकात मांसाचे तुकडे नव्हते. सर्व तबके फुले, खारका, पेढ्यांनी भरलेली होती. ते पाहून सर्व शिष्यवर्ग व सज्जन मुसलमान यांना परम आनंद झाला. कपटी यवन मात्र ओशाळून गेले. प्रभूंच्या सामर्थ्याची त्यांना पूर्ण खात्री झाली. ते सारे प्रभूंना अनन्यभावे शरण गेले. दयाळू प्रभूंनी त्यांना क्षमा करुन म्हटले, अशा तऱ्हेने परमेश्वराचे सत्व पाहू नये.

प्रभूंचे ते सामर्थ्य व मनाचा मोठेपणा पाहून सर्व यवनांनी प्रभूंवर पुष्पवृष्टी करुन 'पीरान्पीर दस्तगीर' अशा शब्दांनी प्रभूंचा मोठा जयजयकार केला आणि साजशृंगारीत म्यान्यातून त्यांची मिरवणूक काढली. सारे सारे यवन प्रभूंचे कट्टर भक्त बनले. याच ठिकाणी मुस्लीम मोहल्ल्यात प्रभूंची गादी स्थापन केली गेली. प्रभूंनी येथे बराच काळ निवास केला आणि सर्वांना पराकोटीचा आनंद दिला. प्रभूंचा नावलौकिक संपूर्ण मोगलाईत हैदराबादपर्यंत जाऊन पोहोचला.

आपले बेदरचे कार्य संपवून प्रभू पुढच्या प्रवासास निघाले. वाटेत रस्त्यांवरील प्रमुख गावी भक्तांच्या इच्छेनुसार मुक्काम करीत राजूरी, भालकी, मंगलगी या परिसरातून कल्याणास निघाले. सोबत फक्त दोन भोई होते. हो ! कारण प्रभू म्यान्यातून चालले होते. येता येता हुमनाबादजवळील दोन ओढ्यांच्या संगमावर आले. व गडवंतीच्या दिशेने निघाले. वाटेत फारच झाडी तयार होऊन त्यात बोरीसारखी काटेरी झाडांची झाळीच तयार झाली होती. एका झाळीला म्याना अडकला. भोईंना पुढे जाता येईना. म्हणून त्यांनी तो थांबवला व प्रभूंना खाली उतरण्यास विनंती करुन आपण म्याना काढण्याच्या गडबडीत दंग झाले. प्रभू एकटेच जवळील सर्वेश्वराच्या मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या दोन बेलांच्या झाडाच्या सावलीत कट्ट्यावर आसन घालून विराजमान झाले.

**<u>माणिक नगरीची स्थापना.</u>**


प्रभू येथे आले आहेत ही खबर सर्वदूर पसरली. प्रभूंचा लौकिक सर्वत्र झालेला असल्यामुळे आसपासच्या गावांतील लोक तेथे धाव घेऊ लागले. लोकांच्या झुंडीच्या झुंडी लागल्या. हुमणाबादहून मोठमोठे व्यापारी, नायब, अमीन इत्यादी सारे प्रभू दर्शनास आले. लागलीच मंदिराच्या सभोवताली साफसफाई केली गेली. लोकांनी दुकाने थाटली. चहुकडे जत्रेचे स्वरुप दिसू लागले. आता यावेळी शिष्यवर्ग कोणीही नव्हता. ते पुढे निघाले होते. त्यांना ही खबर कळताच सर्व प्रभूंजवळ आले. व्यंकमाही त्यांच्या सोबत होती. शिष्य येऊन पहातात तो प्रभू उघड्या कट्ट्यावर बसले असून लोकांची झुंबड उडालेली आहे. हा प्रकार त्यांना नविन नव्हता. व्यंकमाही अशाच एका वृक्षाच्या सावलीत जाऊन



माणिकनगरी



माणिकनगर - प्रभूंचे घर




माणिकनगर - प्रभूंचे मंदिर



बसल्या.

प्रभू येथे येताच सगळीकडे विलक्षण शोभा पहावयास मिळत होती. रात्रंदिवस हे स्थान लोकांनी गजबजून गेले होते. प्रभूनामाचा अखंड जयजयकार होत होता. कल्याणहून मातोश्री बय्यंमा व तात्यारावही तेथे येऊन पोहोचले होते. तात्याराव आता नवाबाच्या पदरी मोठ्या हुद्यावर रुजू झाले होते. सर्व जाती जमातीचे लोक प्रभू दर्शनास येत होते. यात उच्च मुसलमान वर्गाचा भरणा अधिक असे. प्रभूंचे दर्शन होताच त्यांच्या सामर्थ्याची लगेच प्रचिती येऊन तेही प्रभूंच्या भजनी लागत होते.

त्यावेळी हुमनाबाद, गडवंती व धुमणसूर ही तीन गावे पायगा इलाख्यातील एकाच नवाबाच्या मालकीची होती. तोच एकमेव मालक होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या तिन्ही गावांची सीमा प्रभू ज्या स्थळी बसले होते तेथे येऊन मिळाली होती. त्यामुळे प्रत्येक गावच्या लोकांना प्रभू आपल्याच हद्दीत आहेत असे वाटून आनंद होत होता आणि अभिमानही वाटत होता. प्रभूंनी याच ठिकाणी कायमचे रहावे असे प्रत्येक गावच्या लोकांना वाटणे साहजिकच होते. तशी सर्वांनी प्रभूचरणी विंनतीही केली. प्रभूंनी त्यांची इच्छा मान्य केली. सगळीकडे आनंदी आनंद झाला. तिन्ही गावाने आपल्या हद्दीतील काही जमीन प्रभूंना दिली आणि प्रभूंचे नविन नगर स्थापन झाले, ‘माणिकनगर’ म्हणून! यात मुसलमानांचाही वाटा होता. सारे यवन ‘माणिकनगरला’ सहाय्यभूत झाले.

मोठ्या समारंभपूर्वक नगरस्थापनेच्या विधी होऊन प्रभू दत्तात्रेयांची गादी तयार झाली. एका गवताच्या झोपडीत तिची प्रतिष्ठा केली गेली. तिच्या शेजारीच प्रभूंसाठीही एक झोपडी तयार करण्यात आली. प्रभूंही तेथेच राहू लागले. अशा या ओसाड जंगलात एक सुंदर नगरी उभी राहिली. प्रभूंच्या झोपडी समोर गवताचा मांडव उभारण्यात आला. प्रभू जेव्हा तेथे गादीवर बसत तेव्हा तो दरबारचा थाट राजदरबारास लाजविल असा अपूर्व वाटे. कोणताही त्रास न होता हे नगर वसले गेले. नगररचनेचे कार्य प्रभूंनी दादामहाराजांवर सोपवले, ते त्यांनी पूर्ण केले. प्रश्न होता तो दरबारी शिस्त बसवून देण्याचा! ते काम प्रभूंनी तात्यारावांवर सोपविले. कारण तात्या आता नवाब पदरी राहून हे काम उत्कृष्टपणे शिकले होते. अर्थात जाणकाराच्याच हाती हे कार्य गेले. तात्यांनी सर्वत्र चौक्या पहारे ठेवून बंदोबस्त केला. प्रभूंच्या झोपडीमुळे पहारा देण्याचे काम पद्मसिंग नावाच्या रजपूताकडे सोपविण्यात आले. ते त्याने मरेपर्यंत अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे केले. अठरा कारखान्यांची व्यवस्था करण्यात आली. भंडारखाना सुरु केला गेला. भंडारखाना म्हणजे अन्नाचा प्रसाद देणारे अन्नपूर्णागृह. प्रभूंसाठी स्वतः अन्नपूर्णा तेथे येऊन भंडारखान्यात नित्य शेकडो लोकांचे अन्न शिजत असे. तरी प्रभू कधी पंक्तीत बसून जेवले नाही. पंचपक्वांने असली तरी! झोळीत जे अन्न येई त्यातील भाकर व लसणीची चटणी

तेवढी ग्रहण करीत. त्यांची झोळी घेऊन दोन ब्रह्मचारी हुमनाबाद मध्ये जाऊन शिजलेल्या अन्नाची भिक्षा घेऊन येत. त्याचाच नैवेद्य गादीला दाखविला जाई. हुमनाबादचे ब्राह्मण नित्य नवे नवे पदार्थ करुन झोळीची प्रतिक्षा करीत.

प्रभूंची बसण्याची ढबही एकच असे. आज त्यांचे जे चित्र पाहतो त्याप्रमाणेच असे. त्यांचे बोलणेही फार गोड व मृदु असे. बोलण्यात कधी कधी विनोदाचीही रेलचेल सामावलेली असे.

त्यावेळेस गुलाम मुस्ताफाखां नावाचा तालुकदार होता. शिस्तीचा मोठा कडक ! प्रभूंची किर्ति ऐकून त्यांच्या दर्शनास आला. त्याचा प्रभूंशी बराच वेळ चर्चेत गेला तेव्हा त्याने उद्‌गार काढले, प्रभूंसारखा वल्ली जगात इतरत्र कोठे मिळणे कठीण आहे. विशेषतः कोणत्याही मौलवीपेक्षा प्रभूंचे अरबी व फारसी भाषांचे ज्ञान अधिक असलेले पाहून तो चकित झाला. मुस्लिम धर्माचे रहस्य प्रभूंना पूर्ण ज्ञात आहे, अशी त्याची खात्री पटली. प्रभूंबद्दल अत्यंत आदरभाव निर्माण होऊन तो प्रभूभक्त बनला. त्याला मनस्वी वाटले प्रभू जर मुसलमान असते तर या क्षणी मी त्यांचा शिष्य झालो असतो आणि तसे मुस्ताफाखांने प्रभूंना बोलूनही दाखविले. त्यावर प्रभू हसून म्हणाले, होय साहेब, मलाही मुसलमान व्हावे असे खरोखर वाटते. पण काय करणार ? 'रब-अल् आलमीन' असे कुराणात म्हटले आहे. परंतु रब्-अल्-मुसलमीन असे म्हटल्याचे कुराणात कोठेही सापडत नाही. तसे वचन तुम्हांला मिळाले ते मला कळवा. प्रभूंच्या उत्तराने मुस्ताफाखां ओशाळून गेला.

'रब्-अल्-आलमीन' याचा अर्थ होतो विश्वाचा अधिपती. परमेश्वर हा विश्वाचा अधिपती असे कुराण सांगते. पण तो मुसलमानांचाच तेवढा अधिपती आहे असे कुराण म्हणत नाही. मग मुसलमान होऊन काय उपयोग ? असे प्रभूंनी मुस्ताफाखांला उत्तर दिले होते.

मुस्ताफाखां हा एक हटवादी मुसलमान होता. तरीही तेवढाच समंजस! प्रभूंच्या उत्तरानंतर त्याचा प्रभूंविषयीचा आदर अधिक दृढ झाला. माणिकनगर स्थापनेच्या कामी त्याने शक्य ती मदतही केली.

माणिकनगरीची स्थापना झाल्यापासून प्रभू सदैव आपल्या निवासस्थानात स्थिर झाले. शिष्यगणांसही अत्यानंद झाला. त्यावेळी नित्याचा कार्यक्रम आखला गेला. सातवारांचे भजन निश्चित झाले. प्रत्येक वारी त्या त्या देवतेचे भजन होऊन ठरलेल्या आरत्या होऊ लागल्या. शेजारती होऊन त्या दिवसाचा कार्यक्रम संपत असे. त्याचप्रमाणे नित्य पाठाचे ग्रंथही नेमण्यात आले. तात्यामहाराजांनी जी शिस्त लावून दिली होती त्याप्रमाणेच सर्व कामे वेळेवर व पध्दतशीर होत होती आणि त्याप्रमाणेच सर्व वागत होते. गादीमुळे जे काही द्रव्य येईल त्याचा विनियोग मातोश्री बयादेवींनी परिवाराच्या योगक्षेमाकडे करावा, अशी योजना झाली.

गादीची स्थापना झाली तो दिवस महत्वाचा मानला गेला. प्रभूं व त्यांचे दोन बंधू दादामहाराज व तात्यामहाराज या त्रिवर्गाचा भिन्न कार्यांचे ‘माणिकनगर’ हे केंद्रस्थान बनले होते. गादी स्थापनेचा दिवस अत्यंत भाग्याचा व आनंदाचा मानला जातो तो अशासाठीच, या दिवशी प्रभूंची ब्रीदावली प्रसिध्द झाली. अर्थात प्रभूंच्या दिव्य शक्तीचा तो जाहिरनामाच होता. या संबंधीची एक आख्यायिका प्रसिध्द आहे, कोणी एक अदृश्य दिव्य पुरुषाने ही ब्रीदावली मोठ्या सुरात म्हटली, तेव्हा संप्रदायास पूर्त स्वरुप प्राप्त होऊन एक वाक्यता आली. प्रभूंकडे अनेक जाती, धर्माचे, पंथाचे लोक येत. प्रत्येकाचे विचार भिन्न, मतेही भिन्न. परंतु प्रभू दर्शन होताच एकरुप होऊन जात असत. हाच मोठा विलक्षण चमत्कार होता. प्रत्येक धर्माच्या लोकांना प्रभूंमध्ये त्यांच्या आराध्यदैवताचे दर्शन होई.

प्रभूंच्या ब्रीदावलीत प्रथम ब्रीद भक्तांचे मनोरथ पूर्ण करणे, हे आहे. आणि शेवटचे पद ‘सकलमतस्थापित सद्‌गुरु’ असे आहे. त्याचे प्रत्यंतर सर्वांनी घेतले होते. म्हणूनच सर्व लोकांनी एकमुखाने, एकविचाराने आणि प्रेमळ अंतःकरणाने ब्रीदावलीचा उच्चार करुन ती जाहीर केली. मान्य केली!

माणिकनगरी आता मूर्तस्वरुपात आली होती. आसपासच्या लोकांनी त्यासाठी मोठ्या संतोषाने आपापल्या गावची जमिन दिली होती. परंतु तिला राजमान्यता मिळाली नव्हती. जोपर्यंत राजमान्यता मिळत नाही तोपर्यंत मालकी होत नाही. हा प्रश्न सर्वांसमोर उभा राहिला. पण प्रभूंच्या कृपेने त्याचे निवारण झाले. त्यावेळी शमसुल उमरा नामक नवाबांची जहागिरी होती. हुमनाबाद, गळवंतीव धुमणसूर ही तिन्ही गावे त्या नबाबाच्या माकीची होती. नवाबसाहेबही प्रभूंचे भक्त बनले होते. सन्मानपूर्वक विनंती करुन जो महात्मा कोठे जात नाही, तो अनायासे आपल्या हद्दीत येऊन स्थिरावला आहे याचा अत्यानंद नवाबसाहेबांना झाला होता. त्यांचीही प्रभूंनी येथे कायम वास्तव्य करुन रहावे अशी मनोमन इच्छा होती. ही संधी नवाबसाहेब थोडेच सोडणार होते! त्यांनी ताबडतोब तालुकादारास तिन्ही गावच्या सनदा तयार करुन हजर राहण्याचा हुकूम सोडला. हे तालुकादार म्हणजेच मुस्ताफाखां! त्यांनीही आनंदाने सनदा करुन प्रभूंच्या चरणी विनंतीपूर्वक अर्पण केल्या.

दिवसेंदिवस माणिकनगरात सर्व गोष्टींची पूर्तता होत चालली होती. प्रभू व्यवहारात कधीच लक्ष देत नसत. तथापि हे तिन्ही बंधू एका विचाराने वागून माणिकनगरीची बळकटी करीत होते. व्यवहाराच्या दृष्टीने प्रभूंच्या दोन्ही बंधूचे माहात्म्य सर्वांना पटणारे होते. प्रभूंप्रमाणे त्यांनाही सर्वत्र मान मिळत होता. आदर व्यक्त होत होता. माणिकनगरच्या उत्कर्षासाठीच तिघे बंधू झटत असत.

प्रभू एकेच ठिकाणी निवास करुन राहिल्यापासून माणिकनगरात नित्य अलोट गर्दी उसळत होती.

काशीपासून रामेश्वरपर्यंत प्रभूची किर्ती पोचली होती. सर्वत्र प्रभूंचा जयजयकार होत होता.

**प्रभूंचा दरबार.**

दरबार म्हटले की आजकाल वेगळा अर्थ काढला जातो. परंतु प्रभूंचा दरबार केवळ पारमार्थिक होता. यातील मुख्य उद्देश, प्रभूंच्या दर्शनाने पावन होण्याचा होता. त्याची रचनाही भिन्न होती. येथील दरबारची शिस्त तात्यारावांनी बसविली होती. त्यामुळे कदाचित राजकिय दरबारचे बाह्यात्कारी स्वरुप आले असावे. लोक समुदाय हाच दरबारचा मुख्य घटक होता. तात्यासाहेब हे प्रथमपासूनच दरबारात वावरल्यामुळे त्यांना प्रभूंच्या दरबारची यथायोग्य व्यवस्था करण्यास फार श्रम पडले नाहीत. कोणी प्रभूंचे केव्हा व कशाप्रकारे दर्शन घ्यावे, कशा पध्दतीने वागावे, बसावे, कोणी निंदनीय कर्म केल्यास त्याचा बंदोबस्त कोणी करावा इत्यादी कामावर हुशार व योग्यच माणसांची नेमणूक करण्यात आली होती. प्रभूंचे आपण ऐकण्यासाठी, प्रभू सर्वांना कोठूनही दिसावेत अशाच तऱ्हेची योजना राबवली होती. मंडपाच्या मध्यभागी एक छाती एवढा उंच कट्टा घालण्यात आला होता. त्यावर गादी घातलेली असे. बाजूस तक्या असे. प्रभू त्या तक्याला टेकून विशिष्ट ढबात आनंदात डुलत बसायचे. त्यामुळे चोहोबाजूंनी प्रभूंची मनोरम मूर्ती सर्वांच्या दृष्टीस पडत असे. या सर्व व्यवस्थेत एक महत्वाची व्यवस्था अशी, प्रभूंच्या उजव्या अंगास वैदिक ब्राह्मण, शास्त्री, संन्याशी यांना बसण्याची सोय केली होती, तर डाव्या अंगाला स्त्रियांसाठी जागा असे.

दरबारात कंचन्यांचे नृत्य सुरु असायचे, कोणी गवई आपली उत्तम गायकी सादर करीत असे, कोणी तबलावादक, पखवाजवादक, सतार-सारंगी वादक आपल्या हस्तकौशल्याची चुणूक दाखवित. पुराणिक पुराण सांगत तर वैदिक वेदघोष करीत असत. शास्त्रपंडितांचा वाद-विवाद सुरु असायचा. थोडक्यात जो तो दरबारात आपापल्या कार्यात दंग असे. निरनिराळे विषय घेऊन शेकडो याचक प्रभूंसमोर उभे रहात. प्रभूंही त्यांच्या मनातील खूण ओळखून त्यांचे समाधान करीत. प्रभूंच्या या दरबारात कोणीही दुःखग्रस्त, शोकाकूल व लाभाच्या इच्छेने आला तरी त्याच्या मनोकामना पूर्ण होऊन त्याची इच्छापूर्ति होत असे.

माणिकनगरी वस्ती करुन राहिलेल्या कोणाही व्यक्तीस मनाची तळमळ, चिंता उद्भवत नसे. जो तो प्रभूंचे गुणगान करण्यात दंग असायचा. ज्याच्या मुखी प्रभू नाम आहे त्याला कसली चिंता ? कारण प्रभूच त्याच्या सोबत आहेत.

प्रभूंची वाणी रसभरीत व कोमल होती. ज्याच्याशी संवाद करायचे त्याच्या मनावर पक्के बिंबले

जायचे. ज्याच्या मनाचा जो कल असे तसाच त्याच्याशी संवाद करुन त्याला खूष करीत व प्रोत्साहनही देत.

अशा या दरबारची बैठक कधी कधी अनियमीत कालापर्यंत चाले. लोकसमुदायावर दरबारची कालमर्यादा ठेवली जात असे. सर्वांना प्रसाद, देणगी, बिदागी, संभावना वगैरे पोहोचल्यानंतरच दरबार बरखास्त होई.

येथपर्यंत प्रभूंनी आपल्या वयाची तीशी गाठली होती. राजऐश्वर्यच माणिकनगरास येऊन राहिले होते. दारी हत्ती, घोडे, मेणें, पालख्या आणि राजेरजवाडे झुलत होते. ज्याच्यावर प्रभूंची दृष्टी जाईल त्याचे भाग्य उजळले, अशीच लोकांची समजूत झाली होती. परंतु ह्या ऐश्वर्यातही प्रभूंची विरक्त वृत्ती, स्वातंत्र्य, आनंद कायम राहिला होता. नम्र आणि दयाळू वृत्तींत काडीइतकाही फरक पडला नव्हता. त्यांना ऐश्वर्य नको होते. परंतु लोकांना ऐश्वर्यात ठेवण्यात, पाहण्यात आनंद मिळे. केवळ आणि केवळ परोपकार व दानधर्म या व्यतिरिक्त कोणताच विषय त्यांना प्रिय नव्हता. म्हणूनच नित्य हजारो माणसांचा अन्नखर्च, हजारोंच्या लहानमोठ्या द्रव्यादिकांच्या मागण्या व इतरही अनेक मागण्या प्रभू पूर्ण करीत व सर्वांना आनंद देत.

## प्रभूंचा चमत्कार कथा.

प्रभूंचे चरित्र चमत्कारांनी भरुन गेले आहे. सामान्य लोकांना चकित करण्यासाठी चमत्कार केले नाहीत; लोक परमेश्वराच्या भक्ती मार्गास लागावे, त्याचे सामर्थ्य कळावे म्हणून योगमार्गे प्रभूंनी अद्‌भूत गोष्टी घडवून आणल्या त्याच त्या प्रभूंच्या लीला.

## बुडते जहाज तारले.

एकदा प्रभू दरबारात गादीवर बसले असता, एकाएकी त्यांनी आपले दोन्ही हात वर करुन काही वेळ बसले. यासमयी त्यांच्या अंगी साधा कबा होता. कोणाला तरी आधार दिल्यासारखे त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते. सर्व लोक चकित होऊन ते दृश्य पाहात होते. काही वेळाने प्रभूंनी आपले हात खाली केले असता त्यांच्या दोन्ही अस्तन्यातून टपटप पाणी गळत होते. अंगावरील कबा ओलाचिंब होऊन गेला होता. याचा उलगडा कोणाला होईना. प्रभू इतके घामाघूम कसे झाले, असेच प्रत्येकाला वाटू लागले. तेवढ्यात प्रभूंनी अंगावरील कबा काढून टाकला. शिष्यांपैकी एकाने तो घेऊन पिळून काढला.

कोणी कोणी ते पाणी चाखून पाहिले तर ते खारट निघाले.

प्रभूंना असे अचानक काय झाले याचा उलगडा कोणालाही झाला नाही पुढे काही महिन्यांनी मुंबईतील एक मोठा व्यापारी प्रभू दरबारी आला. प्रभूंचे दर्शन करुन नवस केल्याप्रमाणे पैशांची रास प्रभू चरणी ओतली. त्याने सर्वांना आपली कथा सांगितली तेव्हा प्रभूंची वर हात केल्याची करणी कळून चुकली.

हा व्यापारी लक्षावधी रुपयांचा व्यापार करणारा! एकदा आपल्या जहाजांत लाखो रुपयांचा माल भरुन पोरबंदरहून मुंबईस येण्यास निघाला. भर समुद्रात अचानक वादळ निर्माण होऊन जहाज हेलकावे खाऊ लागले. इतरही अनेक माणसे त्या जहाजात होती, जहाज कोणत्याही क्षणी पाण्याखाली जाईल अशी जाणीव होऊन सर्वांना आपला विनाशकाल जवळ आल्याची जाणीव झाली. व्यापाऱ्याने देवाचा धावा सुरु केला. पंढरपूरचा विठोबा, तुळजापूरची भवानी इत्यादी देवदेवतेच्या नावाने मोठमोठ्याने हाका मारु लागला. तोच एका मुसलमान गृहस्थाने म्हटले, दगडाच्या देवांना हाका मारण्यापेक्षा चालत्या बोलत्या माणिप्रभूंना हाक मार. त्यासरशी त्या व्यापाऱ्याने प्रभूंच्या नावाने हाक मारुन नवस केला. आपल्या भक्ताची आर्त हाक ऐकताच दयाघन प्रभूंनी बसल्या जागीच हात वर करुन जहाजाचा बचाव केला.

व्यापाऱ्यांनी आणलेले नवसाचे धन प्रभूंच्या चरणी अर्पण करताच प्रभू म्हणाले, नवसात बोलल्याप्रमाणे तेवढी रक्कम आहे का? व्यापाराने लागलीच हिशोब केला असता त्यात काही रक्कम कमी असल्याचे आढळले. त्याने लागलीच ती रक्कम पूर्ण केली. म्हणजे व्यवहारातही प्रभू किती दक्ष होते त्याचा हा दाखला.

## दमडीच्या साखरेचा नवस.

हुमनाबादमध्ये एक गृहस्थ होते. अगदी विचित्र आणि नास्तिक! प्रभूंकडे जाणाऱ्या, प्रभूंकडे नवस करणाऱ्या भाविकांची नेहमी थट्टा करायचे. स्वतः कधीही प्रभू दर्शनास गेले नाही वा प्रभूंविषयी इतरांकडून काही ऐकून घेतले नाही.

एकदा या गृहस्थाचा नवा कोरा जोडा हरवला. त्याच्या जीवाला फार हुरहुर लागली. लोक प्रभूंकडे नवस करतात आणि प्रभू तो नवस पूर्ण करतात हे त्याला चांगलेच माहित होते. पण पाखंडी व कंजुष माणसाचे काय बोलावे. अंती नाईलाजाने त्या गृहस्थाने स्वभावाला अनुसरुन प्रभूंकडे नवस केला.

माझा जोडा आजचे आज सापडला तर एक दमडीची साखर वाहिन. प्रभूंचीच लीला, त्याच दिवशी त्याचा जोडा सापडला. आता मात्र आपण एक दमडीच्या साखरेचा नवस केलेल्याची लाज वाटू लागली. म्हणून त्याने चार आण्याचा साखरेचा पुडा घेतला व प्रभू दर्शनास आला. नित्याप्रमाणे गर्दी होतीच. तीतून वाट काढीत तो प्रभूंजवळ आला आणि प्रभूचरणी साखरेचा पुडा ठेवून नमस्कार करणार, इतक्यात प्रभू आपल्या एका शिष्याला म्हणाले, तागडी घेऊन ये. त्याने तागडी आणताच प्रभू त्या गृहस्थास म्हणाले, तुझ्या नवसाप्रमाणे फक्त एक दमडीची साखर तोलून मला दे. बाकीची मला काय करायची आहे ? प्रभूंची वाणी ऐकून तो गृहस्थ लज्जित झाला. नमस्कार करुन प्रभूंजवळ क्षमा याचना करु लागला. प्रभू म्हणाले, अरे परमेश्वराची अशी परिक्षा करु नये. तुझ्या एका दमडीसाठी माझ्या प्रभूला किती कष्ट पडले असतील याचा विचार कर. ओक्साबोक्सी रडत तो गृहस्थ प्रभूंच्या चरणांवर पडला मला एकदा क्षमा करा, अशी विनंती करु लागला. जो सर्वांचे अपराध पोटात घालतो तो हा क्षुल्लक अपराध पोटी घालणार नाही का ? प्रभूंनी त्याच्यावर दया केली. पुढे हाच गृहस्थ प्रभूंचा प्रेमळ भक्त बनला.

**<u>तपकिरीची डबी.</u>**

बाबा काटकर ! लातूरचे रहिवाशी. ते दरवर्षी श्रीव्यंकटगिरीस काठी घेऊन जात असत. एकदा ते माणिकनगरी प्रभू दर्शनास आले, तेव्हा प्रभूंनी त्यांना व्यंकटेशरुपात दर्शन दिले. काटकर त्या आनंदात प्रभूंना म्हणाले, प्रभू आता मला गिरीला जाण्याची गरज नाही. कारण आपल्या दर्शनानेच माझी सर्व मनकामना पूर्ण झाल्या. त्यावर प्रभूंनी त्ायची समजूत काढून म्हटले, आपल्या वाडवडिलांची वहिवाट सोडू नये. तू गिरीला जात जा. मात्र जाता जाता येथे येण्याचा क्रम ठेवा. प्रभूंच्या आज्ञेनुसार काटकर प्रतिवर्षी माणिकनगरी पाय लावित.

एकदा काय झाले, लातूरहून माणिकनगरीकडे येताना त्यांना तहान लागली म्हणून एका विहिरीत उतरले. तहान भागल्यावर घाईघाईत वर आल्यामुळे त्यांची तपकिरीची डब्बी तेथेच एका पायरीवर राहिली. पाणी प्राशन करण्याच्या धांदलीत त्यांना डबी तेथे ठेवल्याचे विस्मरण झाले होते. प्रभू दरबारी आल्यावर तपकिरीचे स्मरण होताच ते डबी शोधू लागले तर कोठे सापडेना. पुष्कळ शोधाशोध केली. डबी मिळणार कशी ? ती तर विहिरीवरच राहिली होती. काटकरांना रहावेना. डबी सापडल्यास प्रभू चरणी एक शाही पैशाची साखर वाटेन असा नवस केला. पुढे काही दिवसानंतर प्रभू दर्शनास गेले असता काटकरांना तपकिरीची डबी प्रभूंच्या गादीवर असलेली दिसली. आपण बोलल्याप्रमाणे नवसाची

आठवण होऊन ते शरमिंदे झाले. त्यांचे अंतरंग ओळखून प्रभू म्हणाले, गिरीस जाताना पर्वत चढताना पाय दुखू नयेत म्हणून काय लोक काय नवस बोलतात. काटकर हात जोडून म्हणाले, गिरीनाथाला आम्ही एक पै चा नवस बोलतो.

होय ना ? तुमचा नवस तर एक शाहीचा आहे. तेवढी शाहीची साखर आणून आपली डबी घ्या पाहू !

## शास्त्रीबुवांना पंक्तीचा लाभ!

एकदा एक महान विद्वान शास्त्री प्रभू दर्शनासाठी माणिकनगरात आले. दरबारचा थाट, तेथील प्रसन्न वातावरण पाहून संतोषले. दरबारच्या शिरस्त्याप्रमाणे शास्त्रींची राहण्याची व पोटापाण्याची सोय लागली. प्रभू दर्शन घडले. प्रभूंची रोज संभाषण करण्याचा योगही घडून येत होता. प्रभूंच्या कृपेने सर्व गोष्टी यथासांग चालल्या होत्या हे पाहून शास्त्रींच्या मनात प्रभूंविषयी आदरभाव दृढ झाला. प्रभूंशी नित्य बोलणे होत असल्याने त्यांची भीड चेपती झाली होती. एके दिवशी त्यांनी प्रभूंजवळ विनंती केली, महाराज इतक्या दिवसात आपल्या सोबत पंक्तीचा लाभ मिळाला नाही. एकदा तो घडावा अशी इच्छा आहे.

प्रभू प्रेमाने म्हणाले, अहो शास्त्रीबुवा आम्ही पडलो फकीर. आमची पंगत ती कसली ? शिवाय तुम्हांला ती मानवली पाहिजे. आमची वेळ ठरलेली नसते. तुमची इच्छा आहे तर तुम्हांस बोलावून घेईन.

शास्त्रीबुवा त्यास तयार झाले. आपण जेव्हा निरोप पाठवाल तेव्हा आनंदाने हजर राहिन. तर मग ठरले तर ! उदयीक तुम्हांला बोलावून घेतो असे प्रभू उत्तरले. शास्त्री अगदी आनंदून गेले. प्रभूंच्या शाही थाटाचा प्रसाद प्रभूंसोबत मिळणार अशी कल्पना करुन ते प्रभूंच्या निमंत्रणाची वाट पाहू लागले. दिवस सरत आला तरी निरोप आला नाही. अखेर रात्री अकरा वाजता प्रभूंकडून माणूस आला, चला प्रभू वाट पहात आहे. शास्त्रीबुवा आनंदी अवस्थेत प्रभूंजवळ येऊन पोहोचले. तेथे येताच पंक्तीचा कसलाच थाट नजरेत पडला नाही. पक्वान्नाचा वासही येत नव्हाता.

प्रभू एका हातात एक साधी जोंधळ्याची भाकर घेऊन बसले होते. त्यावर लसणीची चटणी होती. शास्त्रींना पाहताच हसून त्यांचे स्वागत करुन प्रभूंनी त्यांना आपल्या जवळ बसवले आणि शिष्यास झोळीतून एक भाकर व त्यावर लसणीची चटणी देण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या शिष्याने एक जाडीभरडी भाकर त्यावर लसणीची चटणी शास्त्रींच्या हाती दिली. प्रभूंनी मोठ्या चवीने भाकर खाल्ली

आणि त्यावर पाणी पिऊन एक तृप्तीचा ढेकर दिला. शास्त्रीबुवांच्या मात्र नाकाडोळ्यातून गंगा-जमूना वाहू लागल्या. असले खाणे त्यांनी कधी न खाल्यामुळे चतकोर भाकरही त्यांच्याने संपवेना. त्यांची ती अवस्था पाहून प्रभू म्हणाले, शास्त्रीबुवा, अहो हा श्रीदत्ताच्या झोळीचा महाप्रसाद आहे. मोठ्या भाग्यवंतालाच तो लाभतो. पण तुम्हांला त्याची सवय नाही ना! मग कसा मानवेल ?

**माणक्याचे रक्षण केले.**

प्रभूंना लहान मुलांची फार आवड होती. लहान मुलांबरोबर ते त्यांच्याप्रमाणेच खेळत असत. त्यामुळे लहान मुलांना प्रभूंचा लळा पटकन लागे. एखाद्या लहान मुलाचा आवाज गोड वाटला की प्रभू एखादे गोड पद त्याला शिकवायचे.

अशा या लहान मुलांमध्ये 'माणक्या' नावाचा एक पाटलाचा मुलगा प्रभूंवर खूप माया लावित असे. प्रभूंचा त्याला लळाचा लागला होता. प्रभूंच्या आशिर्वादानेच त्याचा जन्म झाला होता. म्हणून वडिलांनी त्याचे नाव माणिक असे ठेवले होते. प्रभू त्याला माणक्या म्हणत. माणिकनगरीपासून चार कोसावर पाटलाचे गाव होते. दर गुरुवारी तो पाटील आपल्या मुलास घेऊन प्रभू दर्शनास येत असे. प्रभू हेच माणक्याचे आई-वडिल झाले होते. घरी परत जाताना मात्र पाटलाची त्रेधा उडत असे. कारण माणक्या प्रभूंपासून दूर व्हायला राजी नसायचा.

एके दिवशी माणक्या खेळाच्या नादात एका खोल विहिरीत पडला. पडता पडता माणक्याला प्रभूंची आठवण झाली. आपल्या बोबड्या शब्दात त्याने प्रभूंना हाक मारली. प्रभू स्वस्थ थोडीच बसणार! माणक्याला वरच्यावर झेलले. त्याला कसलीही इजा पोचली नाही. आपण प्रभूंजवळ नेहमीप्रमाणे खेळत आहोत असेच वाटून राहिले.

इकडे माणक्याच्या आई-वडीलांना माणक्या विहीरीत पडल्याचे समजताच त्यांची धावपळ उडाली. आईने एकच आकांत मांडला. साहजिकच होते. एवढ्या खोल विहिरीत लहान मुलगा पडला, तो जीवंत राहू शकणार नाही. शेवटी आईच ती तिचे हृदय फाटूनच जाणार. विहिरीकडे येऊन तिने मोठ्याने माणक्याला हाक मारली. आईचा आवाज ऐकून माणक्याने आतूनच आरोळी ठोकली. सर्वांना आश्चर्य वाटले ते. इतक्या खोल विहिरीत पडून सुध्दा तो जीवंत कसा ? कोणीतरी एक दोर घेऊन विहिरीत उतरला व त्याने माणक्याला बाहेर आणले. वर येताच आईने आनंदाने कवठाळून विचारले, बाळ, तू अजून जीवंत कसा राहिलास ? माणक्या बोबड्या आवाजात म्हणाला, मी प्रभूंबरोबर खेळत होतो. ते आतमध्ये आहेत, असे म्हणून आपल्या डोकीला घातलेली पागोट्याची कळी दाखविली. तेव्हा मात्र

सर्वांची खात्री पटली, प्रभूंनी आपल्या सामर्थ्याने माणक्याला वाचवले.

**गरीब ब्राह्मणाला जीवंत केले.**

प्रभू दरबारात नित्य याचकांची रीघ लागलेली असे. प्रभूंकडे जात-पातीचा संबंध नसे. नाना जातीचे, पंथांचे लोक द्रव्य मागण्यास येत. एके दिवशी एक गरीब ब्राह्मण आपल्या धाकट्या बंधूसह प्रभू दरबारी आला. आपल्या या बंधूच्या विवाहासाठी त्याला द्रव्याची गरज होती. त्याने चारशे रुपयांची प्रभूंकडे मागणी केली. प्रभूंनी ब्राह्मणास राहण्यास सांगितले. नित्याप्रमाणे तेथे भोजन करुन कित्येक दिवस राहिले. आपल्या समोर हजारो याचक द्रव्य घेऊन जातात, परंतु आपल्याला बोलावणे येत नाही, हे पाहून तो निराश होऊ लागला. परंतु प्रभू आपल्याला नाराज करणार नाहीत याची पूर्ण खात्री होती. अशावेळी ब्राह्मणाच्या बंधूस सर्पदंश झाला व तो मरण पावला. ते पाहून सर्वच हळहळले. ब्राह्मण धाय मोकलून आक्रोश करु लागला. ज्या भावाच्या लग्नाकरीता प्रभू दरबारी आलो तोच मृत्युमुखी पडल्याचे पाहून त्याचा शोक अनिवार झाला. प्रभूंच्या कानी ही बातमी पडताच प्रभू हळहळून म्हणाले, अरेरे, बिचारा ब्राह्मण! लग्नासाठी येथे राहिला आणि लग्न न होताच मृत्यू पावला! त्यांनी शिष्याला आज्ञा केली, जो साप या ब्राह्मणाला चावला आहे त्याला इकडे बोलावून आणा. सारे शिष्य बुचकळ्यात पडले. शेवटी प्रभूंनी मशाल घेऊन उभ्या असलेल्या दत्तू न्हाव्याला त्या कामगिरीवर पाठविले. बिचारा दत्तू हाती मशाल घेऊन भीतभीत संगमाजवळ आला आणि जोराने म्हणाला, अहो, ब्राह्मणास चावलेल्या नागोबा, प्रभूंनी तुम्हांला ताबडतोब बोलावले आहे. चला लवकर!

दत्तू न्हाव्याचा आवाज ऐकताच एक प्रचंड नाग फुत्कार टाकीत त्याच्याकडे चालून आला. मग काय, दत्तू प्रभूंचे नाव घेत पळत सुटला. नागानेही त्याची पाठ धरली व प्रभू दरबारी आला. बसलेली सारी मंडळी त्या भयंकर नागाला पाहून घाबरुन गेली. तो प्रभूंसमोर येताच प्रभूंनी आपल्या अंगावरचे वस्त्र त्याच्यापुढे टाकले. त्यावर नागोबाची स्वारी वेटोळे घालून फणा वर काढून डोलू लागली. प्रभू त्याला उद्देशून म्हणाले, आमच्या दरबारी रोज हजारो बालगोपाळ येतात. त्यांचे रक्षण करण्याचे सोडून त्यांना उपद्रव देणे चांगले नाही. इतके बोलून प्रभूंनी आपल्यापुढे असलेल्या खारकेपैकी एक खारीक उचलून आपल्या तोंडात घातली. व ती पुन्हा बाहेर काढून ब्राह्मणाच्या हाती देत म्हटले, ही उगाळून तुमच्या बंधूच्या तोंडात घाला म्हणजे तो उठेल.

पुन्हा असे कृत्य न करण्याची तंबी देऊन नागोबाची रवानगी केली. नागोबाही सरदिशी निघून गेला. इकडे ब्राह्मणाने प्रभूंनी दिलेला खारका उगाळून मृत बंधूच्या मुखात घालताच झोपेतून उठल्यागत तो

शुध्दीवर आला. सर्व मंडळी हा प्रकार पाहून स्तंभित झाली. प्रभू सामर्थ्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

त्या तरुण ब्राह्मणाला पुन्हा जीवंत केल्यावर प्रभूंनी त्याच्या अपेक्षेप्रमाणे देणगी देऊन दोन्ही बंधूंना संतुष्ट केले. वडील बंधूला कळून चुकले, आपल्या भावावर खरोखरच गंडांतर होते. म्हणून प्रभूंनी इतके दिवस आपल्याला स्वत:जवळ ठेवून घेतले; आणि अपमृत्यूतून आपल्या बंधूस वाचविले. साक्षात मृत्युंजयाजवळ राहिल्यानेच आपले संकट टळले.

## <u>साईबाबा प्रभूंच्या भेटीस आले.</u>

एकदा प्रभू दरबारात बसले असता एक तेज:पुंज फकीर प्रभूंजवळ आला. अंगावर झबा व डोकीस पटका असा त्याचा वेष! त्याच्या हाती एक लहानसा लोटा होता. तो प्रभूंजवळ धरुन म्हणाला, इतना लोटा भर दे! त्यावेळी तात्यामहाराज प्रभूंजवळच बसले होते. काही शास्त्री मंडळींसोबत वेदांतावर चर्चा चालू होती. त्यांचे लक्ष काही फकिराकडे गेले नाही. प्रभूंनी तात्यांना हाक मारुन फकिराचा लोटा रुपयांनी भरुन देण्यास सांगितला. वादविवाद ऐन भरात आल्यामुळे तात्यांनी फकिराकडे न पाहताच लोट्यात रुपये भरत होते. जवळची सर्व रक्कम संपून गेली तरी लोटा रिकामाच! पण तात्यांचे लक्ष होतेच कोठे? फकीर मात्र स्मित हास्य करीत हा प्रकार पाहात उभा होता. प्रभूंनी तात्यांकडून तो लोटा आपल्या हाती घेऊन त्यांत दोन खारका व फुले ठेवली असता लोटा रुपयांनी भरला गेला. फकिराने फक्त त्या दोन खारका व फुले घेतली आणि इतना काफी है! असे म्हणून लोटा पालथा केला. ओतलेल्या रुपयांचा ढीग तात्यांनी टाकलेल्या रुपयांचा पाचपट होता. फकीर प्रभूंसमोर मस्तक लवून निघून गेला. तात्याराव अजूनही वादविवादात दंग होते. फकिराची कृती त्यांच्या लक्षातच आली नाही. शेवटी प्रभू म्हणाले, तात्या येथे कोण माणसे येतात? कशी येतात? काय करतात? इकडे लक्ष न देता वायफळ काथ्याकुट काय करीत बसला आहेस? त्या फकिराचा लोटा तुला भरता आला नाही. त्याने लोटा ओतलेल्या रुपयांचा ढीग तरी पहा!

प्रभूंचे बोलणे ऐकताच तात्यारावांचे लक्ष त्या ढिगाकडे गेले. ते पाहून चकितच झाले. तो फकीर कोण याची शोधाशोध सुरु केली. चारी बाजूला माणसे पाठवली. फकीर थोडाच त्यांना सापडणार होता?

श्री. अच्युत यशवंत धोंड यांनी लिहिलेल्या 'श्री साईबाबा- अवतार व कार्य' या ग्रंथात ही कथा आली आहे. फकीराच्या वेषांत खुद्द साईबाबा प्रभूंच्या दरबारात गेले होते, हे सिध्द होते.



श्रीसाईबाबा व श्रीमाणिकप्रभू यांची भेट




श्री क्षेत्र झरणी नृसिंह मंदिर

## ऐनुद्दीन उस्तादाची घमेंड जिरवली.

ऐनुद्दीन! एक मुसलमान पंडित! चिटगोण्यास राहणारा! त्या भागांतील अरबबारनवीस लोकांवरचा हा दरोगा. फारसी व अरब विद्येत अगदी निष्णांत होता. अर्थात आपल्या विद्येची फार घमेंड होती त्याला! काही ब्राह्मण बटुक त्याच्याकडे फारसी भाषेचा अभ्यास करण्यास जात. त्याप्रमाणे रामकृष्णपंतही जात असत. ऐनुद्दीन जेव्हा संधी मिळे तेव्हा ब्राह्मणांवर तोंडसुख घेई. प्रभूं संबंधी कोणी बोलले की तिटकाऱ्याने म्हणे, माणसाने माणसाची पुजा करु नये. त्याला नमस्कार करणे हे फार वाईट असून अशी माणसे मूर्ख आहेत.

एकदा रामकृष्णपंत आपल्या वडिल व चुलत्यांसोबत प्रभू दर्शनास निघाले असता वाटेत ऐनिद्दीन भेटला व कोठे जाता अशी विचारणा केली असता त्याला प्रभू दर्शनास जात असल्याचे कळले तेव्हा तो घमेंडीतच म्हणाला, चला मी ही येतो. पाहतो तुमचा प्रभू कसा आहे तो! असे म्हणून तो रामकृष्णपंतासह माणिकनगरास आला. त्याच्या समक्ष शेकडो लोक प्रभूंची पुजा, त्यांना साष्टांग नमस्कार घालताना पाहिले. त्याने या प्रकाराबाबत प्रभूंजवळ बोलून दाखविले.

माणसाने माणसाला नमस्कार करणे म्हणजे परमेश्वराचा केलेला भयंकर गुन्हा आहे. त्याला आधारभूत म्हणून कुराणातील एक वाक्य त्याने प्रभूंना म्हणून दाखविले. प्रभूंनी त्याच्या या अगाध ज्ञानाची तारीफ करताच तो गर्वाने फुगला आणि भोवतालच्या मंडळींकडे ताठ्याने पाहू लागला. तेवढ्यात प्रभूंनी त्याच्या त्या वाक्याला विरोधक अशी सात-आठ कुराणातीलच वाक्ये म्हणून दाखविली. आपल्या पवित्र ग्रंथाचे इतके सूक्ष्म ज्ञान प्रभूंजवळ आहे हे पाहून तो गर्भगळीत झाला. त्याची घमेंड फार उतरुन गेली. प्रभू तर सर्वज्ञ आहेत. आपण ज्ञानाच्या दारातच उभे आहोत, याची खात्री पटली आणि ऐनुद्दीन प्रभू चरणांजवळ नम्र झाला. उन्मत्तपणाने मी भलभलत्या गोष्टी करुन आपला घोर अपमान केला आहे, त्याची क्षमा असावी असे काकुळतीस येऊन विनंती करु लागला. प्रभूंनी आपल्या मधुर वाणीने त्याचे समाधान करुन खऱ्या धर्माचे रहस्य समजावून सांगितले. पुढे तो इतका प्रभू भक्त झाला की त्याच्या तोंडी सतत एकच वाक्य असे, 'दुनियामें एक प्रभू सच है! बाकी सब झूट है।'

**शरणापल्लीच्या ब्राह्मणाचे दारिद्र्य दूर केले.**

निजामाच्या राज्यातील नांदेड जिल्ह्यातील शरणापल्ली हे एक जुने संस्थान! निजामापूर्वी ते सर्व प्रकारे स्वतंत्र होते. या संस्थानातील एक ब्राह्मण प्रभूंची कीर्ति ऐकून दर्शनास आला. त्याकाळी घोडे, बैल हीच प्रवासाची साधने होती. एका घोड्यावर स्वार होऊन ब्राह्मण एकदाचा माणिकनगरास येऊन पोहोचला. घरी अठरा विश्वे दारिद्र्य होते. स्वतःचा उदरनिर्वाहही करु शकत नव्हता, त्यात घोड्याची भर होती. प्रभू दरबारी अनेक दिवस तो रहात होता. कष्टाळू असल्याने दरबारात सतत कोणत्या ना कोणत्या कामात दंग असायचा. गंमत अशी होती, प्रभू जागृत असले की ब्राह्मण कामात गढलेला असायचा. असे बरेच दिवस निघून गेले. अखेर आपले दुर्दैव समजून तो घरी परतण्यास निघाला. तोच प्रभूंनी झोपेतून उठून एका इसमास त्या ब्राह्मणाचे वर्णन करुन सांगितले बरोबर घोडा आहे त्याला गाठून परत घेऊन ये. तो फार दूर गेला नसेल. पळ!

प्रभू आज्ञेनुसार त्या इसमाने त्या ब्राह्मणास गाठले आणि प्रभूंकडे घेऊन आला. प्रभूंजवळ येताच त्याला गहिवरुन आले. डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळू लागले. त्याने हात जोडून प्रभूंना विनंती केली, आपण सर्वज्ञ आहात. मुला-मुलींची लग्न करण्यास माझ्याकडे पैसे नाहीत. गरीबीने गांजलो आहे. पूर्वजन्मीच्या पापकर्मांमुळे या जन्मी दारिद्र्य भोग माझ्या वाट्यास आले आहे. तसेच पूर्वसुकृतामुळेच आपले दर्शन घडले. प्रभू म्हणाले, तुझे पूर्व संचित इतके प्रबळ आहे की आणखी सात जन्म दारिद्र्य भोगावे लागणार! त्याला मी काय करु?

त्यावर तो ब्राह्मण अखेर म्हणाला, आपल्या दर्शनाने माझ्या पापाचे क्षालन झाले. आता बस झाला संसार? घरी पुनः गेलो तर बायको-मुलांची हाल अपेष्टा पाहून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होईन. म्हणून तीर्थयात्रा करुन प्रारब्ध भोग संपविण्याचा एक मार्ग आहे.

ब्राह्मणाच्या व्यथीत बोलण्याने प्रभूंना त्याची फार दया आली. त्यांनी आपल्या पायावर वाहिलेली तुळशीपत्रे हुंडी म्हणून त्याच्या हाती टाकून 'ही हुंडी बालाजीस दे. ते तुला दोन हजार रुपये देतील.' असे सांगून त्या ब्राह्मणास निरोप दिला.

प्रभूंचा प्रसाद हाती पडताच तो आनंदाने तिरुपतीस निघाला. ब्राह्मण तेथे पोहोचला त्या दिवशी बालाजीची रथांतून मिरवणूक निघाली होती. ब्राह्मणाने बालाजीच्या चरणी प्रभूंनी दिलेली तुळशीपत्रे वाहिली आणि दुरुनच मनोमन प्रार्थना केली. आश्चर्य पहा, बालाजीचा रथ पुढे हलेना. तो तेथेच थांबला. सेवेकऱ्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न करुन पाहिले. पण उपयोग नाही. शेवटी त्यांचे महंत सर्वांना उद्देशून म्हणाले, आपणांपैकी कोणी बालाजीस साकडे घातले आहे का? असल्यास त्या व्यक्तीने पुढे

येऊन ते कळवावे.

महंताचे बोलणे ऐकून तो दरिद्री ब्राह्मण पुढे येऊन महंतास नमस्कार करुन प्रभूंनी दिलेल्या तुळशीपत्रे हुंडीची कथा निवेदन केली. महंताने त्या ब्राह्मणाच्या पदरात दोन हजार रुपये टाकले. आणि काय चमत्कार ! बालाजीचा रथ सहजपणे चालू झाला. महंतांनी त्या ब्राह्मणाचा यथोचित आदर सत्कार करुन त्याला प्रमपूर्वक निरोप दिला.

तो ब्राह्मण तेथून थेट आपल्या घरी गेला. काही दिवसांनी त्या ब्राह्मणाने आपल्या घरी, मित्रांना, नातलगांना प्रभूंची अगम्य लीला सविस्तर वर्णन करुन सांगितली. त्यानंतर मात्र संपूर्ण गावात सर्वांच्या कानी ही गोष्ट गेली. अखेर प्रभूंचा महिमा शरणापल्ली राजेसाहेबांकडे पोहोचला. त्यांच्या मनात प्रभूंविषयी गाढ श्रध्दा निर्माण झाली.

**<u>प्रभूंचे पंचायतन व समाधि.</u>**

प्रभूंचा दरबार हा एक असामान्य दरबारच होता. यात पंचमूर्ति सामावलेल्या होत्या. हे पाचांचे पंचायतन बाहेरुन जरी भिन्न दिसत असले तरी अंतर्यामी एक दिव्य शक्तीने संघटीत होते. एकरुपच होते. प्रभू, मातोश्री बय्यमा, दादामहाराज, तात्या महाराज आणि व्यंकमा हे ते पंचायतन. या सर्वांनी एकविचार करुन जगाचा निरोप घेण्याचे ठरविले.

त्यांच्यापैकी दादा महाराजांनी प्रथम मान मिळवला. तीन दिवस प्रभू व दादा महाराजांनी एकांतात घालविले. आत दोघेच होते व आंतून दरवाजाला कडी घातली होती. स्नान, पान, खाणे, लघवी, शौच काहीच नाही. दोघांचा एक विचार होऊन आपापले देहविसर्जन करण्याची तयारी केली. चौथ्या दिवशी दोघेही खोलीच्या बाहेर आले. प्रभूंनी दादासाहेबांच्या समाधिची तयारी सुरु केली. संगमावर जागा तयार करुन ठेवली. ज्या दिवशी समाधि व्हायची त्यादिवशी प्रभूंनी सर्वांना सर्व नित्यविधी लवकर आटोपण्याची आज्ञा केली. प्रभूंनी सर्व तयारी झाल्यावर मातोश्री व बंधू तात्याराव यांनी ही गोष्ट सांगितली. दादा महाराजांनी त्याची पूर्वतयारी म्हणून संन्यास धर्म स्वीकारला. मातेच्या ऋणातून मुक्त होण्याचा मार्ग शास्त्रानेच सांगून ठेवला आहे. त्यांनी चतुर्थाश्रम स्वीकारुन मातेला वंदन केले. मातोश्री बय्यमांना दु:ख झाले कारण त्यांचा पुत्र त्यांच्या अगोदर जात होता. कोणत्या मातेला हे पाहवेल ? प्रभूंनी व दादामहाराजांनी मधुर वाणीने तिची समजूत घालून बोध केला. प्रभूंच्या बोधाने बय्यमांनी दादा महाराजांना देह विर्सजनाची परवानगी दिली.

तत्पूर्वी दादा महाराजांनी आपल्या मातोश्रीस व कनिष्ठ बंधू तात्यांना आपल्याजवळ काहीवेळ एकांतात बसवून योगसामर्थ्याने त्यांचे पूर्ण समाधान करुन त्यांची सारी मायाभ्रांती दूर केली.

सर्व साधू, बैरागी, संतमंडळीच्या गराड्यात ब्राह्मणांचा वेदघोष चालू होता. दादा महाराजांनी ब्रह्मरंध्र होऊन आपले प्राण ब्रह्मरुपात विलीन केले.

फाल्गून शुक्ल प्रतिपदा शके १७८३ या दिनी दादामहाराज समाधिस्त झाले. लहानणापासूनच ते परमयोगी होते. सदा मौन धारण करुन असत. गोरगरीबांचे सहाय्यकारी होते. मातेचे आज्ञाधारक सुपुत्र होते. त्यांच्या देह विर्सजनाने माणिकनगरातील सर्वांनाच अतिशय दुःख झाले. मातोश्री बय्यमा तर फार शोकाकूल झाल्या. परंतु प्रभू सर्वांचे आधारभूत असल्याने त्यांच्याकडे पाहून सर्वांनी दुःख बाजूला सारले. माणिकनगरीचे कार्य पूर्ववत चालू झाले.

दादमहाराजांची समाधि संगमावर होऊन त्यावर एक लहानसे मंदिर बांधण्यात येऊन तेथे नित्य पुजा-आरति सुरु करण्यात आली.

<u>**व्यंकमांची समाधि.**</u>

व्यंकम्मा! प्रभूंची आवडती शिष्या! माणिकनगरांत सर्वांना पुज्य असणारी योगिनी! साऱ्यांचेच तिच्यावर प्रेम होते. शुभ्र वस्त्र परिधान करणारी! अखंड प्रभू चिंतनात बुडालेली योगिनी होती. प्रभूंच्या अगोदर आपण जावे हीच तिची इच्छा होती.

एके दिवशी पायात चाळ धारण करुन अहोरात्र प्रभू भजनात रमली असता अचानक निश्चेष्ट होऊन पडली. जातीची कोमटीन असल्याने जातिधर्मानुसार तिच्या जातभाईंनी प्रेतयात्रेची तयारी केली. तिने आपला देह सोडला असे समजूनच त्यांनी पुढील तयारी चालविली होती. तिचे कलेवर उचलू जाता तिच्या मुखातून 'ॐकारध्वनि' निघू लागला. ते पाहून सर्व विस्मयचकित झाले. प्रभूंनी व्यंकमाचे अंतःकरण जाणून म्हटले, ब्राह्मणांकडून समाधि मिळावी अशी तिची इच्छा आहे. म्हणून कोणी तिला स्पर्श करु नका. प्रभूंची आज्ञा! कोण काय बोलणार!

व्यंकमांसाठी ब्राह्मणांनी विमान बांधून सुशोभित मखर तयार केले. नंतर रामचंद्रबुवा व बाप्पाचार्यांनी तिला स्नान घालून नवीन शुभ्र लुगडे व चोळी नेसवून सर्वांगाला भस्म व कपाळी शुभ्र गंध आणि अक्षता लावून गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घालताच व्यंकमा जागृत होऊन तिने प्रभूंना व विठाबाईंना (तात्या महाराजांची पत्नी) प्रेमपूर्वक नमस्कार केला आणि मांडीघालून योगासन साधून अक्षय समाधि लावली.

तेव्हा दत्तात्रेयांचा एकच नामघोष होऊन वाद्ये वाजू लागली. तिला विमानात उचलून ठेवण्यात आले. आठ सेवेकरी ब्राह्मणांनी ते विमान उचलले. चारही बाजूंनी फुले, तुळसी, बुक्का इतकेच काय खारका, सुपाऱ्या, गुलाल, बत्तासे उधळली जात होती. शेकडो साधू-संत, बैरागी यांचे भजन चालले होते तर अरब, रोहिल, परदेसी यांच्या बंदूकांचे बार उडत होते. त्याच्या धूराने आसमंत आच्छादून गेला होता. अशा थाटात व्यंकमांना अखेरचा निरोप दिला जात होता. संगमावर येताच व्यंकमांचे विमान उतरवण्यात आले. तेथे आल्यावर रोहिले, अरब या यवन लोकांनी आपली हत्यारे खाली ठेवून म्हणाले, आज हमारी बहेन हमकू छोडकर खुदा के पास चली गयी, असे म्हणून ओक्साबोक्सी रडू लागले. प्रभूंनी तेथे येऊन व्यंकमांची यथासांग पुजा, आरती करुन तिला विमानातून जमिनीत समाधिच्या जागी बसविली आणि सर्वत्र दत्तनामाचा गजर होऊन गेला. सर्व रीतीप्रमाणे कार्यविधी करुन योगिनी व्यंकमांना अखेरचा निरोप दिला गेला.

प्रभू आज्ञेप्रमाणे ब्राह्मणांनी व्यंकमांना स्नान घालून नवीन चोळी-लुगडे नेसवले. तिची ओटी भरुन हळदी-कुंकवाचा मळवट भरला. मारुतीच्या मंदिरानजिक मैदानात आणून मोठ्या समारंभाने तिच्या देहाला समाधि दिली. प्रभूंनी सांगितल्या प्रमाणे ब्राह्मणांचा हात लागताच ॐकारध्वनि बंद झाला. पुढील सर्व संस्कार यथाविधी व्यंकमाच्या देहाला मिळाले.

**<u>मातोश्री बय्यमांचे निर्याण.</u>**

बय्यमा! ही एक अशी माता तिच्या उदरी प्रभूंचा जन्म झाला. तिची थोरवी महान होती. लौकिक व्यवहारात त्या अत्यंत भोळ्या व अतिशय मृदु अंतःकरणाच्या होत्या. तात्या महाराजांचे त्यांच्यावर अतिशय प्रेम होते. आपल्या सुनेस म्हणजेच तात्यांच्या पत्नीस त्यांनी आपल्या कन्येप्रमाणे वागविले. तात्यांनी लौकिक व्यवहारास साजेसा द्रव्य संचय करावा असे नेहमी वाटत असे. प्रभू चरणी नित्य हजारो रुपये, दागदागिने येत असत. प्रभू त्याची गरजवंतावर लयलूट करीत. एकदा एक उत्कृष्ट चंद्रहार मातोश्रींना फारच आवडला म्हणून तो त्यांनी तात्यांच्या मुलाबाळांना उपयोगी पडावा म्हणून आपल्याजवळ संग्रही ठेवला. प्रभू मात्र आपल्या घरच्या मंडळींना कोणताही संग्रह करु देत नसत. काही साठवून ठेवलेले असलेच तर ते काही निमित्ताने उचलून लोकांना देऊन टाकीत.

प्रभूंची लीला पहा! बय्यमांनी चंद्रहार बरेच दिवस आपल्याकडे ठेवला होता. पण पुढे एकाएकी त्यांना पोटशूळाचा त्रास होऊ लागला. खूप औषधोपचार झाले. गुण पडेना! शेवटी प्रभूंकडे ही बातमी गेली. त्यांनी अम्मांकडे येऊन विचारपूस करुन तिच्या कानाजवळ जाऊन हलकेच म्हटले, अम्मा, तो चंद्रहार

दत्ताला देऊन टाका! तुला ताबडतोब बरे वाटेल! अम्मांनी म्हटले, घे रे बाबा तुझा तू! तात्यांच्या मुला-बाळांना होईल म्हणून ठेवला होता. अम्मांनी चंद्रहार प्रभूंच्या हाती देताच त्यांचा पोटशूळ कोठच्या कोठे निघून गेला.

प्रभूंचेही आपल्या मातोश्रींवर फार प्रेम होते. त्यांनी नित्य आणलेले फराळाचे पदार्थ प्रभू आवडीने खात असत. आपल्या सर्व पुत्रांचा उत्कर्ष व लौकिक पाहून ती माता धन्य धन्य झाली होती. प्रभूंच्या दर्शनास आलेला कोणताही भाविक अम्मांना मनोभावे नमस्कार केल्याशिवाय जात नसे.

पुढे काही निमित्ताने अम्मांच्या प्रकृतित बिघाड होऊन त्या क्षीण होत चालल्या. प्रभू सतत तिच्याजवळ असत. त्यांनी पारमार्थिक बोध करुन अम्मांची उरली सुरली मायाभ्रांती दूर केली. अम्मा मोठ्या समाधानाने पुढील मार्गाच्या तयारीस लागल्या. प्रभूंच्या समोर शांत चित्ताने व आनंदाने त्यांनी आपले देहविसर्जन केले. त्यांची उत्तरक्रिया प्रभूंनी तात्या महाराजांकरवी करुन घेतली. त्या प्रित्यर्थ हजारो रुपयांचा दानधर्म केला.

मातोश्री बय्यामांची चितासमाधि संगमावर आहे.

## <u>तात्या महाराजांचे देहविसर्जन.</u>

माणिक नगरातील पंचायतनापैकी तिघांनी इहलोक सोडल्यानंतर तात्या महाराजांनीही आपले देहविसर्जन करण्याचे ठरविले. एके दिवशी त्यांची प्रकृती अचानक बिघडली. ते निस्तेज होऊन पडले. सगळीकडे बोंबाबोंब उठली. प्रभूंना ही गोष्ट समजताच त्यांनी म्हटले, चिंता करु नका. तात्या इतक्यात जाणार नाही. हा सटका तात्याच्या उशाजवळ ठेवा तो लगेच बरा होईल.

प्रभूंचाच शब्द तो! तात्यारावांना बरे वाटून पुढे चांगले दुरुस्त झाले. प्रभूंनी तात्यांच्या थोरल्या चिरंजीवाची मोठ्या थाटाने मुंज करविली. माणिकनगरातील हा प्रभूंचा वंशातील प्रथम समारंभ असल्यामुळे मोठ्या उत्साहाने व आनंदात साजरा झाला. या समयी काही गोरगरीबांच्या मुलांचेही व्रतबंध धर्मशास्त्राप्रमाणे करविले. अन्नदान, दक्षिणा इत्यादी यथासांग पार पडले.

मुंज समारंभ आटोपल्यानंतर पुढे एक महिन्यापर्यंत प्रभू व तात्या एकांतात होते. कशाचीही चिंता त्यांना नव्हती. मात्र भाविकांना महिनाभर प्रभूंचे दर्शन घडले नाही. दोघे खोलीच्या बाहेर आल्यानंतर पुनः सर्व कार्ये सुरळीत चालू झाली. पुढे तात्यारावांनी श्रीगुरुचरित्राचे पारायण करुन पुष्कळ दानधर्म केला. भजन-पूजनादी सर्व सत्कर्मे झाल्यावर सर्वांशी आनंदाने बोलून तात्यारावांनी प्रभूंचरणी मस्तक



दादामहाराज, व्यंकम्मा, बयम्मा आणि तात्यामहाराज
यांची समाधि स्थान - संगम



ठेविले आणि त्यांच्या समोर योगासन घालून आपला देह विसर्जित केला. तात्यांच्या समाधियोग पूर्णतेला गेला. त्यांच्या विधिला स्वतः प्रभू चालत जाऊन समाधि ठिकाणी शेवटपर्यंत उभे होते. चिरंजीव आप्पांकडून त्यांनी सारे उत्तरविधि यथाधर्मशास्त्र करवून घेतले. संपूर्ण माणिकनगर तात्यांसाठी रडत होते. निजामशाहीचा मोगलाई प्रांत तात्यांसाठी हळहळत होता.

तात्या महाराज गृहस्थाश्रमी असल्याने त्याला अनुसरुनच योग्य असे संस्कार होऊन अंत्यविधि करण्यात आला. त्यांची अस्थिसमाधि संगमावर मातोश्रींच्या जवळ बांधण्यात आली.

तात्या महाराजांनी मोठ्या धैर्याने आपली इहलोकीची यात्रा संपविली. असेच म्हणावे लागले. कारण त्यावेळी ते ऐन तारुण्यात होते. आपल्या मागे पत्नी व तीन लहान बालकांना सोडून निर्भयपणे आपले देहविसर्जन केले.

## प्रभूंनी समाधि घेतली.

प्रभूंनीच आपल्या समक्ष आपल्या पारमार्थिक परिवारातील महत्वाच्या चार व्यक्तींची समाधि लावून नंतर आपण येथून प्रयाण करावे असे योजिले होते. त्याप्रमाणे सर्व घडत आले. त्यांनी आपल्या समाधि सोहळ्याचा दिवस ठरवून ठेवला होता. पण हे जग जाहिर झाले तर आपत्ती ओढवेल म्हणून प्रभूंनी आपल्या चार शिष्यांना एकांतात बोलावून त्यांच्या कानी घालून पुढील तयारीला लागण्यास सांगितले. समाधिपूर्वी सहा महिने आधी प्रभूंच्या जाण्याची तयारी चालली होती. परंतु त्या चार शिष्यांना त्याचे फार दुःख झाले होते. परमेश्वरच आता आपल्यातून निघून जाणार ह्या विचाराने ते दुःखाने हळहळले होते. तसे सारे शिष्य प्रभूंवर अतोनात प्रेम करीत होते. पण त्यांना ही गोष्ट कुणालाही न सांगण्याची सक्त ताकिद होती. या शिष्यांमध्ये बाप्पाचार्य हे प्रमुख होते. तात्या महाराजांनंतर संस्थानांची सारी जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन समर्थपणे चालविली होती. आणि आता प्रभूच सर्वांना सोडून जाणार होते. समय जवळ येत होता तसे त्यांना अनिवार दुख होत होते. ते गिळून सर्व कामकाज दक्षतेने करीत होते. हृदयात होणारी तळमळ कोणाकडे बोलता येण्यासारखी नव्हती. म्हणून दूर कोठेतरी जाऊन मुक्तपणे विलाप करुन दुःख हलके करण्याचा प्रयत्न करीत.

मार्गशीर्षाचे आगमन आणि ज्या चार शिष्यांना रहस्य समजले होते त्यांना चारही दिशा उदास वाटू लागल्या. सर्वत्र दुश्चिन्हे दिसू लागली. प्रभूंच्या प्रकृतीत फरक जाणवू लागला होता. प्रभूंनी खाणे-पिणे बंद केले होते. एखाद दुसरा अंजीर खात. ते त्यांना फार आवडे. अचानक त्यांच्या पाठीवर एक फोड

उठला. शिष्यांना तो काळफोड आहे असे सांगून त्यांना शांत केले. प्रभू रहात असत तेथेच भूईत एक खड्डा काढून समाधीला योग्य असे बांधकाम त्या चार शिष्यांकडून करुन घेतले. दत्तजयंतीही जवळ आली होती. त्यानिमित्त लोकांची कामाची धांदल होती. त्यामुळे कोणालाही समाधीची खबर लागली नव्हती. सर्व कारभार बिनबोभाट चालू होता. मुसलमानांचा ग्यारवीचा सण ही याच मासात होता. तत्पूर्वीच प्रभू ग्यारवीची खैरात करीत असत. बहुधा दहाव्या तिथीला होत असे.

प्रभूंची प्रकृती आता अधिक अस्वस्थ होत चालली होती. पाठीवरच्या फोडानेही आपली जागा व्यापत चालला होता. अशा स्थितीत ग्यारवीची खैरात कशी होणार, या चिंतेत शिष्य मंडळी होती. परंतु प्रभूंनी खैरातीचा दरबार भरवण्याची आज्ञा केली. सर्व व्यवस्था झाली. यावर्षी मुसलमानांची अलोट गर्दी उसळली होती. खैरातीला प्रभू दरबारात येऊन बसले. त्यांना शारीरिक विकार झाल आहे हे कोणालाही दिसून आले नाही. उलट नेहमीपेक्षा आज प्रभू अत्यंत आनंदात दिसत होते. त्यांचे ते रुप पाहून दरबारातील सर्वांना अत्यानंद झाला. रात्रभर खैरातीचे काम चालू होते. आणि प्रभूंची मूठ अखंड सुरु होती. सूर्योदयासमयी प्रभू आपल्या कुटीत विश्रांतीसाठी गेले. हा दिवस एकादशीचा होता. तोच प्रभूंनी समाधीसाठी नक्की केलेला होता. ठरल्याप्रमाणे यथाविधी चतुर्थाश्रम ग्रहण केला आणि तयार केलेल्या समाधीत आसनावर जाऊन बसले. सर्व शिष्यांकडून पूजा स्वीकारली आणि तात्यारावांच्या वडील पुत्रास आप्पासाहेबांना जवळ बोलावून आपल्या अंगावरील दुशाला त्याच्यावर पांघरविला. प्रसादाची माळ गळ्यात घालून मंत्रोपदेश केला. कनिष्ठ चिरंजीव खंडेराव यांच्याही गळ्यात माळ घालून प्रसाद दिला. व दोघांना घरी घेऊन जाण्यास शिष्यांना फर्माविले. नंतर सर्व शिष्यांस समाधीचे दार बंद करण्यास सांगितले. मोठ्या दु:खी अंत:करणाने त्यांनी समाधीचे दार बंद केले. वरच्या बाजूस फक्त एक गवाक्ष ठेवून त्यातून पाहत राहण्यासाठी रामभाऊ लंगोटी यांची नेमणूक केली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत रामभाऊ गवाक्षाकडे उभे होते. अखेर मस्तक भेद होऊन गेल्याचे पाहून गवाक्षही बंद करण्यात आले. दिवस होता मार्गशीर्ष शुक्ल एकादशी शके १७८७ मंगळवार २९ नोव्हेंबर १८६५.

प्रभूंची समाधी! हे सर्व अगदी व्यवस्थीतपणे व गुप्तपणे केले गेले. प्रभूंची तशी आज्ञाच होती. पौर्णिमेपर्यंत या गोष्टींची माहिती कळता कामा नये. त्यांच्या आज्ञेप्रमाणेच शिष्यांनी ती काळजी घेतली होती. दत्तजयंतीला हजारो भाविक दरबारी आले होते. भोजनाच्या पंक्तीच्या पंक्ती उठल्या. लोकांचे देवदर्शन झाले. सारे प्रभूंच्या प्रतिक्षेत होते तेव्हा शिष्यांनी समाधि उघडी केली. समोर सगुण प्रभूंऐवजी दगडाची समाधि दिसताच एकच हलकल्लोळ उठून आकांत सुरु झाला. कित्येक भाविक ते दु:ख सहन न होऊन डोके आपटून प्राणोक्रमण करु लागले. मुस्लिम लोक तर फारच शोकाकूल झाले. कित्येक


जन बेफाम होऊन समाधि उकरुन काढून प्रभूंचे अखेरचं दर्शन घेण्याचा हट्ट करु लागले. आडदांड यवनी लोकांना अडविण्याचे काम अवघड होते. तेव्हा बाप्पाचार्यादिक प्रभू शिष्यांनी सर्वांची समजूत काढून पुढील अनर्थ टाळले. तरीही मुसलमान, रोहिले, अरब इत्यादी काहींनी भडाभड जंबिये पोटात खूपसून आत्महत्या केल्या. कोणी विहिरीत उड्या टाकल्या तर कित्येकांनी विष प्राशन करुन जीव दिला.

प्रभूंसाठी सारा मोगलाई प्रांत रडत होता. आणि प्रभूंच्या गावच्या, माणिकनगरातील लोकांचा शोक तर फारच अनिवार झाला होता. त्यांना काय करावे तेच कळेना.

प्रभूंच्या बाह्यात्कारी देहावरच सर्वांची अनिवार आसक्ती जडली होती. म्हणूनच सारे दु:खात बुडाले होते. कारण प्रभूंनी लाखो जीवांचे दु:खहरण केले होते. त्यांची मधुर वाणी, मनाचे दयाळूपण, औदार्य सर्वांच्या ह्दयात ठासून भरले होते. प्रभूच सर्वांचे परमेश्वर होते. ज्ञानाने ओतप्रोत भरलेल्या प्रभूंच्या चित्स्वरुपाची जाणीव ज्ञानी लोकांना झाली असेल, परंतु सामान्य लोक त्यांच्या सगुण रुपावर आकर्षित झाली असल्या कारणाने त्यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळणे साहजिकच होते.

प्रभूंनी सुरु केलेले आपले सगुण चरित्र जन्मापासून सुरु होऊन येथे पूर्णविराम झाले. परंतु त्यांनी स्थापन केलेल्या गादीचे (गुप्त रुपाने) व संप्रदायाचे कार्य अद्याप जिवंत असल्यामुळे प्रभूंच्या अस्तित्वाची प्रचीती आजही लाखो भाविक घेत आहेत, अनुभवत आहेत.

।। सद्‌गुरु माणिकप्रभू महाराज की जय।।



# प. पु. सद्गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

**संस्थापित समाजोपयोगी संस्था**

## सद्गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ (रजि.), मुंबई

रजि. नं. एफ 25978 (मुंबई)

कार्यालय : १०/७२३, म. हौ. बोर्ड, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुं. ३३. संपर्क : ९८१९२२०२०४

---

## सद्गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) रजि.

सद्गुरु भालचंद्र महाराज उपासना मठ,

देवल गाणगापूर, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक. संपर्क : 084702७4374

---

## श्री भानुदास प्रतिष्ठान, नृसिंहवाडी - कोल्हापूर

(रजि. नं. एफ २२९६४)

नरसोबावाडी एस. टी. स्टॅन्ड जवळ, नरसोबावाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. संपर्क : ०२३२२२७०२००

---

## भाऊ महाराज उपासना ट्रस्ट (रजि.)- वाशिंद.

(नोंदणी क्र.: ई ३८३२)

श्री दत्त मंदिर, देसलेपाडा, वाशिंद, दहागांव, ता. शहापूर, जि. ठाणे. दुरध्वनी : ९८६७७१७०७९

---

## श्री भानुदास सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

नोंदणी क्र.: एम.यु.एम./डब्ल्यु.ई./आर.एस.आर(सी.आर.)/१८२१ सन १९९९-२०००)

शॉप नं. ६, श्रीकृपा बिल्डिंग, रंगारी बदक चाळ, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.

चिंचपोकळी (पुर्व), मुंबई - ४०० ०१२. दुरध्वनी : ८१०८८८६२६१

# प. पु. सद्‌गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

### सद्‌गुरु श्री भाऊ महाराज सेवाश्रम धर्मदाय संस्था

(रजि. नं.: २५७७९)

पत्ताः मु. पो. नेरुर(भाक्राड), वाघोसे वाडी रोड, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

संपर्क : ९२७०४५८५१७

---

### श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संकुल - वाशिंद.

दहागांव, वाशिंद, ता. शहापूर, जि. ठाणे.

प्रदुषणमुक्त वातावरणात उत्कृष्ट घरकुलांसाठी अवश्य संपर्क साधावा.

दुरध्वनी : ८९७६२९२९६०

---

### श्रीभाऊ मेडिकल ॲन्ड ऐज्युकेशन ट्रस्ट

अमरदिप - सी विंग, डी. एल. मार्ग, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

संपर्क - ९८२०९८१६६५.

---

### श्रीदत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट

१७/बी, उदयश्री सोसायटी, माऊली निवास, भांडूप (पुर्व).

# सद्गुरु श्री भाऊ महाराजांची वचने

गुरुसेवा ही ईश्वर सेवा.
अभिमानाने दुर्गुण येतात.
एकाग्रतेसाठी तप करावे लागते.
प्रेम मागू नका, मान मागू नका.
दैवापेक्षा देव श्रेष्ठ। प्रयत्नांती परमेश्वर
आराम भोगाने नव्हे, त्यागाने मिळतो.
स्वतंत्र राहण्याऐवजी संतआश्रयाने रहा.
पहारा कुठे ठेवाल, धनावर नाही मनावर.
आलात तर तुमच्यासह, नाहीतर तुमच्याशिवाय
निर्गुण देवाचे सगुण रुप म्हणजेच सद्गुरु होय.
दुसऱ्याने वाईट केलेले व स्वतः चांगले केलेले विसरा
आचार विचार शुद्ध ठेवा, वाणी तोलून मोजून वापरा.
दुःख स्वतः भोगतात, सुख दुसऱ्याना देतात ते सज्जन.

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज शिष्य परिवारातर्फे तसेच

आमचे हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार, सेवेकरी

यापैकी दिवंगत झालेल्यांना

सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ, मुंबई

श्री भानुदास प्रतिष्ठान - नृसिंहवाडी, कोल्हापूर

सद्‌गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) - देवल गाणगापूर, कर्नाटक

भाऊ महाराज उपासना ट्रस्ट, दहागांव - वाशिंद

श्री भानुदास सहकारी पतपेढी मर्यादित - मुंबई

श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था, दहागांव - वाशिंद

सद्‌गुरु भाऊ महाराज सेवाश्रम धर्मादाय संस्था - कुडाळ

श्री भाऊ मेडीकल ॲन्ड एज्युकेशन ट्रस्ट - मुंबई

श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट - मुंबई

आणि गुरु महिमा परिवारातर्फे



# भावपुर्ण श्रध्दांजली



गुरु महिमा दिवाळी अंकास

प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष ज्या ज्या सर्वांचे

आम्हांस अनमोल सहकार्य लाभले,

त्या सर्वांचे गुरु महिमा परिवार आणि

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज संस्थापित सर्व संस्थांतर्फे

# हार्दिक आभार




हि दिवाळी आपण सर्वांना सुख-शांती

आणि समृध्दीची जावो, हिच सद्‌गुरुचरणी प्रार्थना



सद्गुरु श्री भाऊ महाराज

प्रकाशाच्या ज्योतींनी
आसमंत उजळणाऱ्या दीपावलीचा
तेजोमय प्रकाश आणि समृद्धी
आपणास सदैव लाभो



## समस्त भाऊ महाराज शिष्य परिवाराकडून

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा